जी
२२५
DECCAN VERNACULAR TRANSLATION
T/994

# धर्मजागृतिमाला-

## पुस्तक १ लें.

# मुमुक्षु-मार्ग.

धा-२९४
09929

धर्मजागृतिमाला—पुस्तक १ लें.

# मुमुक्षु-मार्ग

थिऑसॉफिकल सोसायटीच्या विसाव्या वार्षिक कन्व्हेन्शनच्या प्रसंगीं

मद्रासनजीक अड्यार येथें इ. स. १८९५ सालीं डिसेंबर

महिन्यांत तारीख २७, २८, २९; व ३० रोजीं

## मिसेस ॲनी बेझंट, डी. एल्.

यांनीं

दिलेल्या चार व्याख्यानांचें


## रा. रा. देवीदास भास्कर लेले, बी. ए.

**हेडमास्तर, पेटिट हायस्कूल, संगमनेर,**

यांनीं केलेलें रूपांतर.


---


**प्रकाशक**

मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन, पुणें.

**आवृत्ति पहिली. ]** **[ सन १९२२**

कापडी प्रतीस किं. १०१,–निमकापडी प्रतीस किं. ०१३

**मुद्रकः**—रा. रा. केशव रावजी गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस,
५०७, शनवार पेठ, पुणें.

**प्रकाशकः**—रा. रा. राजाराम सखाराम भागवत, एम्.ए.
चिटणीस–मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन, ३२१
शनवार पेठ, पुणें.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

मराठींत उत्तम धर्मग्रंथ प्रसिद्ध करण्याच्या हेतूनें यंदा मराठी थिऑसॉफिकल फेडरेशननें धर्मजागृतिमाला नामक पुस्तकमाला प्रसिद्ध करण्याविषयीं ठराव केला आहे. त्यास अनुसरून या मालेचें पहिलें पुस्तक आम्हीं महाराष्ट्रवाचक-वर्गास सादर करीत आहों. या मालेंत उत्तम उत्तम लेखकांचे धार्मिक ग्रंथ प्रसिद्ध व्हावयाचे आहेत. अधिकारी लेखकांकडून कांहीं पुस्तकें या मालेकरतां मुद्दाम लिहविण्यांत येतील, तसेंच थिऑसफी विषयक व इतर चांगल्या पुस्तकांचीही या मालेंत भाषांतरें करण्यांत येतील.प्रस्तुत मालेविषयीं या पुस्तकाच्या शेवटीं अधिक माहिती दिली आहे ती जिज्ञासूंनीं पहावी.

या मालेंतील हें पहिलें पुस्तक मिसेस बेझंटकृत Path of Disciple-ship या इंग्रजी पुस्तकाचें भाषांतर करण्याची परवानगी आम्हांस Theosophical Publishing House, Adyar Madras यांनीं दिली याबद्दल आम्हीं त्यांचे फार आभारी आहों. पुस्तकाचें रूपांतर आमचे मित्र रा. रा. देवीदास भास्कर लेले, बी. ए., यांनीं आम्हांस मोठ्या प्रेमानें करून दिलें, याबद्दल त्यांचे आम्हीं येथें मनःपूर्वक आभार मानतों. भाषांतर सर्वांगसुंदर झालें आहे हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

अध्यक्षः— रा० ब० पंढरिनाथ वामन शिखरे, एल्.एम्. एस्.

चिटणीसः— रा. रा. राजाराम सखाराम भागवत एम्. ए.<br>रा. रा- मार्तंड सखाराम प्रधान

पुणें ता ३०।११।१९२२, मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन.

DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY
१८९४

# मुमुक्षु-मार्ग

## ( पहिला टप्पा.)

## कर्मयोगशुद्धीकरण.

प्रिय बंधूहो, ह्याच सभागृहांत दोन वर्षांमागें मी प्रथम भाषण केलें, त्यावेळीं मी एकंदर ब्रह्मांडाच्या उत्क्रांतीचा प्रकार सांगितला, जगताचा अफाट चित्रपट कसा उलगडत जातो, याचा क्रम दाखविला. गेल्या वर्षीं मी पिंडाच्या उत्क्रांतीचें निरूपण केलें; जीव आपल्या अनेक देहांचे द्वारें अनेक लोकांचा अनुभव घेत घेत ते देह ताब्यांत ठेवण्यास कसा शिकतो ते सांगितलें; आणि पिंड ब्रह्मांड हीं दोन्ही प्रथम ज्या आत्म्यांतून उत्पन्न होतात त्यांतच अंतीं लय पावतात, त्याशीं ऐक्य पावतात हें वर्णिलें. परंतु असल्या उदात्त विषयाचें निरूपण ऐकून लोक मला विचारतात कीं, " आम्ही संसारी माणसें, प्रारब्धानें आमच्यामागें सदोदित बहुसाळ कर्मांचा ससेमिरा लावलेला, आमचें चित्त नेहमीं मायेच्या देखाव्यांत व्यग्र झालेलें, त्या आमच्या चरित्राला वरचें वळण कसें लागेल ! आत्म्यावर आमचें लक्ष कसें लागावें, आत्मप्राप्तीचा मार्ग आम्ही कसा चोखाळावा !" तेव्हां यंदा ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याचा मी यत्न करणार आहें. प्रापंचिक मनुष्य, ज्याला अनेक कुटुंबऋणें, समाजऋणें फेडावयाचीं आहेत, ज्याला बहुविध सांसारिक कर्तव्यें बजावावयाचीं आहेत, त्याला सुद्धां असल्या स्थितींतच परमात्मप्राप्तीच्या मार्गाचा पहिला टप्पा कसा चालतां येईल, हें मी दाखविणार आहें. मी आतां निरूपण करणार

आहे त्यावरून तुमच्या लक्षांत येईल कीं जीवाची परमगति कोणती, आणि ती गांठण्याचा मार्ग कोणता. त्या मार्गाचा आरंभ, तुम्ही बहुतेक या जन्मीं ज्या स्थितींत आहां तेथें, म्हणजे तुमच्या कौटुंबिक, सामाजिक इ. कर्तव्यांपासून होतो. पण त्याचा शेवट त्या कल्पनातीत वस्तूंत, त्या आपल्या अक्षय सुखाच्या आत्मधामापाशीं होतो. तेव्हां यंदाच्या व्याख्यान-चतुष्टयाचा हा विषय आहे, ह्या मार्गानें आपणाला सहप्रवास करावयाचा आहे. आतां आपला विषय चांगला स्पष्ट लक्ष्यांत भरण्यासाठीं आपण ब्रह्मांडाची उत्क्रांति कोणत्या क्रमानें, कोणत्या हेतूनें होते त्याचें क्षणभर, अर्थात् विहंगमदृष्टीनें, अवलोकन करूं. अशा रीतीनें सबंध रस्त्याचा आराखडा आपल्या डोळ्यापुढें ठेवला म्हणजे त्यांतील एकेक पायरी बांधली आहे ती यथायोग्य कशी आहे, तें आपणास चांगलें कळेल.

एकापासून अनेक झालें हें तत्व आपण ऐकलेलें आहे. जग उत्पन्न होण्याच्या अगोदर जी नितांत निद्रा किंवा अंधतम होतें त्यावर ध्यान ठेवून आपण बसलों म्हणजे त्या निःशब्दांतून एक सूक्ष्म शब्द उठलेला ऐकूं येतो; 'बहुस्याम्' —मी बहुत होईन. 'मी' चें बहुत होणें हीच ब्रह्मांडाची व त्यांतील जीवांची उत्पत्ति. 'एकमेवाद्वितीयम्' असें जें ब्रह्म त्याची बहुत होण्याची इच्छा तीच जग उत्पन्न करणारी आदिशक्ति; तेंच ब्रह्मांडवृक्षाचें मूळबीज. मूळ वस्तु एक एकरूप असून तिच्यापासूनच अनेक व अनेकरूपी वस्तु उत्पन्न होतात हें नीट समजलें म्हणजे आपल्या लक्षांत येईल कीं आकाराला येणाऱ्या त्या वस्तु मूळवस्तूपेक्षां न्यून असतात. किंबहुना आकारला येणें, उत्पन्न होणें म्हणजेच नामरूपांच्या मर्यादांत कोंडून घेणें. अर्थात् समर्याद, सांत वस्तु म्हटली म्हणजे अमर्याद अनंत वस्तूपेक्षां कनिष्ठ, सदोष किंवा न्यून ठरलीच. व्यक्त वस्तु असंख्य असावी, असंख्य प्रकारची असावी हीच तिची पूर्णता. एक अव्यक्त वस्तु हा सूर्य, आणि त्याच्या प्रकाशानें प्रकट होणाऱ्या व्यक्त वस्तु अनेक; अर्थात् त्या जितक्या अधिक तितका त्या एकाचा प्रकाश अधिक प्रकट होईल. कारण तितके प्रतिबिंब दाखविणारे आरसे अधिक होतील. आरसा किंवा

त्यांतलें प्रतिबिंब कितीहि विविध, भव्य, सुंदर, असलें तरी बिंबाचें स्वरूप त्याहून अद्भुतच रहाणार.

जगताची उत्क्रांति करणाऱ्या शक्तीचें पहिलें कर्तव्य हें कीं एकाचे अनेक करावें; अनेक, बहिरंग दृष्टीनें; अंतरंग दृष्टीनें एकच. आकाराला आलेली प्रत्येक वस्तु त्या एक, निराकार आत्म्याचें अस्पष्ट प्रतिबिंब होय. प्रत्येक प्रतिबिंब इतरांहून अगदीं पृथक् वेगळें दिसतें; पण तत्वतः एक असतें. एवढें तत्व समजलें म्हणजे, जगाच्या घडामोडीचें फल काय? एकाचे अनेक कशाला करावयाचे ? जगांत वेगळेपणा, भेदभाव आवश्यक कसा आहे ? ह्या प्रश्नांचीं उत्तरेंहि आपणांस समजूं लागतील. एका ब्रह्मांडाचें कल्पाचें फल म्हणजे दुसऱ्या कल्पाचा ईश्वर, त्याचे ऋषि, पितर इत्यादि तयार करणें. दुसऱ्या कल्पांत त्यांनीं पंचमहाभूतांचे व्यापार चालवावे, देव, मानव, पशुपक्षी इत्यादिकांचें पालन, पोषण, शिक्षण करावें व त्यांना श्रेष्ठ पदास चढवावें. ह्या कल्पांत उन्नति पावणाऱ्या जीवांपैकीं पुढल्या कल्पांत कोणी ब्रह्मा, विष्णु, महेश, कोणी इंद्रादिक देव, कोणी वसिष्ठासारखे ऋषि, कोणी पितर होतील, कोणी प्रारंभींचे मनु, प्रजापती वगैरे वगैरे होतील. अशा रीतीनें मन्वंतरामागून मन्वंतर, कल्पामागून कल्प, ब्रह्मांडामागून ब्रह्मांड होत जातें. असें त्यांचें अखंड रहाटगाडगें चालतें. एकाचें फल त्यांत दुसऱ्याचें बीज हाच न्याय सर्वत्र. आज आपल्या भोंवतीं असलेल्या विविध असंख्य वस्तूंचें सार अशा एका फलांत फलित व्हावयाचें; आणि त्यांतच भावी सृष्टीची बीजशक्ति सांठविलेली असावयाची.

आतां ह्यावर एक प्रश्न उद्भवतो हें मला माहीत आहे. कारण पौर्वात्य व पाश्चिमात्य जिज्ञासूंनीं मला तो वारंवार विचारलेला आहे. तो असा कीं, देव-ऋषि-पितरादिक अंगें व शक्ति यांसहित ईश्वर जर उत्क्रांति कर्ता आहे तर उत्क्रांतीला इतके अडथळे कां यावे ? शेंकडों प्रयत्न फसावे, मग एक सिद्धीस जावा, असें कां ? उन्नतिकारक पुण्यमार्ग सोडून मनुष्यें पुनः पुनः अवनतिकारक पापमार्गाला कां लागतात? एवढा सर्वशक्तिमान् ईश्वर मुख्य चालक, त्याच्या हाताखालीं इंद्रादिक महाबली देव, महाज्ञानी ऋषि, प्रजापति वगैरे असून जगदुत्क्रांतीचें कार्य इतकें

वेळां फसतांना कां दिसावें ? जगाचें गाडें बिकट आडवळणें चुकवून सोप्या नीट रस्त्यानें थेट मुक्कामाला नेणें या विभूतींस अशक्य कां व्हावें ? उत्क्रांतिमार्ग इतक्या वळणांचा, इतका वेडावांकडा कां असावा ? नरानें नारायण व्हावें हा नरजन्माचा हेतु असें धरून पाहिल्यास मानवी उन्नत्ति इतकी बिकट कां तें समजण्याजोगें आहे. मनुष्यें मुळांतच निर्दोष व सर्वगुणसंपन्न बनविणें, त्यांची एकेक शक्ति उदय पावली कीं, पाप म्हटलेल्या गोष्टींकडे न जातां पुण्य म्हटलेल्या गोष्टींकडेच ती जावी असें तिला सदैव वळग देणें, सोपें झालें असतें खरेंच. अशा रीतीनें सुलभ सिद्धि मिळाली असती खरी, पण तशा सिद्धीला काय किंमत आहे ? त्यानें मनुष्य नुसतें कळसूत्री बाहुलें झाला असता. स्वतःची काडीइतकी शक्ति नाहीं. केवळ निरुपाय म्हणून ईश्वराची जबरदस्त शक्ति बाहेरून जसें हालवील तसें हलावें, जिकडे नेईल तिकडे जावें असें झालें असतें. पाषाणादिक खनिज सृष्टि अशाच स्थितींत आहे. जड द्रव्यांचे परमाणु असेच जबरदस्त नियमानें संयोग वियोग पावत आहेत. परंतु प्राणी जसजसा वरच्या योनींत चढतो तसतसें त्याला अधिकाधिक स्वातंत्र्य मिळालेलें आपण पहातों. आणि मनुष्ययोनींत तर कर्तुमकर्तुं अशा ईश्वरी स्वातंत्र्याचाच अंकुर उगवलेला आपल्याला दिसतो. ह्यावरून उत्क्रांतीचा हेतु असा दिसतो कीं मनुष्यांना कळसूत्री बाहुलीं न बनवितां, जाणून बुझून स्वेच्छेनें पापाचा त्याग व पुण्याचा अंगिकार करणारे देव बनवायचें. त्यांनीं पाप म्हणजे दुःखाचें वाइटाचें बीज असें स्वानुभवानें ठरवून घ्यावें, आणि पुण्यहि स्वानुभवानें उत्तम जाणून स्वीकारावें. अशा अनुभवसिद्ध पुरुषांचा संघच पुढील कल्पांत उत्कृष्ट मार्गदर्शक होईल. ते अनेक असतील पण स्वेच्छेनें, बुद्धिपुरःसर, एकच विचार करतील, एक हेतु धरतील; एकाच दिशेनें कार्य करतील. ते ईश्वरी नियम अनुसरतील पण निरुपायानें किंवा जुलमानें नाहीं,तर तोच सर्वांच्या परमकल्याणाचा मार्ग आहे असें निश्चित जाणून अनुसरतील. त्यांना प्रेरणा बाहेरून मिळणार नाहीं तर ईश्वराशीं तादात्म्य पावलेल्या अंतःकरणांतून मिळेल. त्या योगानें आजच्या जगांत दृष्टीस पडते तशीच एक अबाधित सत्ता भावी जगांत दृष्टीस

पडेल. पण ही सत्ता जड अचेतन सृष्टीची नव्हे तर पूर्वकल्पांत देव बनलेल्या, एकरूप, एकचित्त बनलेल्या अनेक सिद्धांची एकीकृत इच्छाशक्ति होय. अशा रीतीनें अनेक स्वतंत्र चेतनांची इच्छा पुनः एक करण्याला दुसरा मार्ग नाहीं. त्यांनीं जय अपजय, पापपुण्य, इत्यादिकांचा पुरा अनुभव घेऊन मग एके ठायीं दृढ निष्ठा धरावी, एवढाच एक मार्ग आहे. सारांश एका कल्पांतलीं मनुष्यें दुसऱ्यांत देव होतात व पूर्वानुभवामुळें त्यांची इच्छा, त्यांचे विचार, त्यांच्या क्रिया एकसूत्री रहातात.

असा हेतु साधण्यासाठीं ह्या पृथ्वीवर देवऋषींनीं आजवर अनेक संस्कृति स्थापन केल्या. प्रतापी आर्यवंश हा पांचवा. ह्याच्या आधींच्या चवथ्या वंशाच्या संस्कृतीचें पुराण सांगण्यास मला वेळ नाहीं. त्या विषयीं मी इतकेंच सांगून जातें कीं, त्या वंशांत एका महान संस्कृतीचें आरोपण केलें होतें; जोंपर्यंत दिव्य अवतारी राजर्षी शिरीं होते तोंपर्यंत ती चांगली यशस्वी होती; पुढें, मूल जरा चालूं लागलें म्हणजे त्याला आपल्या आपण किती चालतां येतें तें पहाण्यासाठीं आई जशी आपल्या हाताचा आधार काढून घेते; तसा राजर्षींनीं आपला प्रत्यक्ष आधार काढून घेतला, आणि बालमनुष्यें आपण चालूं शकतात कीं ठेंचाळून पडतात तें बघण्यासाठीं ते पडद्या आड उभे राहिले; आणि तत्काळ मनुष्यांचा अधःपात झाला. एवढी भव्य संस्कृति, दिव्य ज्ञानाच्या सामर्थ्यावर उभारलेली एवढी उत्कृष्ट समाजसंस्था; पण मनुष्यांची स्वार्थपरायणता, व अनावर कामक्रोध, यांच्या तडाक्यानें ती क्षणांत धुळीस मिळाली. तेव्हां पुन्हां प्रयत्न करणें प्राप्त झालें, आणि प्रतापी आर्यवंशाची स्थापना करण्यांत आली. पुनः सिद्धसंघ मार्ग दाखविण्यास पुढें आला. नवा मनु अवतरला. त्यानें धर्मशास्त्र, समाज व्यवहार, राजनीति ह्यांचे नियम घालून दिले. त्याच्या सहायार्थ पुनः ऋषि अवतरले व त्यांनीं मनूच्या नियमाप्रमाणें लोकांना वळण लावलें. अशा रीतीनें मनुष्यांनां नवा कित्ता घालून देऊन, चरित्राचा नवा आदर्श त्यांचेपुढें मांडून सिद्ध मंडळी पुनः गुप्त होऊन बघत आहे कीं मनुष्यांनां आतां तरी आपल्याच पायाचे बळावर, बाहेरचा प्रकाश न घेतां अंतरात्म्याच्या प्रकाशानें इष्ट गति गांठतां येतें कीं नाहीं ? आणि

पुनः हा प्रयत्नहि बहुतांशीं फसलेला आपण पहात आहों. इतिहास सांगतो कीं ही आर्यसंस्कृति मूळांत दिव्य होती पण मनुष्यांच्या उच्छृंखळ कामक्रोधांनीं, अनियंत्रित हीन वृत्तींनीं क्रमाक्रमानें तिचा नाश केला आहे. हिंदुस्थानाचा प्राचीन इतिहास पहा, तेथली आश्चर्यकारक समाजसंस्था उत्कृष्ट राज्यव्यवस्था, लक्षांत घ्या आणि राजर्षि जसजसे दृष्टीआड होत गेले तसतसा युगानुयुग तिचा ऱ्हास कसा होत आला तें ध्यानीं आणा. तात्पर्य मनुष्यांनीं आपल्या पायांनीं चालण्याचा पुनः प्रयत्न केला आणि पुनः तीं अडखळून पडलीं. दोन्ही खेपांस सिद्धांचे बेत फसले. आर्यवंशाला प्रारंभीं जें दिव्य, ध्येय दिलें तें कोपऱ्यांत पडून सर्वत्र क्रोधलोभांचाच विजय झालेला आजच्या जगांत दृष्टीस पडतो. त्या कालचे ब्राह्मण पहा. त्यांच्या चारित्र्याचें दोन शब्दांत वर्णन करावयाचें तर असें म्हणावें कीं ब्राह्मण म्हणजे मुक्तीच्या उंबरठ्यावर पोंचलेले जीव.त्यांना ऐहिक संपत्तीचा लोभ नाहीं, विषयसुखाची लालसा नाहीं, सत्तेचा हव्यास नाहीं. धन, मान, सुख, ऐश्वर्य, कांहीं एक त्यांना नको.ब्राह्मण म्हटला म्हणजे ज्ञान हेंच त्याचें सर्वस्व. तेच आजकालचे ब्राह्मण पहा. धनसंपन्न पण ज्ञानशून्य असे पुष्कळ. हें वर्णाश्रम धर्माच्या ऱ्हासाचें एक लक्षण आहे. इतर वर्णांचीहि स्थिति तशीच आहे.

आतां आपण हें पाहूं कीं आर्यांना ऋषींनीं कोणतें ध्येय उपदेशिलें ? आर्यांनीं स्वबुद्धीनें उत्तम ठरवून तो गिरवावा यासाठीं त्यांस ऋषींनीं कोणता कित्ता घालून दिला, व ते गिरवायला चुकले ? प्रथमारंभीं सिद्धांनीं अवतार घेऊन कच्च्या मनुष्यांना पक्के, सिद्ध, करण्यास त्यांचेपुढें स्वताचे चरित्राचा आदर्श ठेविला, तथापि मनुष्यें अपक्क, बालिश, यामुळें त्यांचा थोर प्रयत्न फसला.

कनिष्ठ अधिकारी मनुष्यांना कालगतीनें तरी सिद्धि मिळावी म्हणून ऋषींनीं कर्मयोग उपदेशिला. कर्म म्हणजे कार्य, काम. योग म्हणजे ईश्वरप्राप्ति. कामें करीत करीत देवाच्या भेटीला जाण्याचा मार्गच प्रापंचिक कर्तव्यांत गुरफटलेल्या मनुष्यांना योग्य. तीं कर्मे करतां करतांच मनुष्यांचें

अंतःकरण संस्कारानें शुद्ध व्हावें व पहिला टप्पा गांठावा अशी योजना केलेली आहे.

'कर्म-योग' हा दोन शब्दांचा समास चिंतनीय आहे. कर्म अशा रीतीनें करावयाचें कीं त्याचें फल योग मिळेल. लक्षांत घेण्याचा मुद्दा हा कीं, वियोग करणारें नेहमीं कर्मच असतें. कामामुळें माणसांना परस्परांस पारखें व्हावें लागतें. अनेक कर्मांच्या व्यवधानामुळेंच मनुष्यांमध्यें भेदभाव उत्पन्न होऊन तीं एकमेकांस दुरावतात. तेव्हां कर्मानें योग, म्हणजे वियोग करणाऱ्याच्या मार्फत संगम, नेहमीं ताटातूट करणाऱ्याचे हस्तें भेट करविणें, हें बोलणेंच विरुद्ध दिसतें. परंतु सिद्ध ऋषींचें ज्ञान असें अगाध कीं, त्यांच्या योजनेनें हा भासणारा विरोध अगदीं नाहींसा व्हावा आणि सर्वांचा उत्तम मिलाफ व्हावा. म्हणून त्यांचा कर्मयोगाचा उपदेश समजून घेण्याचा यत्न करूं या.

प्रकृतींत सर्वत्र सत्व, रज, तम हे त्रिगुण भरलेले आहेत; त्यांचा ह्या देहनगरींत त्या जीवावर पुरा पगडा असतो. ते पिटाळतात आणि हा वेड्यासारखा हवातिकडे धांवत सुटतो. त्यांचा खटाटोप, त्यांची जगाची घडामोड सदोदित चालू असते, आणि हा जीव त्यांचें विकत श्राद्ध घेत असतो. ते सर्व कर्में करतात. हा म्हणतो मी करतों. हा गुणांच्या गोंधळांत रहातो; त्यांच्या मायेला भुलतो; आंधळा बनतो; त्याला बिलकुल स्वतःची ओळख रहात नाहीं. गुणांच्या वावटळींत तो कस्पटासारखा इकडे तिकडे फेंकला जातो, फरफटला जातो, गिरक्या खातो. गुणांच्या धुमश्चक्रीशिवाय दुसरें कांहीं त्याच्या दृष्टीस पडत नाहीं. अर्थात् ही त्याच्या डोळ्यांतली धूळ थोडीफार निघाल्याशिवाय त्याला मोक्षमार्गावरचे चालणें अशक्य आहे. म्हणून प्रथम त्यानें दृश्य जगाच्या गोंधळापासून अलग होऊन ह्या त्रिगुणांचें स्वरूप समजून घेतलें पाहिजे. हाच कर्मयोग. ह्याच कर्मयोगाचें महान् शास्त्र, श्रीभगवद्गीता, श्रीकृष्णानें कुरुक्षेत्रावर अर्जुनास पुनः उपदेशिलें. * अर्जुन क्षत्रिय, योद्धा. त्याला जगांत राहून युद्ध केलें

[ पूर्ण टीप ८ पृष्ठावर पहा. ]

* हीं व्याख्यानें सन १८९५ सालीं देण्यांत आलीं. गीतेंत कर्मयोग प्राधान्यानें आहे हा सिद्धांत १९१५ सालीं कै. लो. बाळ गंगाधर टिळक

पांहिजे, राज्य केलें पाहिजे, सर्व प्रकारचें कर्म केलें पाहिजे. त्याला योगाचा उपदेश केला ! ह्यांतच संसारी जनांनीं घ्यावयाची गुरुकिल्ली आहे. हळुहळू गुणातीत कसें व्हावें, व परमात्म प्राप्ति कशी करून घ्यावी, याची युक्ति यांतच आहे.

तेव्हां कर्मयोगांतला पहिला धडा हा कीं गुण व त्यांचीं कर्मे हळुहळू आपल्या कह्यांत घेणें. जगांतले सर्व असंख्य पदार्थ सत्व, रज, तम ह्या तीन गुणांचे निरनिराळ्या मिश्रणांनीं बनलेले आहेत हें तुम्हांस माहीत आहेच. एक एकीकडे क्रिया करतो तों दुसरा भलतीकडेच. त्यांना एक लगामीं लावलें पाहिजे व समतोल राखलें पाहिजे. देहांत राहणारा, देहाचा स्वामी जो जीवात्मा त्यानें आपण गुणांपासून वेगळे आहों हें जाणून, त्यांवर सत्ता स्थापली पाहिजे. तेव्हां त्रिगुणांचें स्वरूप ओळखणें, त्यांचे व्यापार ताब्यांत घेऊन इष्ट दिशेला लावणें हें पहिलें कर्तव्य आहे. लहान मुलाला मोठ्या माणसाचें काम करतां येणार नाहीं. तद्वत् तुम्हाला एकदम गुण तरून पैलतीर गांठता येणार नाहीं. मनुष्यजाति अजून बाल्यावस्थेंत आहे, तिच्या शक्तिमुकुलित आहेत, अशा स्थितींत तिला पूर्ण योग साधन शक्य आहे का ? किंबहुना तसा प्रयत्न करणें तरी शहाणपणाचें आहे का ? मुलानें मोठ्याचें काम करण्याचा यत्न केला तर त्याला त्यावेळीं काम साधणार नाहीं इतकेंच नाहीं तर, त्याच्या शरीराला अती ताण पडून, परिणामीं त्याला तें काम पुढेंहि साधणार नाहीं. कारण अति मोठें काम त्याच्या शक्ति कुंठित व विकृत करील. म्हणून मुलाला क्रमिक व्याया-

---

[ टीप ७ पृष्ठावरून पूर्ण. ]

यांनीं गीतारहस्य प्रसिद्ध करून व्यवस्थित रीतीनें जनतेसमोर मांडला, हें सर्वांस माहीत आहेच. त्याचेपूर्वी वीस वर्षे तो मिसेस बेझंट यांचे व्याख्यानांत असा ओझरता आला आहे हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. त्यांच्या इतर अनेक लेखांत व व्याख्यानांत, गीतारहस्य प्रसिद्ध होण्याचे अगोदर, हा सिद्धांत प्रतिपादिलेला वारंवार आढळतो.

मानें शक्ति वाढविली पाहिजे, प्रौढ झालें पाहिजे; म्हणजे मग प्रौढाचें काम करतां येईल. क्षणभर तमोगुणाचें उदाहरण घ्या. तमोगुण म्हणजे अंधार, आळस, जडता, निष्काळजीपणा इ०. आतां ह्या गुणांचा मनुष्याच्या उन्नतीला कसा उपयोग करून घेतां येईल ? तमोगुणाला मोक्षाचें साधन कसें बनवितां येईल ? तर, तालमींत वजनाचा जसा उपयोग तसा तमोगुणाचा कर्मयोगांत. जोडी डंबेल इ० नेहमीं फिरविल्यानें, उचलल्यानें, जसें मल्लाच्या अंगांत बळ येतें. तसें तमोगुणाशीं झगडल्यानें आत्मबल वाढतें. मनोनिग्रह, मनःसंयमन, साधतें. उचलायला, पेलायला, वजनें असल्याशिवाय शरीरांत बळ येणार नाहीं. तसें तमोगुणाशीं झगडल्याशिवाय आत्मबल प्राप्त होणार नाहीं. फायदा आहे तो नुसत्या वजनापासून नाहीं तर त्याचा रोज उपयोग केल्यापासून आहे. तसाच तमोगुणाशीं नित्य झगडा करून आळस, निष्काळजीपणा, सोडून त्यावर जय मिळविला म्हणजे आत्मा बलवान् होतो, त्याचें कल्याण होतें. म्हणून शास्त्रकर्त्यांनीं मनुष्यांना नित्य नैमित्तिक कर्मे लावून ठेवलीं आहेत, त्यांत कांहीं अंशीं शरीरांतला आळस, सुस्ती वगैरे रूपांचा तमोगुण जिंकण्याचा हेतु आहे. अमुक कर्मे अमुक वेळीं केलींच पाहिजेत असा नियम केल्यामुळें मनुष्याला आपल्या शरीराची खुशी नाखुशी एकीकडे ठेवून आत्म्याची आज्ञा पाळावी लागते. त्यावेळीं तें कर्म करावें लागतें. तशाच युक्तीनें रजोगुण जिंकावयाचा. रजोगुण म्हणजे केवळ चंचलता. त्याला स्वस्थता कशी ती ठाऊक नाहीं, एकसारखी कांहीं तरी चळवळ पाहिजे. ह्या गुणाचाच आजकाल जगांत फार पगडा आहे. त्यामुळें सर्वत्र चळवळ, खळबळ, धांवपळ; हजार खटाटोप करावे; कांहीं तरी नवें करावें, जुनें मोडावें किंवा बदलावें, अशी जशी कांहीं सांथ जगभर चालू आहे. असा हा रजोगुण शुद्ध करून चांगला आत्म्याचे लगामीं लावावा, कीं तेणेंकरून आत्म्याची प्रभा त्यानें झाकून न टाकतां चांगल्या रीतीनें प्रकट करावी, हा कर्मयोगाचा हेतु आहे. मनुष्य बहुतेक सर्व कर्मे आपल्या सुखासाठीं करतो. शरीराला, इंद्रियांना सुख व्हावें, कांहीं तरी इष्ट फल मिळावें, ह्या आशेनें मनुष्य कर्म करीत असतो. त्याला कर्मयोगाचें शास्त्र सांगतें ‘ बाबा, ही सुखाची आशा सोड, आणि कर्तव्य

म्हणून कर्म कर.' रजोगुण मनुष्याला स्वसुखासाठीं नाना उद्योग करावयास लावतो. शास्त्र म्हणतें ' श्रीकृष्ण जसें स्वतः कर्म करीत होते, जसें करावयाला त्यांनीं सांगितलें आहे, तसें तूं कर. म्हणजे, जगाचें चक्र फिरविण्यास यथाशक्ति मदत करणें हें आपलें कर्तव्य, अशा बुद्धीनें कर्म कर.' श्रीकृष्णांना ह्या लोकीं किंवा परलोकीं मिळवायाचें असें कांहीं एक नाहीं. तथापि, आपण कर्म सोडलें तर जगाचें रहाट-गाडगें थांबेल म्हणूनच ते कर्म करितात. तसेंच कर्मयोगी मुमुक्षूनें केलें पाहिजे. आपण जगाहून वेगळे हा भ्रम सोडावा; एकट्याच्या सुखासाठीं धडपड सोडावी, आणि ईश्वर सर्वांच्या हितासाठीं जगाचें यंत्र फिरवीत आहे, त्याच्या इच्छेप्रमाणें वर्तावें. हें साधण्याला प्रत्येक कर्माच्या मुळाची भावना हळूहळू शुद्ध केली पाहिजे. म्हणजे 'सुख मिळो' ही भावना सोडून 'कर्तव्य घडो' ही भावना कायम करण्यास झटलें पाहिजे. अशा रीतीनें मनुष्याला परमार्थमार्गाला लावण्यासाठींच नित्यनैमित्तिक कर्में सांगितलीं आहेत. मनुष्याला सांगितलें आहे कीं 'रोज सकाळ-संध्याकाळ सूर्याची उपासना कर.' त्याचा हेतु हा कीं परिणामीं मनुष्याचें सर्व चरित्र उपासनामय व्हावें. रोजची उपासना ही त्या दीर्घ उपासनेचें साधन आहे. सृष्टींत सर्व कर्तृत्वशक्ति उपासनेचें फल आहे. मूळ सृष्टीच ब्रम्हदेवाच्या उपासनेपासून बनली असें सांगितलेलें तुम्हांस आठवत असेल. ध्यानतपाची ही दिव्य कर्तृत्वशक्ति मनुष्याला प्राप्त व्हावी व त्यानें तिचा उपयोग करावा म्हणून तें क्रमानें शिकविण्यासाठीं रोज कांहीं वेळ ध्यान करावयास सांगितलें आहे. अशा रीतीनें प्रथम मध्यें मध्यें खंड करून ध्यान लावतां लावतां शेवटीं नेहमीं अखंड ध्यान धरतां येतें. आरंभीं अल्पकाल, अल्प कार्य ध्यानमय करावयाचें. अंतीं सर्व काल सर्व जीवित ध्यानमय बनवावयाचें, म्हणजे मग ध्यानासाठीं वेगळा वेळ काढून ठेवावा लागत नाहीं; सर्वकाळ ध्यान चालूच असतें. साधक सर्व कर्में शरीरानें मनानें करीत असतो पण त्याचें चित्त अखंड प्रभुपदकमलीं असतें. हा नियम सर्व प्रकारच्या कर्तव्यांस लागतो. यज्ञ, दान, सर्वांची तीच रीत. प्रथम आपण अमुक ऋण जगापासून घेतलें आहे तेवढें परत

दिलें पाहिजे ह्या भावनेनें द्यावयाचें; शेवटीं सर्वस्व दान करावयाचें. प्रथम परिमित दानानें ऋणाची फेड, पण अखेर प्रेमानंदानें प्रभूस आत्मसमर्पण! तेथें इतकें घेतलें व दिलें ही गोष्टच नाहीं. देणें घेणें, करणें न करणें, आहे नाहीं सर्वच परमात्म्याचें. अशी स्थिति होणें हाच कर्मयोगाचा कळस.

कर्मयोगाचाच एक भाग म्हणून नित्य पंचयज्ञ सांगितले आहेत, त्यांचा विचार करा. त्यांचीं नांवें तरी तुम्हा सर्वांना माहित असतील. त्या यज्ञांत जगाचीं मनुष्याचे शिरावर जीं अनेक ऋणें असतात तीं स्पष्ट करून एकेक ऋण नित्य कसें फेडावें तें सांगितलें आहे. एकेक यज्ञाचा, घाईनें का होईना, आपण आतां विचार करूं. पहिला देवयज्ञ. तो कशासाठीं ? तर, पंचमहा-भूतांच्या देवता मनुष्यांच्या पोषणरक्षणासाठीं धन-धान्य-फल वनस्पति वगैरे देतात; त्यांनीं मनुष्याच्या देहाचें धारण होतें. म्हणून देवां-प्रीत्यर्थ अग्नींत होम केला पाहिजे. अग्नींत कां ? तर अग्नि देवांचें मुख आहे असें शास्त्र सांगतें. आतां लोक नुसते पोपटासारखे शास्त्रवचन बोलतात. पण त्यांत शिरून त्याच्या खऱ्या अर्थाचा विचार करीत नाहींत. सृष्टींत अग्नि काय कार्य करतो तें पहात नाहींत. पृथ्वी, आप, तेज इत्यादि प्रत्येक भूताची अधिष्ठात्री एक मोठी देवता असते. तिच्या हाताखालीं लहान मोठ्या दर्ज्याच्या असंख्य उपदेवता असतात. पाऊस पडणें, पिकें येणें, वगैरे सर्व क्रिया देवता करतात. तशाच अग्निदेवता हवन केलेलें घन-द्रव पदार्थांचें वायूंत रूपांतर करतात. त्या वायूंनीं उपदेवतांचें शरीर-पोषण होतें. अशा रीतीनें अग्नि पदार्थांचें पृथःकरण करून, सूक्ष्म रूपांतर करून ते सूक्ष्म देवतांस पोचवितो. म्हणून त्याला देवांचें मुख म्हटलें आहे. म्हणून अग्नीचे द्वारा देवतांस होम दिला म्हणजे देवांनीं मनुष्यांचे पोषणा-साठीं दिलेल्या अन्नाची फेड होते. श्रीकृष्णांनीं हेंच सांगितलें आहे 'देवा-न्भावयतानेनते देवा भावयंतु वः'—गीता. [अर्थ-'तुम्ही (यज्ञानें ) देवांचें पोषण करा, व देव तुमचें पोषण करतील.']मनुष्यानें हा एकमेकांचे शरीर-पोषणाचा धडा शिकला पाहिजे.पहिल्या भोळ्या भाविक मनुष्यांनीं हा धडा श्रद्धेनें गिरविला. पुढें मनुष्यांना सृष्टीचें ज्ञान मिळूं लागलें; पण तें वरपंगी ज्ञान असल्यामुळें, मनुष्यें मर्म न जाणतां यज्ञयागाला आंधळ्यांचा कार-

भार म्हणूं लागलीं. नंतर भौतिक शास्त्राचा (Science) चा उदय झाला. त्याची प्रथम प्रवृत्ति जरी जडवादाकडे झाली, तरी तें खोल गेल्यावर त्याला आपल्या अर्वाक्याबाहेरच्या अध्यात्माची ओळख पटली. अध्यात्मशास्त्रानें भौतिक शास्त्राच्याच भाषेनें ऋषींच्या वचनाची सत्यता मनाला पटवून दिली. अध्यात्मज्ञानी सृष्टीचें अंतरंग अंतर्दृष्टीनें समक्ष पहातो. सृष्टीच्या अंतरंगाचें ज्ञान मिळविलें म्हणजे योग्य कर्मानें सृष्टीकडून इष्ट कार्यें घडवितां येतात. हेंच यज्ञाचें मर्म. तें भौतिकशास्त्रालाहि पटलें, असो. देवयज्ञानंतर पितृयज्ञ घ्या. आपणाला ह्या जन्मांत पुष्कळ ज्ञान, सुखसोई आयत्या मिळाल्या आहेत. त्या कशानें मिळाल्या ? तर आपल्या अगोदर जगांत मनुष्यें होऊन गेलीं त्यांनीं श्रम केले, ज्ञान मिळविलें, सुधारणा केल्या, त्यांचें तें फळ आहे. म्हणजे पूर्वजांचें हें आपल्यावर ऋण झालेलें आहे. तें आपण कृतज्ञतेनें तसेच श्रम पुढील पिढ्यांसाठीं करून, फेडलें पाहिजे. त्याच्यापुढें येतो ब्रह्मयज्ञ, म्हणजे ज्ञानसंपादन व ज्ञानदान. जसजसें ज्ञान वाढेल तसतसा अंतरात्म्याचा दिव्य प्रकाश बाहेर फांकेल. त्यासाठीं रोज स्वतः कांहीं नवें ज्ञान मिळवावें, व आपणाहून अज्ञानी असतील त्यांना कांहीं शिकवावें हें अवश्य कर्तव्य ठरविलें आहे.

चवथा मनुष्ययज्ञ. सर्व मनुष्यें एकमेकांचे बंधु आहेत. म्हणून भावानें भावाला जशी मदत करावी तशी गरजू मनुष्याला सर्वांनीं यथाशक्ति मदत केली पाहिजे, हें महातत्व प्रत्यक्ष रोजच्या कर्मांत गोंविलें आहे. ‘ एकाद्या भुकेल्या माणसाला अन्न द्या, अतिथीचा देवासारखा सत्कार करा ’ असें धर्मशास्त्र सांगतें. त्यांत हेतु असा कीं हातानें एकाला अन्न देतांना, एकाला घराचें दार प्रेमानें उघडतांना, सर्वांना पोटभर अन्न मिळो अशी इच्छा मनांत वागावी; हृदयमंदिरांत प्रेमाचें द्वार उघडून सर्व मानवांचा समावेश करावा. तसाच पांचवा व शेवटचा भूतयज्ञ. मनुष्यांचे, खालच्या योनींतले, बंधू जे पशुपक्षी, कृमिकीटक इ० त्यांनाहि भावाचे नात्यानें अन्न दिलें पाहिजे, मदत, शिक्षण, दिलें पाहिजे, हें तत्व त्यांत आहे. जगांत हें एक मनुष्याचें अवश्य कर्तव्य आहे; पण त्याचा विशेष विचार करायला आज वेळ नाहीं. त्यांतला मुख्य मुद्दा हा ध्यानांत ठेवा कीं, मनुष्यें वडील भाऊ

व पशुपक्षी हे धाकटे भाऊ हें खरें नातें आहे; त्यामुळें धाकट्यांना वळण लावणें, सहाय्य करणें हें वडिलांचे कर्तव्य आहे; तें विसरून जेव्हां जेव्हां आपण त्यांशीं निष्काळजीपणा, निर्दयपणा म्हणजे पशूहूनही नीचपणा करतों, तेव्हां तेव्हां आपल्याला पाप लागतें; पशुपक्ष्यांतहि रहाणाऱ्या परमात्म्याचे आपण अपराधी होतों. तसें होऊं नये, पशुपक्ष्यांतहि असणाऱ्या, अर्थात् मनुष्यांतल्यापेक्षां अधिक झांकलेल्या, श्रीकृष्णाला ओळखण्यास शिकावें म्हणून मनुष्याला भूतयज्ञ करण्यास सांगितलें आहे. यज्ञ अर्पण करावयाचा तो अर्थात् आंतल्या देवाला, बाहेरल्या जनावराला नव्हे. हा यज्ञ करण्याची खरी रीत म्हटली म्हणजे नेहमीं पशुपक्ष्यांस सौम्यतेनें, भूतदयेनें वागवून त्यांच्या उन्नतीस मदत केली पाहिजे. आजकाल चोहोंकडे त्यांना निर्दयपणें मारहाण करतात, तशी करतां कामा नये.

अशा रीतीनें बहिरंग कर्में करीत गेलें म्हणजे अंतरंग शुद्ध होत जातें. सर्व जीवित धर्ममय होऊं लागतें. हे पंचयज्ञ करून मनुष्य आपला व्यवहारधंदा करूं लागला म्हणजे त्यांतहि एकप्रकारचा यज्ञ आहे हें त्याला कळूं लागतें. दररोज प्रथमारंभीं भक्ति–ज्ञानयुक्त पंचयज्ञ करणाऱ्याचें सर्व चारित्र यथार्थ होत असे. आतां यज्ञाचीहि कोणी पर्वा करीत नाहीं आणि व्यवहार यज्ञमय करण्याची तर त्याहून पर्वा करीत नाहीं. कोणी म्हणेल, असे यज्ञ कोठवर करावे ? सगळें जीवित त्यांतच घालवावें काय ?' त्यास, उत्तर हें कीं सारा जन्म तसें कर्म करायला नको. विशिष्ट यज्ञ वगैरे कर्मांची गरज उरली नाहीं, अशी स्थिति तुम्हाला येईल. पण केव्हां ? तर तुमचें सर्व जीवितच दीर्घ यज्ञस्वरूपी होईल, तेव्हां. तसें झालेलें नाहीं तोंवर, चरित्राला उन्नति देण्यासाठीं शास्त्रमर्यादा पाळण्यापुरतीं तरी हीं पंचविध ऋणें नित्य फेडावीं. पण दुर्दैवानें आज हिंदुस्थानांत तेवढेंहि करणारे विरळा. असें कां ? आजच्या सर्व हिंदूंची सत्वशुद्धि, सदाचार आत्मज्ञान हीं इतकीं वाढलीं आहेत काय कीं त्यांना धर्माच्या ह्या ओनाम्याची गरज उरलेली नाहीं ? तसा प्रकार मुळींच नाहीं. उलट मनूचें उत्तम वळण इतकें सुटलें आहे, हिंदूंची अवनति इतकी झाली आहे कीं त्यांना धर्माची चाड फार थोडी उरली आहे, आणि अर्थकामांचेच दास बहुत बनले आहेत.

ते देवादिकांचें ऋणहि ओळखीत नाहींत व मनुष्यांचेंहि ओळखीत नाहींत, असो.

आतां आपण रोजच्या व्यवहाराकडे वळूं. मनुष्याचें जगांत काय कर्तव्य आहे तें पाहूं. कांहीं असलें तरी मनुष्य कोणत्या तरी कुलांत, कोणत्या तरी जातींत किंवा समाजांत, कोणत्या तरी राष्ट्रांत जन्माला येतो. त्यावरून त्याचे शिरावर त्या कुलासंबंधीं, त्या जातीसंबंधीं, त्या राष्ट्रांसंबंधीं कर्तव्यांचा बोजा स्वभावतःच पडतो. ईश्वरानें जगाला कर्माचा उत्तम नियम लावून दिला आहे. त्याप्रमाणें कर्म मनुष्याला, जेथें पूर्वीचें ऋणानुबंध उगवितां येतील, मागें झाल्याच्या पुढला धडा शिकतां येईल, तेथेंच जन्म देतें. म्हणूनच असें सांगितलें आहे कीं, ज्याचें त्यानें कर्म करावें, आपलें कर्म वाईट असलें तरी तें सोडून दुसऱ्याचें चांगलें कर्म करायला जाऊं नये. देवानें दिलेल्या कर्माचाच संस्कार तुम्हाला पाहिजे असतो; त्याच कर्मांत तुमचा परमार्थ असतो; म्हणून फलाची आशा सोडून तें स्वकर्मच करीत रहा म्हणजे त्यानेंच तुमचें जन्मसाफल्य होईल, आणि योगसाधन घडेल. प्रथमच मनुष्याला फलाशा सुटणार नाहीं. कांहीं तरी इष्ट फलासाठींच मनुष्य कर्म करणार. म्हणून त्याला पहिला धडा हा सांगावयाचा कीं, आशा धरायची ती ऐहिक फलाची धरूं नको, स्वर्गाची धर. मुलासारखें मनुष्याचें मन असतें, म्हणून त्याच्यापुढें स्वर्गाचें खेळणें शास्त्र धरतें. त्याच्या लालचीनें बालमनुष्य नीतीनें वागतो, धर्म करतो. त्याचें स्वर्गफलहि त्याला निश्चयानें मिळतें. पण असें करतां करतां जीव प्रौढ झाला व त्याला योगाची हौस उत्पन्न झाली, म्हणजे त्याला शास्त्र सांगतें ' बाबा, तुला योग साधावयाचा असेल तर इहलोकच्या व परलोकच्याहि सुखाची आशा सोड आणि कर्तव्य म्हणून कर्म कर.' ह्या कार्याला चार वर्णांची योजना किती उपयोगी होती हें जरा पहा. ब्राह्मणानें ज्ञानसंपादन व ज्ञानदान करावें व तेणेंकरून सर्वांच्या उत्क्रांतीस मदत करणारी शिक्षकपरंपरा अखंड चालावी. ज्ञान द्यावयाचें त्याचे बदली धन, मान, सत्ता कांहीं एक घ्यावयाचें नाहीं, आपलें कर्तव्य म्हणून ज्ञानदान करीत रहावयाचें. किंबहुना स्वतः ज्ञान मिळवावयाचें तेंच ज्ञानाचा वंश पुढें

चालविण्यासाठीं. अशी सुव्यवस्था ज्या राष्ट्रांत असेल त्यांत निर्लोभ, निःस्वार्थी शिक्षकांची वाण पडणार नाहीं. ते ज्ञान मिळवितील तें आपमतलबासाठीं नाहीं, तर दुसऱ्यांना शिकविण्यासाठीं. आणि असें झालें म्हणजे त्यांत राष्ट्राचें शिक्षणकार्य साधेल आणि ब्राम्हणाला निष्काम स्वधर्माचरण घडून मोक्ष मिळेल.

त्याच्या पुढें क्षत्रियवर्ण. त्याला असें कर्म लावून दिलें होतें कीं, त्यायोगानें चांगले अधिकारी, कायदे करणारे, राज्यकर्ते तयार व्हावे. त्यांनीं सत्तेचा उपयोग स्वतःच्या चैनीकडे करूं नये; तर लोकांना न्याय द्यावा, श्रीमंतांना गरिबांवर जुलूम करूं देऊं नये; गरीबाला आपली मीठभाकरी निर्धास्त सुखानें खातां यावी. जगाच्या झटापटींत सर्वांना निःपक्षपातानें न्याय मिळावा. जगांत सर्वांच्या हिताकडे कोणी पहात नाहीं. जो तो आपल्या पोळीवर तूप ओढतो. यामुळें जगांत क्रोध-लोभाचा भयंकर झगडा चालतो. त्यांत राजानें बलिष्ठांना दाबांत ठेवून दुबळे चिरडूं देऊं नये. सर्वांना न्यायानें वागायला लावावें. राजा म्हणजे मूर्तिमंत धर्म, त्याच्या सिंहासनावरून प्रत्यक्ष देव न्याय देतो, असें प्रजेस वाटावें. हें क्षत्रियाचें ध्येय. हा राजांचा दिव्य आदर्श. श्रीराम आले, तसाच कित्ता घालून गेले. श्रीकृष्ण अवतरले; त्यांनींहि तसेंच दिव्य चरित्र आचरलें. पण तो कित्ता गिरविण्याची इच्छाच मनुष्यांना नाहीं. क्षत्रियांनीं आपल्या बळानें दुबळे नागविले, दीन तुडविले, गरीब गुरासारखे राबविले, आणि स्वतःची चैन केली. सामान्य जन स्वार्थासाठीं अन्यायानें झगडतील म्हणून क्षत्रियस्वरूपानें न्याय अवतरावा हें ध्येय कोपऱ्यांत पडलें. परंतु क्षत्रियाचा जन्म तें साध्य करून सर्व राष्ट्राला न्याय, सुख, वैभव देण्यासाठीं आहे. स्वसुखासाठीं नाहीं. राजासारखेंच योध्याचें कर्म. देशांतल्या किंवा बाहेरच्या उपद्रवी शत्रूंचें पारिपत्य करण्याचें त्याचें ब्रीद. दीन अनाथाचें रक्षण हें त्यांचें ब्रीद. त्यासाठीं त्यानें आनंदानें प्राणावर उदक सोडावें. त्यायोगानें इतर वर्णांना सुखानें आपल्या मुलामाणसांत रहातां येतें, आपले रोजगारधंदे निर्धास्त, निर्विघ्न चालवितां येतात. उदम्याचा उदीम, व्यापाऱ्याचा व्यापार अबाधित चालू राहतो. एकंदर देशाचे शांतीसमृद्धींत विघात होत

नाहीं. क्षत्रियानें युद्ध करावयाचें तें धनाच्या किंवा भूमीच्या लोभानें करावयाचें नाहीं. क्षत्रियांनीं आपल्या छातीचा कोट करून त्यांत सर्व प्रजेस सुरक्षित सुखशांतींत नांदविलें पाहिजे. क्षत्रियाला कर्मयोग साधावयाचा असेल तर त्यानें अशी दृढ निष्ठा धरली पाहिजे कीं ' मी निमित्तमात्र आहे, कर्ता करविता ईश्वर आहे. ' श्रीकृष्णांनीं अर्जुनास हेंच सांगितलें कीं 'कौरवांना अंतरंगीं मीं अगोदरच मारलें आहे; अर्जुना तूं निमित्तापुरतें त्यांना बाह्यात्कारीं मार. ' अशा रीतीनें ईश्वराकडे सर्व कर्तृत्व सोंपविलें म्हणजे निष्काम कर्म साधतें, व त्याचें जीवाला बंधन बसत नाहीं.

पुढें वैश्यकर्म पहा. त्यांतहि तत्व तसेंच. वैश्यानें धनधान्यसंग्रह करवा; पण तो स्वसुखार्थ नाहीं, तर देशाचे पोषणासाठीं. देशांत कोठेंहि उद्योगधंद्याला किंवा इतर राष्ट्रकार्याला धन पाहिजे तर त्यासाठीं ह्याचा खजिना सदा उघडा पाहिजे. व त्यायोगें सर्वत्र गरिबांसाठीं धर्मार्थ घरें, प्रवाशांसाठीं धर्मशाळा, रोगी माणसें व जनावरें यांसाठीं दवाखाने, पांजरपोळ, देवाच्या भक्तीसाठीं मंदिरें; सारांश राष्ट्राच्या सर्वांगी कार्यांना द्रव्याचा पुरवठा वैश्यांनीं केला पाहिजे. अशा रीतीनें वैश्यांनीं स्वसुखाची लालसा सोडून लोकहितार्थ धनसंचय करून, त्याचा योग्य व्यय केला, म्हणजे त्यांनाहि कर्मयोगानें परमात्मप्राप्तीच्या मार्गाला लागतां येईल.

शूद्राचीहि व्यवस्था तशीच. शूद्र हे राष्ट्रपुरुषाचे हातपाय. त्यांनीं जाणें येणें, नेणें आणणें, वगैरे सर्व बाहेरचीं कामें करावीं. त्यांनाहि कर्मयोग करायचा असेल तर, आपलें नेमलेलें काम, फळाचा लोभ न धरतां, संतोषानें, तत्परतेनें देवाच्या प्रीत्यर्थ केलें पाहिजे.

आतांपर्यंतच्या निरूपणाचा पुनः एकदा थोडक्यांत सारांश सांगतें. प्रथम मनुष्यें स्वसुखार्थ कर्में करतात. त्यानें त्यांना जगाचा अनुभव मिळतो. पुढें तीं रोजच्या व्यवहारांत कर्मयोग साधन करूं लागतात; म्हणजे कर्तव्य म्हणून कर्म करूं लागतात. शेवटीं कांहीं एक वासना न धरतां, केवळ स्वसंतोषानें, आपणास त्यांत आनंद वाटतो म्हणून पडेल तें काम करतात. अशा रीतीनें योग सिद्ध होतो.

स्वसुखासाठीं कर्म करणें, केलें पाहिजे म्हणून करणें, स्वसंतोषानें ब्रह्मार्पण करणें, ह्या तीन पायऱ्यांचा नीट विचार करा; म्हणजे सत्वशुद्धि ह्या शब्दाचा अर्थ तुम्हाला कळेल. ह्या सत्वशुद्धीच्याच पायऱ्या आहेत. पण ह्या खालच्या पायऱ्या. ह्यांच्यावर आणखी पायऱ्या आहेत. त्या चढून गेल्यावर मग मनुष्य अधिकारी मुमुक्षु किंवा शिष्य बनतो. त्यासाठीं तर अगोदरचा कर्माचा खटाटोप ! उत्तम सत्वशुद्धि होण्याला, शरीर तसेंच मन सर्वांगीं शुद्ध झालें पाहिजे. आतां शरीरशुद्धीचा विशेष विचार करायला वेळ नाहीं. त्यासंबंधीं भगवद्गीतेच्या उपदेशाचें स्मरण मात्र देऊन पुढें चलतें. आत्मशुद्धीला श्रीकृष्णांनीं मध्यम मार्गच पसंत केला आहे. देहेंद्रियांना व त्यांत राहणाऱ्या देवाला पीडा देणाऱ्या मार्गाचा तर त्यांनीं कडक निषेधच केला आहे; पण एरवींहि अति आहार किंवा अति निराहार वगैरे अतिक्रमाचा निषेध करून, परिमित युक्त आहारविहारानें, शांत, सौम्य पण विवेकी व निश्चयाच्या उपायानें शरीर पूर्णपणें आत्म्याचे हुकमांत आणावें, असें सांगितलें आहे. नैष्ठिक ब्रह्मचर्याचे अधिकारी फार विरळा; हें जाणून, त्यांनीं सर्व साधारणांना गृहस्थाश्रम स्वीकारण्यास सांगितलें आहे. कामविकार अजीबात दाबून टाकणें बहुतेकांस अशक्य. किंबहुना असा एकदम प्रयत्न करून, प्रकृति-स्वभावानें जोरानें उलटी उसळी मारल्यामुळें कित्येक अविचारी साधक अत्यंत दुराचारी व विषयासक्त होतात. म्हणून एका झटक्यासरशी काम समूळ उपटून टाकण्याच्या वेड्यानादीं न लागतां गृहस्थाश्रम घ्यावा आणि त्यांतच, हळुहळू, परिमित विषयसेवन करीत, आत्मसंयमन करण्यास शिकावें. अशा रीतीनें क्रमानें देहाचे सर्व धर्म पूर्णपणें शुद्ध व स्वाधीन झाले म्हणजे देह, योगमार्गाचा वरचा टप्पा चढण्यास योग्य होतो. देहशुद्धी प्रमाणेंच मनःशुद्धिही सर्वांगीं पूर्ण झाली पाहिजे. मनाचे सर्व विचार, सर्व विकार, सर्व वासना शुद्ध केल्या पाहिजेत. उदाहरणार्थ तीन विकार घेऊन ते कसे शुद्ध करावे तें सांगतें. प्रथम क्रोध घ्या आणि त्याचें रूपांतर पहा. क्रोध ही बार किंवा भडका उडविणारी दारू आहे. अगदीं रानटी मनुष्यांत त्याचा खेळ पहा. त्याच्या मनाच्या विरुद्ध कांहीं झालें कीं बरे वाइटाचा पुढचा विचार न करतां, तुटून,

विरोधी वाटेवेगळा करायचा, हा त्याचा अनिवार स्वभाव. अशी उच्छृंखळ पशुवृत्ति म्हणजे सृष्टींतली एक घातुक शक्तिच. ज्याला कर्मयोग साधायचा त्यानें ती वश केलीच पाहिजे. ती कशी करावी ? क्रोधाच्या रानघोड्याला लगाम कसा घालावा ? प्रथम, व्यक्तिविषयक रागाला आळा घालावा. आपला एकट्याचा कोणी अपराध केला तरी राग येऊं द्यायचा नाहीं, किंवा आला तरी आवरायचा, हा धडा घ्यावा. तुम्हां बहुतांचे पुढें सध्यां हेंच कर्तव्य आहे. समजा, कोणी तुमचा अन्याय केला, अपराध केला तर तुम्ही काय कराल ? रागानें वहावलात तर त्याला माराल. त्यानें तुम्हाला ठकवलें; तुम्ही त्याला ठकवायला पहाल. त्यानें उपद्रव दिला; तुम्ही उलट उपद्रव द्यायला कंबर कसाल. आणि असें झालें म्हणजे जेथें मनुष्यबंधू गुण्या गोविंदानें नांदावे तेथें क्रोधाग्नि होळी करील ! असा हा क्रोध कसा शुद्ध व्हावा ? तर याचें उत्तर, ज्यांनीं 'प्रपंच नेटका' करून त्यांतच परमार्थ मार्ग दाखविला आहे, अशा कोणत्याहि महात्म्याला विचारा. तुम्ही स्मरण करा कीं मनूनें जो दशविध धर्म सांगितला आहे त्यांत क्षमा आहे. बुद्धानें म्हटलें आहे कीं, 'द्वेषानें द्वेष कधीं शमणार नाहीं, प्रेमानें द्वेष शमतो.' ख्राइस्टचा उपदेश तसाच आहे. तो म्हणतो, 'अपकाराला तुमच्यावर जय मिळवूं देऊं नका—रागाच्या स्वाधीन होऊं नका—अपकारावर उपकारानें तुम्ही जय मिळवा. हा कर्मयोग. अपराधाची क्षमा करा. द्वेषाचे बदला प्रेम द्या. अपकार उपकारानें जिंका. असें केल्यानें वैयक्तिक रागाचा दुर्गुण जाईल. कोणी तुमचा अपराध केल्यास तुम्हाला राग येणार नाहीं. हीन, तमोगुणी अहंकार मूलक क्रोध, शांत होईल. तथापि उच्च सात्विक स्वरूपाचा क्रोध उरेल. तो असा. कोणी दुर्बळांस छळतांना दिसला म्हणजे त्याचा तुम्हांला संताप येईल. कोणी जनावराचे हाल करतांना दिसला कीं तुमचें पित्त खवळेल. कोणी गरीबाला गांजतांना पाहिला म्हणजे तुमच्या अंगाची लाही होईल. अशा सात्विक निरहंकार क्रोधाची पायरी वरची आणि आवश्यक आहे. गरिबाचा छळ पाहून निष्ठुर बेपर्वाईनें पुढें जाण्यापेक्षां छळणाऱ्याचा संताप येणें फार चांगलें. अर्थात् असा निरहंकार अन्याय-असहिष्णु क्रोध चांगला, म्हणजे तामसी क्रोधापेक्षां चांगला; साध-

काला ती उत्तम वृत्ति आहे असें नव्हे. साधकाला त्याचेंही आणखी शोधन करून त्याचे जागीं दुर्बळ, सबळ दोघांना सम-न्याय देणारी बुद्धि आणली पाहिजे. किंबहुना छळ सोसणाऱ्या दुर्बलाकडे सहज ओघानें दया जाते, तशीच ती छळणाऱ्या बलिष्ठाकडेहि गेली पाहिजे. कारण, साधकाला समजतें कीं कर्माच्या नियमानें, अन्याय करणारा त्या दुसऱ्याला अपाय करतो त्यापेक्षां स्वतःला अपाय अधिक करून घेतो. म्हणून साधकानें आपल्या न्यायी पण सदय, सप्रेम हृदयानें त्या उभयतांनां कवाळिलें पाहिजे. अशा रीतीनें जो क्रोध शुद्ध करील तो अन्याय दिसतांच त्याची बंदी करील, कारण तें त्याचें कर्तव्य आहे, पण तो अन्याय करणाराशींहि सौम्यता धरील. कारण त्यालाही सन्मार्गाला लावलें पाहिजे, सहाय्य झालें पाहिजे. एतावता जो मूळचा वैयक्तिक अन्यायानें खवळून प्रहार करणारा क्रोध, तोच, सबल निर्बल दोघांचेंही समान रक्षण करणारा, सर्व अन्याय निवारण करणारा झाला. नित्याच्या व्यवहारांत चित्तशुद्धि करतां येते ती अशी. अशाच रीतीनें अंतःकरण पूर्णपणें शुद्ध करण्याचा साधकानें अहर्निश प्रयत्न करावा.

तसाच कामविकार घ्या. त्याचें कनिष्ठ पशुतुल्य स्वरूप कनिष्ठ मनुष्यांमध्यें दृष्टीस पडतें. कामवासना तृप्त करावयाची येवढेंच त्यांचें पहाणें. तीं सौंदर्यही पहात नाहींत; किंवा पाहिलेंच तर देहाचें सौंदर्य पहातात. अंतरंग सौंदर्य, सद्गुण, बुद्धिमत्ता, सत्कलाकौशल्य, यांची त्यांनां मुळींच आवड नसते. रक्तमांसमय देहाचें सौंदर्य पहायचें, त्याच्या स्पर्शाचें सुख घ्यायचें, ह्या पलीकडे त्यांनां कांहीं सुचत नाहीं. हें कामाचें कनिष्ठ स्वरूप, केवळ देहदेवाची भक्ति, दुसरें कांहीं नाहीं. असा मूळचा कामविकार गृहस्थाश्रमी साधकानें शुद्ध करायचा तर असें करावें कीं, प्रथम कामाला प्रेमाचें रूप द्यावें. प्रियजनांच्या सुखासाठीं स्वसुखावर पाणी सोडण्याची संवय करावी. स्वतःच्या जिवाला सुख करमणूक होण्यासाठीं त्यांनां न राबवितां, आपण कष्टून त्यांचें दुःख, कष्ट, गैरसोयी चुकवाव्या; हर उपायानें त्यांची सोय करावी. प्रिय जनांवर संकट येणारसें दिसलें कीं, तें चुकाविण्यासाठीं पुढें सरून तें आपणावर घ्यावें; आणि आपल्या वांट्यास सुख येईल तें त्यांनां द्यावें.

असें केलें म्हणजे ग्राम्य कामविकाराला पतिपत्नीप्रेमाचें, बंधुप्रेमाचें, अपत्य-प्रेमाचें सुंदर रूप येईल. स्वजन, प्रियजन यांच्या सुखासाठीं झटणें आपलें कर्तव्य जाणून तो गृहस्थ कर्म करील. अशा रीतीनें शुद्ध होत होत, कामाची पूर्ण शुद्धि झाली म्हणचे मनुष्य सर्व जगावर प्रेम करूं लागतो. आपल्या कुटुंबांतलींच नव्हेत तर जीं कोणी माणसें दिसतील तीं आपलीं अशीं त्याला वाटतात. कोणी भुकेनें व्याकुळ झालेला दिसला म्हणजे तो माझा भाऊ आहे, त्याला अन्न दिलें पाहिजे, असें त्याला वाटतें. कोणी अनाथ स्त्री पाहिली म्हणजे ती आपली बहीण, तिचें रक्षण केलें पाहिजे, असें त्याला वाटतें. तो अनाथाचा नाथ, असहायाचा सहायकर्ता, निराश्रिताचा आश्रयदाता बनतो. पण तें त्या माणसांच्या प्रीतीसाठीं नाहीं तर परमात्म्याच्या प्रीती-साठीं. ही प्रीति इतकी निरपेक्ष असते कीं, ती प्रीतीचा सुद्धां मोबदला मागत नाहीं. हें कर्मयोगाचें परिपक्व फल. ह्या उत्तम प्रेमाला फलाची इच्छा नसते, कृतज्ञता नको असते, प्रसिद्धीची गरज नसते. किंबहुना प्रसिद्धी, प्रशंसा, देणाऱ्या उपकारापेक्षां गुप्त उपकार करण्याचीच त्याला अधिक हौस. प्रेमशुद्धीची पराकाष्ठा ती कीं, जेथें प्रेम केवळ दिव्य होतें. लोक सुखांत, आनंदांत, नांदावे यापेक्षां मनुष्याला दुसरी कल्पनाहि उरत नाहीं.

आतां लोभाच्या शुद्धीचा प्रकार पहा. मनुष्याला धनसंपत्तीचा लोभ कशासाठीं असतो ? तर त्यापासून स्वतःला सुख मिळतें, सत्ता मिळते, मोठेपणा मिळतो म्हणून माणसें संपत्तीचा लोभ धरतात. त्याची शुद्धि करायची म्हणजे आपल्या एकटयाच्या चैनीसाठीं संपत्ति मिळवायची ही भावना सोडून कुटुंबाच्या सुखासाठीं संपत्ति पाहिजे अशी भावना धरावी. कुटुंबांत ददात, दुःख, नसावें; कुटुंबाची भरभराट व्हावी, कुटुंबाला सुख वैभव मिळावें, अशी भावना धरली म्हणजे लोभाची केवळ आप्पलपोटी दृष्टी फांकून उदार व व्यापक होऊं लागते. आणखी एक अंश शुद्धि वाढली म्हणजे त्या लोभाला असें वाटतें कीं, पुष्कळ लोकांचें कल्याण करण्यासाठीं सत्तासंपत्ति असावी. आणि अखेरीस लोभ निर्लोभ बनतो. सत्तासंपत्ति मिळाली तर ती सर्वांस वांटून टाकायची असा अगदीं निःस्वार्थी स्वभाव बनून जातो. आणि स्वार्थाचें हीणकस पार जळून जातें.

एवढा महादेव म्हणजे सर्व देवांत श्रेष्ठ म्हणवीत असून तो स्मशानांत कां रहातो याचें तुम्हाला आश्चर्य वाटलें असेल, नव्हे? विश्वाच्या नाथाला राहाण्याला हें स्थान फार विलक्षण वाटतें. जो शुद्धीची केवळ मूर्ति त्याचें निवासस्थान, त्याचीं वस्त्रभूषणें इतकीं अशुद्ध, अमंगळ असावीं हा मोठा चमत्कार वाटतो. परंतु वस्तुतः महादेवाचें सगुणरूप जें वर्णिलें आहे तें सांकेतिक, मुद्रामय आहे. म्हणजे गूढ निराकार परमार्थ तत्वें—जीं सामान्य माणसांनां आकळत नाहींत. तींच साकारवस्तूंच्या दाखल्यांनीं सांगितलीं म्हणजे सर्वांच्या मनांत सहज भरतात-तीं त्यांत रूपकानें सांगितलीं आहेत. स्मशान म्हणजे मनुष्याचें जीवित. त्यांत शिव म्हणजे परमात्मा रहातो. त्याच्या सान्निध्यानें सर्व किल्मिष जळून भस्म होतें. तो जर त्यांत राहणार नाहीं तर सर्वत्र पापाची घाण सांचेल, नासेल, कुजेल आणि सर्वनाश करील. परंतु शिव त्यांत रहातो, त्याचा ज्ञानाग्नि त्यांत प्रज्वलित असतो; त्यामुळें देहाभिमानाचें, कामक्रोधांचें, मायाममतेचें सर्व किल्मिष अगदीं खाक होऊन जातें. नाशवंत, रोगमृत्यूचा फैलाव करणारें, कांहीं एक त्यांत रहात नाहीं. जीवात्मा हा त्याच अग्नीचा स्फुल्लिंग आहे व तो ह्या स्मशानांत पुन्हां अग्निरूप होतो.

अशा रीतीनें साधक मुमुक्षुमार्गाचा पहिला टप्पा चालून आला म्हणजे पुढें अधिकारी शिष्यपदाकडे नेणारा खरा टप्पा त्याला दिसूं लागतो. त्याच्या शेवटीं श्रीगुरुपदप्राप्ति. तेथून पुढें परम मंगलधाम जें जगद्‌गुरु-मंदिर त्याचा मार्ग लागतो. ह्या मार्गानें तुम्हांस जावयाचें आहे व हा त्याचा पहिला टप्पा मीं दाखविला आहे. तुम्ही संसारी आहां. तुम्हांला कुटुंबाचे, समाजाचे, राष्ट्राचे कर्तव्यपाश आहेत. तथापि तुमच्या अंतःकरणांत योगसाधनाची, अनित्यज्ञानापेक्षां नित्यवस्तुज्ञानाची, लालसा आहे. तुम्ही आपल्या अंतःकरणांत खोल, अगदीं तळाशीं निरखून पहा. तेथें प्रत्येकाचे हृदयांत आत्मज्ञानाची आतुरता, उदात्त आचरणाची उत्कंठा दिसेल. वरवर दृष्टीला नश्वर ऐहिक सुखवैभवाच्या क्षुद्र वासना दिसतील परंतु जो केवळ धर्मलंड व देशाभिमानशून्य झालेला नाहीं अशा प्रत्येक हिंदूच्या खोल अंतरंगांत, पूर्वपरंपरेच्या सामर्थ्यानें तरी, ऐहिक अर्था-

पलीकडल्या परमार्थाची आवड, आपली हिंदमाता आजच्या हीन स्थितींतून वैभवपदास चढावी, हिंदपुत्र आपल्या थोर पूर्वजांनां शोभणारे व्हावे, अशी आकांक्षा, अस्पष्ट तरी आहेच आहे. म्हणून तुम्हांस माझें सांगणें आहे कीं तुम्ही ह्या मार्गानें जाऊं लागा. व्यक्ति थोर झाल्याशिवाय राष्ट्र थोर होणार नाहीं, क्षुद्र स्वार्थी जनांचें महान् राष्ट्र बनत नाहीं. म्हणून आज ज्या स्थितींत तुम्ही असाल तेथेंच मी संक्षेपानें दाखविलेला मार्ग चालूं लागा. या मार्गाची गति कोणती हें शेवटीं सांगून ठेवतें. त्या अखेरच्या मुक्कामाच्या अगोदरचे टप्पे पुढील व्याख्यानांत वर्णन करीन. ती गति म्हणजे जीवशिवयोग. कर्मानें योग होतो, पैकीं कर्माचा अर्थ सांगितला. पण योग, ऐक्य म्हणजे काय ? श्रीकृष्णांनीं गुणातीताचीं लक्षणें सांगितलीं आहेत त्यांची आठवण करा. जो गुणातीत झाला, जो अमृतपदाला योग्य झाला, परमात्मज्ञानाचा अधिकारी झाला, परमेश्वराशीं सायुज्याला पात्र झाला, त्याला त्रिगुणांशिवाय ह्या जगांत दुसरा कर्ता नाहीं हें समजतें; त्याला त्रिगुणांच्या पलीकडे जें आहे तें उमजतें. त्रिगुणांचा खेळ पुढें असला तरी त्याला खेद नाहीं, नसला तर त्याची आकांक्षा नाहीं. तो शत्रुमित्र, स्तुतिनिंदा यांमध्यें आत्मैकाश्रय, सर्वत्रसमदर्शी, माती व सोनें समान लेखणारा असा होतो. गुणातीत झाल्यामुळें त्याला गुणांपासून भ्रांति होत नाहीं. ती आपली परमगति, तो शेवटचा मुक्काम आहे. त्या मार्गाचा पूर्वमार्ग किंवा पहिला टप्पा आज वर्णन केलेला आहे. तो चालून गेल्याशिवाय खरा मार्ग दृष्टीस पडणार नाहीं. पण तो चालून गेल्यावर मात्र खरा मार्ग खचित दिसेल.

---

# साधन चतुष्टय

## शम–ध्यान–शीलसंपादन.

प्रियबंधुहो, आज आपल्या एकंदर विषयाच्या ज्या विभागाचें निरूपण करावयाचें तो शिष्याचें साधन हा होय. तो नीट समजण्यासाठीं अगोदर पुनर्जन्माच्या नियमाचें थोडें निरूपण केलें पाहिजे. त्यावरून ज्याला खरा शिष्य म्हणतात ती पदवी अनेक जन्मांच्या सत्कर्मांनीं मनुष्यास कशी मिळते तें तुम्हांस समजून येईल; आणि तें समजलें म्हणजे तसें गुणकर्म बुद्धिपुरःसर तुम्हाला संपादतां येईल. काल निरूपिलेले मुद्दे तुमच्या लक्ष्यांत असतीलच. प्रथम मनुष्य स्वसुखासाठीं कर्म करतो, फलाच्या आशेनें कर्म करतो; नंतर तो हळुहळू कर्मयोग शिकून कर्तव्यकर्म म्हणून कर्म करतो, व बुद्धिपुरःसर जगाचें चक्र फिरविण्यास हातभार लावूं लागतो. कर्तव्य म्हणून कर्म करण्याच्या पलीकडे त्यांत त्यास संतोष वाटतो. तनमनधन ईश्वरसेवेस अर्पण करण्याची एक श्रेष्ठ पायरी आहे याचा थोडा उल्लेख काल मीं केला होता. कर्तव्याची भूमिका सोडून व या वरच्या पायरीवर जाऊन परमात्म्याला सर्वस्वीं आनंदानें आत्मसमर्पण केलें म्हणजे वासनेचे बंध तुटतात आणि जीव जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होतो. जन्म घ्यावा लागतो, तो वासनेच्याच संगानें. जगांत अमुक सुख भोगावें, अमुक धन मिळवावें, अमुक करावें, अशी कांहीं तरी वासना रहाते; आणि त्यामुळें जीव जन्मास येतो. कोणत्याहि ऐहिक वस्तूवर किंवा कर्मावर वासना राहिली कीं 'पुनरपि जननं' आलेंच. भूलोकांतील कोणत्याहि वस्तूंत जीवाला मोहण्याचें, आकर्षिण्याचें जोंवर सामर्थ्य आहे तोंवर तिच्यांत त्याला ओढून जन्माला घालण्याचेंही सामर्थ्य असतें. अंतःकरण वेधणारा पदार्थ जेथें असेल तेथें जीव जन्मजन्मांतरीं खेंचला जाणार हा सिद्धांत आहे.

मनुष्य जात्या 'थोराचें लेकरूं' ईश्वरतुल्य, ईश्वरांश आहे. म्हणून त्याच्या वासनेसारख्या बहिर्मुख वृत्तींतही आपल्याआपण सिद्धीस जाण्याची शक्ति

असते. मनुष्य जें इच्छील तें त्याला योग्य काल येतांच देणें सृष्टीला भाग आहे. माणसाचें दैव माणसाचे हातीं असें म्हणतात तें ह्याच कारणानें. मनुष्य मागेल तें जगानें त्याला दिलेंच पाहिजे. अर्थात् त्याची इच्छित वस्तु ज्या लोकीं असेल त्या लोकींच ती भोगण्यास त्याला गेलें पाहिजे. भूलोकच्या वस्तूची इच्छा राहिली तर ती भूलोकीं येऊन पुरविली पाहिजे. तसेंच स्वर्गादिक परलोक, जे भूलोकाच्या मानानें चिरस्थायी असले तरी एकंदरींत नश्वरच आहेत, त्यांची इच्छा धरली तरी पुनर्जन्म ठेवलेलाच; कारण स्वर्गादि लोकांत वास व सुखोपभोग परिमित असतात. इहलोकचीं सुखें दूर सारून, स्वर्गाची कामना धरून, उक्त कर्मे जितकीं कराल, तितकाच तुम्हाला स्वर्गानंद; व तो मरणानंतर यथाक्रम मिळणार. पण स्वर्गवास अशाश्वत, नश्वर आहे. त्याला पितृयान, धूमादि मार्ग म्हणजे पुनरावृत्तीचा मार्ग असें म्हटलें आहे.

( ‘ चंद्र हा स्वर्गाचें द्वार आहे ’ अशा अर्थाचें वचन आहे. ) तेव्हां स्वर्गांतीं पुनः मर्त्यलोकीं मनुष्य येतो. सारांश इहलोकीं किंवा परलोकीं वासना राहिली कीं, पुनर्जन्माचें लिगाड मागें लागलेंच. म्हणून हृदयांतील वासनाग्रंथींचा पूर्ण भेद झाला कीं मोक्ष मिळतो असें म्हटलें आहे.

मोक्ष म्हणजे जगापासून, जन्ममरणापासून सुटका असा नुसता शब्दार्थंच घेतला तर एका कल्पापुरता मोक्ष नुसत्या वासनानाशानें मिळणें शक्य आहे. पण हा एकट्यापुरता स्वार्थी मोक्ष गौण आहे. त्यासाठीं उत्क्रान्ति मार्गानें अतिशय वर जाण्याची, जीवाचा फार विकास करण्याची आवश्यकता नसते; त्यांत जगदुद्धाराचें नांव नाहीं. जग आपलें हवें तसें धडपडत आक्रंदत जावो त्याची या प्रकारच्या मोक्षार्थी माणसाला क्षिति नसते. स्वतः भवतापांतून तो सुटला खरा. पण जगदुद्धारक कर्त्या सिद्ध पुरुषांसारखी कांहीं त्याची कमाई नसते. त्याच्या अंगच्या बीजभूत ईशगुणांचा परिपूर्ण विकास या मोक्षांत होत नाहीं. केवळ एकटा आपला जीव जन्ममरणांतून तो सोडवूं शकतो. इतकेंच मला ठाऊक आहे कीं, जगांत असे अप्पलपोटे मुमुक्षु पुष्कळ आहेत. आपण सुटलों म्हणजे झालें, जगाचें कांहीं कां होईना असें त्यांनां वाटतें. असा मोक्ष तारतम्यानें सुलभ आहे हें मीं सांगि-

लेंच आहे. त्याला साधन येवढेंच कीं, सामान्यतः मनुष्यें ज्या ज्या गोष्टी-साठीं धडपडतात, त्या ऐहिक तशाच पारलौकिक सर्व वस्तु नश्वर आहेत हें माणसानें पक्कें ओळखलें पाहिजे आणि त्यांची वासना सोडली पाहिजे. या मार्गानें मोक्ष मिळतो. पण तो फक्त कांहीं काळच. कदाचित् एका मन्वंतरापुरता मिळतो; त्याचे अंतीं पुढील कल्पांत त्याला पुनः अधिक आत्मविकासार्थ जन्म येणारच; कारण मुळांत नराला निर्माण केला तो नारायण होण्यासाठीं; अल्पज्ञ आहे तो सर्वज्ञ होण्यासाठीं; त्यानें स्वतः सर्वज्ञ सर्वशक्तिमान् व्हावें आणि पुढें इतरांस, इतर जगांस सहाय्य करावें यासाठींच होय.

म्हणून मी आतां अप्पलपोट्या मोक्षाचा मार्ग सोडून अधिक थोर व उदात्त मुमुक्षूंचा जो मार्ग त्याकडे वळतें. या मुमुक्षूंसही वासनेचे बंध तोडा-वयाचे असतात. पण त्यांतला हेतु जगाच्या अडचणींतून स्वतः सुटून जावें असा नसून, ज्यास मुमुक्षुमार्ग असें नांव देण्यांत आलें आहे त्या श्रेष्ठ व उच्च मार्गास आपण जावें व ज्ञानी जीवन्मुक्तांचे अनुयायी व्हावें असा असतो. या ज्ञानी पुरुषांनीं भयानक भवारण्यांत इतरांकरितां मार्ग करून ठेविला आहे. स्वतः सुटून जावें म्हणून नव्हे, स्वतःचा त्रास चुकावा म्हणून नव्हे, तर मनुष्यजातीस सहाय्य व ज्ञान देण्याचें अंगीं सामर्थ्य यावें म्हणून जे साधक या मार्गानें जाण्यास तयार असतील, पुढें गेलेल्या ज्ञानी गुरूपासून जें मिळवावयाचें तें सगळें जगास वहावयाचा ज्यांचा संकल्प असेल अशा साधकांचा हे गुरु अंगिकार करतात. अशाप्रकारच्या शिष्यपदवीचें वर्णन सर्व धर्मांच्या ग्रंथांत ध्वनित आहे. स्वतः सिद्धि पावलेले व इतरांना सिद्धीची वाट दाखविणारे जे सद्‌गुरु, ते आहेत, ते भेटतात, असा दृढ विश्वास धरून, त्यांची प्रत्यक्ष भेट व अनुग्रह, हेंच आपलें ध्येय, हीच आपल्या देहाची इतिकर्तव्यता, असेंच सर्व धर्मांतील अत्यंत सच्छील व धार्मिक मनुष्यें मानीत आलीं आहेत. प्रत्येक धर्मग्रंथांत हा विचार आहे. तुम्ही कोठेंहि पहा. एकेक उपनिषद घ्या. त्यांत मुमुक्षूला असेंच सांगितलें आहे कीं 'बाबा, तुला मोक्ष पाहिजे तर ब्रह्मनिष्ठ आहेत त्यांना शरण जा.' तोच विचार आज मी तुम्हासमोर विवेचिणार आहें. कोणत्या साधनानें

आपल्याला सच्छिष्यपणा येईल ? काय केलें म्हणजे सद्‌गुरु भेटतील ? प्रपंच ही ईश्वराची शाळा आहे, आरंभींचे धडे शिकण्याची शाळा आहे. तर ह्या प्रपंचांत, तुमच्या ह्या असल्या स्थितींत, कसें वागलें म्हणजे गुरु-पदकमलाचें दर्शन होईल ? कशानें मला श्रीगुरु दुसरा जन्म देतील, व खरा द्विज करतील ? ह्या प्रश्नांचीं आतां मी उत्तरें देणार आहे. गुरु शिष्याला दुसरा जन्म देतात हें तत्व सर्व धर्मांत आहे, व त्याचें स्मरण व्हावयासाठीं कांहीं तरी विशिष्ट संस्कार किंवा विधिहि प्रत्येक धर्माच्या बहिरंगाच्या आचारांत सांगितलेला आहे. त्या बाहेरच्या संस्काराचा अधिक उपयोग या स्मरणांतच अधिक आहे. हिंदुधर्मात उप-नयन म्हणजे मुंज झालेल्या मुलाला द्विज म्हणजे दुसऱ्यानें जन्मलेला असें म्हणतात, पहिला देहाचा जन्म. तो आईबाप देतात. दुसरा जिवाचा जन्म तो गुरु देतो. त्याची आठवण व्हावी एतदर्थ कुटुंबाच्या पुरोहितानें किंवा बापानें मुलाचें उपनयन करण्याचा प्रघात आहे,व बाह्य व्यवहारांत म्हणूनच उपनयन झाल्यावर मुलाला द्विज म्हणतात पण त्या उपनयन संस्काराचें हल्लीं नुसतें तंत्राचें टरफल राहिलें आहे. आजच्या लौकिक संस्काराचें मूळ, जीवाचें गुरूनें केलेलें खरें उपनयन प्राचीन काळीं अस्तित्वांत होतें व आजहि आहे. त्यानें मनुष्य नुसता जातीनें द्विज झालासें होत नसे तर त्याचा खरोखरी वरच्या भूमिकेवर जणूं जन्मच होई. हें उपनयन, ही दीक्षा सद्‌गुरु देतो व त्याची प्रेरणा मानव जातीच्या परात्पर गुरूपासून, दीक्षा-धिकाऱ्यापासून (The Great Initiator–The One Initiator) मूलतःयेत्ये. असल्या दिव्य दीक्षा प्राचीन काळींही मिळत. त्याचीं प्रमाणें इतिहासांत सर्वत्र भरलेलीं आहेत. हिंदुस्थानांत आजहि कित्येक देवालयांच्या खालीं, लोकांना माहीत नाहींत असे गुप्त मठ आहेत. त्यांत खऱ्या अधिकारी मुमुक्षूंचा मात्र प्रवेश होतो, आणि खरी पात्रता असलेल्यांना दीक्षा देण्यांत येतात. आणि अशीं गुप्त दीक्षास्थानें हिंदुस्थानांतच असत असें नाहीं. प्राचीन इजिप्त देशांतही तीं होतीं. एकदोन मठांच्या वर हल्लींचे प्रसिद्ध पिरॅमिड आहेत. आज मितीस ते मठ गुप्त आहेत. कांहींशा अर्वाचीन काळीं ग्रीस देशांतून कित्येक मुमुक्षू ईजिप्तांत जाऊन दीक्षा घेऊन गेले,

त्यांत कित्येक आज प्रसिद्ध असलेले तत्ववेत्तेहि होते. ह्या हकिकती ग्रीसच्या व ईजिप्तच्या इतिहासांत नमूद आहेत. हे विधी बाहेरच्या लोकपरिचित देवालयांत झालेले होते. खरीं दीक्षा मंदिरें त्यांच्या आंत गुप्त असत. ह्या अंतर्मंदिरांत नुसत्या शद्वज्ञानानें प्रवेश मिळत नसे. त्यांत प्रवेश होण्याला बिकट परीक्षेंत पास व्हावें लागे. ती परीक्षा अति प्राचीन काळापासून आहे तशीच आहे. सिद्ध खरे आहेत, आणि सिद्धपदाची दीक्षाहि खरी आहे अशी सर्व इतिहासाची साक्ष आहे. सर्वधर्मांचे मूळ संस्थापक सिद्ध होते. त्यांनीं शास्त्रें केलीं, विधिसंस्कार बनविले. त्यांच्या सभोंवतालच्या माणसांमध्यें ते देवांसारखे चमकावे इतकें त्यांचें ज्ञानवैराग्यादि आत्मवैभव असे. आत्मा, परलोक, देव इत्यादिक धार्मिक गोष्टींचें ज्ञान ते साक्षात् स्वानुभवानें सांगत, हें विशेष लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. ते तर्क करीत नसत, तर अंतर्दृष्टीनें प्रत्यक्ष दिसणाऱ्या तत्वांचा घोष करीत. सिद्ध पुरुष वादविवाद करीत नाहींत, अधिकारयुक्त वाणीनें सत्य जाहीर करतात. ते सत्याविषयीं अनुमानें करीत नाहींत. आत्मदृष्टीनें सत्य बघतात. त्यांचा अधिकारयुक्त बोध बुद्धीला न समजला तरी बोलतांक्षणींच तो अंतरात्म्याला पटतो; त्याला वेगळें प्रमाण लागत नाहीं. कारण प्रत्येक मनुष्याचे अंतर्यामीं जो आत्मा आहे त्यासच ते हांक मारतात, आणि तो जागा होऊन त्यांस ओ देतो व त्यांनीं सांगितलेले आत्म्याचे सिद्धांत त्याला पटतात. अपुऱ्या संस्कारामुळें* बुद्धीला ते आकलन झाले नाहींत तरी आत्म्याच्या अनुभवास त्यानें बाध येत नाहीं. तर असे मूळ धर्मोपदेशक, तसेच श्रेष्ठ तत्ववेत्ते, ज्यांची कीर्ति इतिहास गातो, ते दीक्षा घेतलेले सिद्ध पुरुष होत. ते पूर्वीं होते तसेच हल्लींहि आहेत. ते जन्ममरणातीत झाले, सृष्टीचे धनी झाले; त्यांनां मृत्यु कसा स्पर्श करील ? पूर्वींच्या अनेक युगांत, मनुष्ययोनींत असंख्य जन्म घेऊन ते सिद्ध बनले. त्यांपैकीं कांहीं आपल्याच मानव कोटींतून वर चढले

---

* टीप—"या मनुष्याची बुद्धि चलाख आहे" असें आपण मराठींत जें म्हणतों त्या अर्थानें येथें बुद्धि शब्द भाषांतरकारानें योजिला आहे.

आणि कांहीं आपल्या पूर्वींच्या मानव कोटींत सिद्ध झाले होते. कित्येक अन्य ग्रहांवर सिद्ध झाले, आणि आपली मानवजाति अगदीं बाल्यावस्थेंत होती तेव्हां तिचे शिक्षक म्हणून आले. कित्येक आपल्याच जातींत सिद्ध होऊन इतरांस मार्ग दाखविण्यासाठीं राहिले. जे सिद्धमार्गानें जाऊन स्वतः सिद्ध झाले त्यांनां मृत्यु नाहीं. पूर्वकाळीं ते होऊन गेले इतकी साक्ष इतिहासानें दिली, म्हणजे खूणगाठ समजावी कीं आजहि ते आहेत. आजकाल ज्यांनां सिद्धांचें दर्शन झालें आहे, अनुग्रह मिळाला आहे, वरचेवर उपदेश मिळत आहे असे भाग्यवान् पुरुष अधिकाअधिक पुढें येऊन सिद्धांच्या अस्तित्वाविषयीं स्वानु-भवाची साक्ष देत आहेत. पण असें नसतें तरी नुसत्या पूर्वींच्या इतिहासाच्या साक्षीवरूनहि ते आज आहेत असें ठरलें असतें. पण आज-च्या काळीं, आजचे मितीसहि अनेकांनां तो प्राचीन, 'असि–धारेसारखा तीक्ष्ण' मार्ग सांपडतो, व त्या मार्गानें जाऊन ते शिष्य पदवी प्राप्त करून घेतात. असा एकेक साक्षीदार सांगूं लागला म्हणजे निःसंशय समजावें कीं आज मितीसहि सिद्ध आहेत, त्यांचा मार्ग आहे, व त्यानें आपणालाही जातां येईल, व शिष्य होतां येईल.

आतां आपण, शिष्य होऊन सिद्धमार्गांत पाउल ठेवण्याला कोणतीं साधनें लागतात, तें पाहूं. मन ताब्यांत ठेवणें हें एक प्रथम साधन म्हटलें पाहिजे. आणि हें बऱ्याच अंशीं साधल्याशिवाय शिष्य होण्याची गोष्टही काढण्याची सोय नाहीं. म्हणून मन म्हणजे काय, आणि त्याला ताब्यांत कोणीं व कसें ठेवावयाचें हें मी सांगतें. बहुतेक मनुष्यांनां मन हेंच आत्मा असें वाटतें. 'मला वाटतें, मला सुख दुःख होतें' असें लोक नेहेमीं म्हणतात तें मनाला उद्देशून म्हणतात.मन व आत्मा ह्यांत ते कांहींच भेद ओळखीत नाहींत. विचार करणारें मन तोच मी असें लोक मानतात, तुम्ही मित्रांस विचारून पहा. तुम्हांस असें आढळेल कीं जागृतींत व्यवहार करणाऱ्या देहमनापलीकडे 'मी' म्हणून कोणी आहे याची कल्पनाही बहुते-कांस नसते. ज्यांनीं या विषयाचा अभ्यास व मनन केलें आहे त्यांनां माहीत असतें कीं देहाला 'मी' म्हणणें हा भ्रम आहे. पण त्यांनाही बहुधा

हें शब्दज्ञानच झालेलें असतें, अनुभव नसतो. म्हणून त्यासारखें त्यांचें वर्तन नसतें. शास्त्रांतले सिद्धांत शास्त्रांत, आणि जगांतला व्यवहार जगांत अशी त्यांची स्थिती असते. पण अशानें शिष्य होणें अशक्य आहे. शिष्य होणाराला मनाचा संयम किती साधावा लागतो तें आतां ऐका; म्हणजे सामान्यतः एकाद्याचे अंगीं संयम आहे असें म्हणतात, त्यापेक्षां शिष्याचा संयम किती मोठा असतो तें तुम्हास समजेल. साधारणपणें एकाद्याला संयमवान् म्हणण्यांत आपला अभिप्राय इतकाच असतो कीं त्याच्या विकारापेक्षां त्याचा विचार जोरदार आहे, म्हणून त्याचा विवेक त्याचा निश्चय, यांचा पगडा त्याच्या कामक्रोधावर पडतो. मोहाचा प्रसंग आला, क्रोधकाम खवळणार असें दिसलें म्हणजे तो म्हणतो, 'मी विकारवश होणार नाहीं. मी कामक्रोधाच्या लहरींत वहावणार नाहीं. इंद्रियांना मी माझी फरपट काढूं देणार नाहीं. इंद्रियें माझे नुसते रथाचे घोडे आहेत. त्यांनां मी स्वैर उधळूं देणार नाहीं. " झालें; इतका निग्रह ज्याला आहे, त्याला सामान्यतः आपण संयमी म्हणतें. इतपत संयम साधणेंहि सोपें नाहीं हें लक्ष्यांत ठेवा. इतकें मन ताब्यांत येणें हाहि प्रशंसनीय गुण आहे हा अगोदर साधलाच पाहिजे. जे केवळ इंद्रियांचे दास, प्रपंचोपयोगी कामक्रोधांचें खेळणें झालेले आहेत, त्यांनां हा गुण मिळवायलाही महा प्रयास पडतील. पण एवढ्या मनःसंयमानें शिष्याचें भागणार नाहीं. त्याला फार जास्ती तयारी करायला पाहिजे. आपण सामान्यतः एकाद्याला दृढ-निश्चयी किंवा अनिश्चयी म्हणतों, तेव्हां आपण इतकेंच पाहातों कीं साधारण मोहाचे प्रसंगीं तो विवेकानें, विचारानें वागतो कीं विकारानें वहावतो. जो पूर्वीच्या अनुभवाचें स्मरण धरून त्यापासून स्वतःला कांहीं नियम ठरवून साधारणपणें प्रतिकूल परिस्थिति आली तरी नियम पाळतो त्याला आपण निश्चयी म्हणतों. कारण कीं तो लहरीनें वहावत नाहीं. एखादें तारूं जसें सुकाणू किंवा सुकाणूवाला यांवांचून पाण्याच्या किंवा वाऱ्याच्या लोटांबरोबर वहात जातें, तसा तो जात नाहीं. तर चांगल्या नावाड्यानें निश्चयरूपीं सुकाणूच्या सहाय्यानें इष्ट दिशेला वारापाण्याचा योग्य फायदा घेऊन चालविलेल्या जहाजा-

सारखें त्याचें वर्तन असतें. वाढता निश्चय म्हणजे आपल्या वर्तनाची दिशा आंतून आपल्या आपण ठरविण्याचा गुण. हा गुण जिवाच्या चढत्या उन्नतीचें, वाढत्या आत्मविकासाचें स्पष्ट चिन्ह आहे. मॅडम ब्लॅव्हट्स्की यांनीं जीवस्वरूपाचें निरूपण करितांनां, क्षुद्र पशुपक्ष्यांनां अहं-भावना नाहीं म्हणून स्वयंनिर्णय नाहीं आणि मनुष्याला अहंभावना आहे म्हणून स्वयंनिर्णय आहे असें सांगितलें आहे, त्याची मला येथें आठवण होत आहे. समान परिस्थितींत पशु कसे वागतात व माणसें कशीं वाग-तात तें पहा. पशु बहुधा सर्व एकाच तऱ्हेनें वागतात. परिस्थिति दाख-वील त्या मार्गानें सगळे एकामागून एक जातात, प्रतिकूल गोष्टी एक-मेकांना मारतील अशी सांगड घालून त्यांतून स्वतःच्या अकलेनें वेगवेगळा मार्ग काढणें हें काम मनुष्याचेंच. परिस्थिति, पशूचा सामान्य स्वभाव व एकदोघां पशूंचें वर्तन, एवढें कळलें म्हणजे त्यावरून त्या पशूंच्या वर्त-नाचें अनुमान तुम्हांला बिनचूक काढतां येईल. यावरून त्यांना अहंप्रत्यय नाहीं असें स्पष्ट दिसून येतें. तेंच मनुष्याचें पहा. अमुक परिस्थितींत सर्व मनुष्यें अमुकच करतील असें भविष्य तुम्हांला सांगतां येणार नाहीं. कां कीं, जो तो मनुष्य आपापल्या आत्मविकासाप्रमाणें वेगळा मार्ग धरील. प्रत्येकाला कमीअधिक अहंप्रत्यय आहे, वेगळी निर्णयशक्ति आहे. यामुळें प्रत्येकजण वेगवेगळें वर्तन पसंत करील. यावरून असें ठरतें कीं अनिश्चयी, दुर्बल मनाचा मनुष्य म्हणजे अल्प विकसित मनाचा मनुष्य आणि निश्चयी म्हणजे अधिक विकसित मनाचा मनुष्य, जीवाची अधिक उत्क्रांति झालेला मनुष्य असें समजावें.

इतकी मनुष्याची उन्नति झाली, सामान्यतः त्याचे विकार विचाराचे लगामीं आले म्हणजे त्याच्यावरची पायरी चढण्यास मनुष्यानें मनाच्या संकल्पशक्तिचें स्वरूप समजून घेतलें पाहिजे. संकल्पशक्ति म्हणजे नामरूप निर्माण करण्याची शक्ति. हिचें स्वरूप व कार्य समजण्यास थोडेसें अध्यात्म-शास्त्र शिकलें पाहिजे उदाहरणार्थ, हिंदूंचे अध्यात्म ग्रंथ पाहिले तर मनाचें स्वरूप व त्याची संकल्पशक्ति याची मनास स्पष्ट कल्पना येऊं लागते व मनाच्या सहाय्यानें मनन किंवा संकल्पविकल्प करणारा कोणी

तरी त्याच्या पलीकडे जिज्ञासूस दिसूं लागतो. मन नामक यंत्राचा उपयोग करणारा त्याचे मागें दुसरा कोणी असला पाहिजे असें वाटूं लागतें. मनुष्याला स्वतःचे मनाला इष्ट वळण देतां येतें, इष्ट संकल्प विचार करतां येतात, दुसऱ्याच्या मनावर त्यांचा पगडा बसवितां येतो, एवढ्या गोष्टींवरून सुद्धां मनाच्या पलीकडे त्याहून वेगळा करतां येईल असा, त्याचा उपभोक्ता असला पाहिजे हें सिद्ध होतें. अशा रीतीनें साधक स्वस्वरूपाचें निरीक्षण करूं लागला म्हणजे त्याला असें दिसतें कीं, हें आपलें मन फार चंचल व उद्दाम आहे. त्याला कोठें क्षणभरहि स्थिर ठेवणें फार कठीण आहे. आपल्याला न विचारतां न पुसतां वाटेल त्या, अगदीं नकोत त्या, कल्पना मनांत येतात. हव्यात त्या येत नाहींत. त्याची धुमश्चक्री अगदीं लहरीनें फिरत असते- अनिष्ट कल्पना घालविण्यासाठीं किती अट्टाहास केला तरी त्या आपला पिच्छा सोडीत नाहींत. वाटेल त्या कुकल्पना वाटेल तेव्हां येऊन मनाच्या मानगुटीं बसून त्याला घाणीला जुंपतात. त्याच्यापुढें आपला कांहींएक उपाय चालत नाहीं. असें वारंवार झालें म्हणजे साधक आपणालाच विचारूं लागतो कीं, 'ह्या कल्पना येतात तरी कोठून ? त्यांचा खेळ चालतो कसा ? यांनां लगाम कसा घालतां येईल ? ' ह्या प्रश्नांचा सूक्ष्म विचार करतां करतां त्याला असें आढळून येतें कीं आपल्या मनांत येणाऱ्या पुष्कळशा कल्पना दुसऱ्यांच्या मनांतून येतात. ज्या आपल्या स्वतःच्या कल्पनांसारख्या असतात त्याच आपल्याकडे आकर्षिल्या जातात; आणि जशा कांहीं दुसऱ्यांच्या कल्पना येऊन आपल्या मनांत घर करतात, तशा आपल्याहि कल्पना जाऊन दुसऱ्यांच्या मनावर ठसा उमटवितात. आपण आपल्या कल्पना शद्बांनीं किंवा क्रियेनें व्यक्त जरी केल्या नाहींत, त्यांचा बाहेर प्रसार करण्याची आपणाला इच्छा जरी नसली, त्यांचा प्रसार केव्हां कसा नकळत होतो हें जरी आपणाला माहित नसलें, तरी आपण कल्पना करूं लागलों कीं त्यांचा सभोंवार प्रसार होण्यास सुरवात झालीच हा मानससृष्टींतील महानियम त्याला समजतो आणि सुविचारच करण्याची जबाबदारी केवढी मोठी आहे तें त्याला कळूं लागतें. हें ज्ञान होण्याच्या आधीं मनुष्याला

असें वाटत असतें कीं प्रत्यक्ष तोंडांतून शब्द काढले, किंवा हातांनीं कर्म केलें म्हणजे मात्र त्याचा दुसऱ्यावर परिणाम होतो. पण अध्यात्मज्ञान जसजसें वाढतें तसतसें त्याला कळूं लागतें कीं, मनुष्य विचार करूं लागला कीं त्याच्या मस्तकांतून एका अदृश्य शक्तीचे फवारे किंवा लाटा सभोंवार फांकूं लागतात व त्यांचा इतरांवर परिणाम घडूं लागतो. अर्वाचीन भौतिक शास्त्राला ( सायन्सला ) ही मनाच्या सूक्ष्म क्रियांचा थोडथोडा सुगावा लागत आहे; व तेंही अध्यात्मशास्त्राचा अनुवाद करूं लागलें आहे. भौतिकशास्त्रानें प्रयोगांनीं असें सिद्ध केलें आहे कीं एका मेंदूंत विचार सुरू झाला म्हणजे, वाणीनें बोलल्याशिवाय, हातांनीं लिहिल्याशिवाय, तो दुसऱ्या मेंदूत जातो; मनाच्या कल्पनांनां दिसण्या-सारखीं ( अर्थात् विशिष्ट तयारीनें ) रूपें असतात; मेंदूंत कल्पना उठली कीं स्पंद उठतात व ते जाऊन इतर मेंदूवर आपटतात व ते दुसरे मेंदु तसे तयार असले तर त्यांनां त्या सूक्ष्म आघातांची बरोबर जाणीव घडते. शांत एकाग्र मनानें विचार केला म्हणजे तो विचार स्थूल, किंवा सर ऑलिव्हर लॉज म्हणतात त्याप्रमाणें, जड साधनांवाचून दुसऱ्या मनांत प्रविष्ट करतां येतो.

ह्यावरून असें ठरतें कीं बोलल्या लिहिल्या शिवाय एकमेकांच्या विचारांचे एकमेकांवर परिणाम घडत असतात. आपल्या डोक्यांत उत्पन्न झालेल्या विचारांच्या लाटा बाहेर जाऊन दुसऱ्यांच्या डोक्यावर आपटत असतात. दुसऱ्यांच्या विचारांच्या लाटा आपल्या डोक्यावर आपटत असतात. ह्यावरून सूक्ष्म विचारानें पुढें असें दिसतें कीं स्वतः विचार कर-णारे लोक जगांत फार थोडे. बहुतेक लोक दुसऱ्यांचे विचार आयते घेतात व त्यांनां आपले म्हणतात. पुष्कळच लोकांचीं मनें जणुं धर्मशाळांसारखीं असतात. त्यांत दुसऱ्यांचे विचार प्रवासी दिवस अर्धा दिवस रहातात व निघून जातात. बाहेरच्या विचारांचें वारें इकडून यावें व तिकडून जावें. जवळ जवळ अशा फुंकण्यांसारखीं बहुतांचीं मनें असतात. बाहेरून आंत आलेल्या विचारावर स्वतःचा कांहीं संस्कार करणारीं मनें फार थोडीं. बहुतेक लोक अशा वर्गांत येतात. आपण असें करतां कामा नये. आपण इष्ट कार्य-

सिद्धीसाठीं बुद्धिपुरःसर विचार करावयास शिकलें पाहिजे, मुद्दाम मनांत हेतु धरून विचार करण्यास शिकलें पाहिजे.

येथें साधक शंका घेईल कीं अशा मनःसंयमनाची, विचार ताब्यांत ठेवण्याची, दुसऱ्याचे विचारांना मज्जाव करण्याची एवढी काय आवश्यकता आहे ? शिष्य होण्याला ही अट कशाला पाहिजे ? त्याचें कारण असें आहे कीं मनुष्य शिष्य झाला म्हणजे त्याचा आत्मविकास झपाट्यानें होऊं लागतो. त्याची संकल्पशक्ति पुष्कळ वाढते. त्याच्या डोक्यांतला प्रत्येक विचार फार जोरदार होतो, व त्याची इतरांच्या डोक्यावर आघात करण्याची शक्ति पुष्कळ वाढते. मनाच्या संकल्पानें दुसऱ्याचा जीव घेतां येतो, रोग बरे करतां येतात, लोकसमुदायावर छाप ठेवतां येते, दुसऱ्याला नजरबंदीनें वाटेल तो भास दाखवून आडमार्गाला नेतां येतें. मनाची शक्ति अशी प्रचंड आहे व शिष्य झाल्यानंतर ती वेगानें वाढते जीवाचा विकास फार त्वरित होत जातो. सामान्य क्रमानें जो आत्मविकास होण्याला सहस्रावधि जन्म लागतात, तो शिष्याचा अगदीं थोड्या जन्मांत व्हावयाचा असतो. यास्तव एवढी क्रांति सहन करण्याची व मनाची प्रचंड शक्ति चांगल्या रीतीनें वापरण्याची योग्यता अंगीं येण्यास शिष्याला मनःसंयम अवश्य आहे. मनांत दुर्विचाराला, परपीडेच्या विचाराला थारा न देता निरंतर मंगलकारक,सर्व जगद्धिताचे विचारच मनांत वागवायचे इतका ताबा मनावर बसला पाहिजे. ह्या कारणासाठीं मनःसंयमाची अट चेला होण्यास ठेविली आहे. सद्‌गुरूच्या अनुग्रहानें मनाच्या हत्यारांत अमोघ वीर्य उत्पन्न करण्याचे अगोदर, त्या हत्याराचा बुद्धिपुरःसर सदुपयोग करायला शिकलें पाहिजे. पूर्ण विचाराशिवाय, लहरीनें त्याचा कधीं उपयोग केला जाणार नाहीं अशी खबरदारी आधीं घेतली पाहिजे.

मला माहीत आहे, या ठिकाणीं तुम्हाला एक शंका येईल. तुम्ही विचाराल कीं ‘ विकास होतो तो कोणाचा होतो ? संयम, संकल्पशक्ति वाढते म्हणतां ती कोणाची ? ‘मनयंत्राचा उपभोक्ता, मनाच्या पलीकडचा, मनाहून श्रेष्ठ’ वगैरे वर्णन तुम्ही करतां तो कोण ? हें तत्व नीट समजण्या-

साठीं एक जगांतला दृष्टांत देतें. त्यावरून जीवात्मा जन्मतो कसा व वाढतो कसा ह्याचें चित्र तुमच्या मनावर स्पष्ट उमटेल. समजा कीं हवेंत पाण्याची वाफ खूप भरलेली आहे, अशा ठिकाणीं तुम्ही गेलां आहां. तेथें उष्णता पुष्कळ आहे, यामुळें पाणी अदृश्यरूपानें हवेंत भरलेलें असूनही ती जागा अगदीं रिकामी दिसत आहे. तुम्ही म्हणाल तेथें नुसती हवा आहे. दुसरें कांहीं नाहीं. इतक्यांत समजा तेथें एक रसायनशास्त्रज्ञ आला. त्यानें कांहीं हवा एका बाटलींत भरली, व शीत उपचारानें तिचें उष्णतामान क्रमानें उतरविलें तर काय होईल ? कांहीं वेळानें बाटलींत थोडें धुकें दिसूं लागेल, दोन क्षणांनीं तें अधिकाधिक दाट बनेल व शेवटीं त्या रिकाम्या दिसणाऱ्या बाटलींत पाण्याचा थेंब दिसूं लागेल. हा दृष्टांत ह्या जड सृष्टींतला व फार ओबडधोबड आहे, तरी त्यावरून मनुष्याचा जीवात्मा परब्रह्मापासून कसा उत्पन्न होतो, याची तुम्हाला किंचित्‌शी कल्पना होईल, निराकार निर्गुण सर्व चराचराचें आदिकरण 'एकमेवाद्वितीयं' अशा ब्रह्मापासून जणूं काय एक अंधुक ढग उद्भवतो. पुढें तो हळुहळूं आपल्या कारणापासून वेगळा दिसूं लागतो, व अधिकाधिक घन बनतो. सर्वमय समष्टींतून वेगळा निघून, व्यष्टि, जीव, वेगळा, मधाच्या थेंबासारखा दिसूं लागतो. समष्टिब्रह्माचें व त्याचें वास्तविक स्वरूप एक, गुण एक, पण उपाधि वेगळी यामुळें तो वेगळा, व वेगळ्या गुणांचा दिसतो. अशा रीतीनें मनुष्य जीवात्मा उपाधीमुळें ब्रह्माहून वेगळा झाला आहे; व अनेक जन्मसंस्कारांनीं विकास पावत आहे. त्याला शेंकडों, हजारों, जन्म घ्यावे लागतात. मन हें एक त्यानें स्वतःचें अंग जगाचा अनुभव घेण्यासाठीं, विचार करण्यासाठीं, बाहेर काढलें आहे. अलीकडे प्राणिशास्त्रवेत्त्यांनीं आमीबा नांवाच्या अणु जीवांचा शोध लावला आहे. त्यांना वेगवेगळे अवयव मुळींच नसतात. त्यांचें सर्व शरीर म्हणजे एक गोल अणु. त्यांना अन्न खाण्याची इच्छा झाली म्हणजे ते आपल्या गोल शरीरांचा कोणता तरी एक भाग बाहेर काढतात व त्याचे द्वारें अन्न शरीरांत ओढून घेतात. नंतर तो बाहेर काढलेला भाग पुनः गोल शरीरांत ओढला जातो व गोलरूप होतो. त्याचप्रकारें मानव जीवात्मा आत्मपोषण, आत्मविकास करण्यासाठीं, भूलोकाचा

उपभोग घेण्यासाठीं, मनरूपी अंतरंग आपल्यांतूनच बाहेर काढतो. आपण स्वतः अर्थात् आपली जाणीव ज्यास मन किंवा बुद्धि * असें म्हणतात त्यापेक्षां विस्तृत आहे. पूर्वीच्या सर्व जन्मांतले अनुभव, ज्ञान, संस्कार आत्म्यांत (म्हणजे आपल्या जाणिवेंत) सांठविलेले असतात. अल्पज्ञानवान् मन हें आपलें एक अंग; बहु किंबहुना सर्व ज्ञान असणारा आत्मा म्हणजेच आपली जाणीव किंवा खरे आपण. इहलोकांत स्थूल देहानें आपण जन्म घेतों तेव्हां, पूर्वीपेक्षां अधिक आत्मविकास होण्यासाठीं, आत्म्याचें एक लहान अंग बाहेर काढतों त्या अंगाला आपण लहान आत्मा म्हणूं, आणि मूळ जाणीवेला किंवा आत्म्याला मोठा आत्मा म्हणूं. हा आपला मोठा आत्मा अनेक पूर्व जन्मांतील अनुभवांनीं शहाणा झालेला असतो. तो धाकट्या आत्म्याला त्यानें काय करावें यासाठीं खुणवितो व धाकटा आडवाटेला जाऊं लागला म्हणजे इशारा देतो, नको म्हणतो. अशा रीतीनें सर्व संशयांत मनाला आंतून, ' हें चांगलें, तें वाईट; चांगलें कर, वाईट करूं नको' असें (पूर्वीच्या अनेक जन्मांतील अनुभवावरून) सांगणारा आपलाच मोठा आत्मा होय. ह्यालाच सदसद्विवेक किंवा मनोदेवता हें नांव देतात.

आतां आपल्याला ठाऊक आहे कीं आपला हा धाकटा आत्मा, म्हणजे मन, आवरणें कठिण आहे. श्रीकृष्णांनीं अर्जुनाला योगाचा उपदेश केला तेव्हां अर्जुनालाही हीच अडचण पडली हें तुम्हाला आठवत असेल. तो म्हणाला, 'श्रीकृष्णा, मन चंचल, दांडगें, उद्दाम, बलवान् आहे. वायूच्या-प्रमाणेंच त्याचा निग्रह करणें फार कठिण आहे. ' हें अगदीं खरें आहे. जो कोणी मनाचा निग्रह करण्याचा खरा प्रयत्न करतो त्याला असाच अनुभव येतो. मन एकाग्र करण्याचा अभ्यास करणाऱ्या प्रत्येकाला मन चंचल, बलिष्ठ, उद्दाम व आवरायला कठिण असेंच प्रत्ययाला येतें. पण त्यावर श्रीभगवंतांनीं अर्जुनाला तोड सांगितली ती लक्षांत धरा. ते म्हणाले,

---

* १ पृ. वरील टीप पहा.

'अर्जुना, मन खरेंच चंचल व आवरायला कठिण आहे. तथापि अभ्यास व वैराग्य ह्या उपायांनीं तें आकळितां येतें' ह्या दोहोंशिवाय त्याला उपाय नाहीं. अभ्यास म्हणजे वारंवार न कंटाळतां प्रयत्न केला पाहिजे. व तो तुमचा तुम्ही करावयास हवा. तुमचा प्रयत्न गुरूला करतां येणार नाहीं. तुमचें तुम्हीच दृढ निश्चयानें अभ्यास करून मन आकळायला शिकलें पाहिजे मग पुढें गुरु भेटण्याची गोष्ट. हें साधन म्हणजे त्यांच्या लोक-प्रसिद्ध उपदेशांतला ओनामा. जोंवर तोही येत नाहीं तोंवर त्यांच्या पद-कमलाचें दर्शन करण्याची इच्छा केवळ शुष्क आहे. हा तेथें तुमच्यापुढें प्रत्यक्ष ईश्वरावतार जगद्गुरु श्रीकृष्णाचे मुखांतला उपदेश आहे. ते सांगताहेत कीं मनोनिग्रह साध्य आहे व तो साधलाच पाहिजे. देव स्वतः अवतार घेऊन जें साध्य म्हणून सांगतात, तें साध्यच असणार. आपण निर्माण केलेल्या जीवांचें सामर्थ्य किती आहे, हें ते जाणतात, व जाणूनच सांगतात. म्हणून स्वतः परमेश्वर जी गोष्ट आहे व अवश्य साधली पाहिजे असें सांगतो, ती गोष्ट, त्याला खोटें ठरवून, असाध्य म्हणण्याचें धार्ष्ट्य आम्ही करावें काय ?

मग हें साधन साधावें कसें ? तर भगवान् सांगतात, 'सतत अभ्यासानें' साधावें. याचा अर्थ असा कीं आपण आपल्या रोजच्या व्यवहारांत मन ताब्यांत ठेवून स्थिर करण्यास शिकलें पाहिजे. क्षणभर एकाद्या विषयावर मन स्थिर करून पहा. तुम्हाला असें आढळेल कीं, मन स्थिर रहात नाहीं, दशदिशा पळूं लागतें. मग काय करावें ? पुनः पुनः त्याला इष्ट विषयावर आणून बसवा. कोणता तरी एक विषय घ्या व त्यावर स्पष्ट एकसूत्री विचार करा. तुम्हा हिंदूंना ह्या अभ्यासास पुष्कळ अनुकूलता आयत्या मिळालेल्या असतात हें स्मरा. तुम्हाला पूर्वपरंपरा अनुकूल, शरीरें सात्विक अन्नानें पोषिलेलीं अनुकूल, लहानपणीं उपनयन झाल्यापासून ध्यानाची संवय अनुकूल, मन स्थिर करणें तुम्हाला कठिण असलें तर पाश्चिमात्य देशीं जन्मलेल्या मनुष्यांना तें सातपट कठिण जातें. मन एकाग्र करण्याचा भाग त्यांच्या धर्मशिक्षणांत नसतो; आणि साधारणपणें सर्वांची प्रवृत्ति सतरा विषयांकडे धांवण्याची असते. एक लहानसें उदाहरण वर्तमानपत्रें

वाचण्याचें घ्या. पुष्कळ लोक दररोज ३।४ वर्तमानपत्रें वाचतात. ही संवय म्हणजे मन एकाग्र करण्याच्या अभ्यासाला मोठें विघ्न आहे. मन सतरा- ठिकाणीं दवडावें लागतें. रोजच्या ताज्या तारा वाचणें म्हणजे इंग्लंड, फ्रान्स, मेक्सिको, न्यूझीलंड, चीन, अमेरिका वगैरे जागीं मनानें जाणें. तें झालें म्हणजे थोर लोकांच्या हकीकती; नाटकगृहांत होणाऱ्या नाटकांवर टीका; कोर्टांतल्या खटल्यांच्या हकीकती; घोड्यांच्या शर्यती; खेळ, तालिम, वगैरे वगैरे, वर्तमानपत्री विषय तुम्हांस ठाऊक आहेतच. असल्या सटर फटर विषयांत रोज मनाच्या शक्तीचा अपव्यय करण्यापासून केवढें नुक- सान आहे हें लोकांना कळत नाहीं. इंग्लंडांत तुम्हाला, रोज ६।७ पत्रें वाचणारीं माणसें सांपडतील. अशा व्यसनानें तेवढा वेळ मनाची शक्ति वायां दवडली जाते इतकेंच नाहीं तर पुढें मनुष्याला मन एकाग्र करणें अशक्य होतें; वरतीं, सत्कारणीं लावण्यासारखा आयुष्याचा काळ वायां जातो, तो निराळाच. आतां तुम्ही जगांत रहाणाऱ्या माणसांनीं भोंवतालच्या हकीकतीविषयीं अज्ञान रहावें असें मी म्हणत नाहीं. परंतु जगांतील मुख्य मुख्य प्रचलित गोष्टींची माहिती देणारें एक वर्तमानपत्र घेऊन, स्वस्थपणें १५।२० मिनिटें देऊन तें चांगलें वाचून काढावें; ज्याला वाचावें कसें हें कळतें त्याला बाह्य जगाची जरूर तेवढी माहिती होण्याला तेवढें वर्त- मानपत्रवाचन पुरे.

आधुनिक जगाच्या मानसशक्तीची उधळपट्टी करण्याच्या व्यसनावर औषध म्हणून प्रत्येक दिवशीं कांहीं नियमित विषयावर मन एकाग्र करून सूत्रबद्ध विचार करण्याचा अभ्यास ठेवा. परमार्थाचा बोध करणाऱ्या एकाद्या ग्रंथांतला कांहीं भाग, अनित्य गोष्टी सोडून नित्य वस्तूकडे मन लावणारा कांहीं भाग, मनोभावानें पूर्ण लक्ष देऊन पठन करण्याचा नित्य नियम धरा. तेवढा वेळ तरी मनाला इकडे तिकडे भटकूं न देतां त्याच विषयावर स्थिर करा. इष्ट विषय सोडून मन गेलें कीं लागलीच पुनः मागें आणून त्याला त्याच विषयावर लावा. असा नित्य अभ्यास केला म्हणजे मनाची शक्ति वाढेल, तें तुमच्या ताब्यांत राहूं लागेल व इष्ट विषयाकडे तें लावतां येईल. याचा प्रपंचांतील व्यवहारांतही फार उपयोग आहे.

मन ताब्यांत ठेवणाऱ्याला परमार्थमार्ग सोपा होतो येवढेंच नाहीं; त्याला व्यवहारांतही सिद्धि मिळते. ज्याला एकसूत्रानें, स्वच्छ रेखीव विचार करतां येतो त्याला प्रपंचहि उत्तम करतां येईल. तात्पर्य अशा रीतीनें मनःसंयमनाचा अभ्यास गौण प्रपंचांत तसाच मुख्य परमार्थांतहि मोठें सहाय्य करतो. असा सामान्य मनःसंयम साधला म्हणजे पुढें शिष्य होण्यास लागणारा श्रेष्ठ संयमही पायरीपायरीनें साधेल.

मग ध्यानाच्या अभ्यासाची गोडी उत्पन्न होईल. ध्यान म्हणजे बुद्धिपुरःसर, यथाशास्त्र, मन स्थिर व एकाग्र करणें. याचा नित्य नियमानें अभ्यास ठेवला पाहिजे. त्या योगानें शारीरिक व मानसिक संस्कारशक्तीचें सहाय्य मिळतें. म्हणजे, रोजच्या संवयीनें अंगवळणी पडून प्रथम अवघड वाटणारें काम पुढें सोपें होतें; पहिल्यानें मन स्थिर करायला सायास लागतात, नंतर तेंच अनायासें होतें. साधकानें विचारवर्धक व भक्तिवर्धक अशा दोन्ही प्रकारच्या ध्यानाचा परिपाठ ठेवावा. सद्गुरूंचें दिव्यदर्शन अद्यापि आपल्याला झालेलें नाहीं तथापि तें अखेरीस आपल्याला करून घ्यावयाचें आहे ह्या दृढ निश्चयानें भक्तिभावानें आर्द्र झालेलें अंतःकरण त्यांच्या दिव्य गुणांत तन्मय करून ध्यानस्थ बसावें. गुणचिंतनाची धारा अखंड राखावी. अभ्यासानें मन शुद्ध व स्थिर होत जाऊन थोडथोडें तदाकार बनूं लागेल. ध्यान करतां करतां ध्येयाकार बनणें हा मनाचा स्वभावधर्मच आहे. म्हणून सर्व दोषरहित सर्वगुणपूर्ण आदर्श पुरुष जे सद्गुरु त्यांचें ध्यान नित्य केल्यानें साधकांत त्या गुणांची छाया दिसूं लागते. अशा रीतीनें सद्गुरुदर्शनाच्या आतुरतेनें ध्यानाचा अभ्यास दृढ झाला म्हणजे बहिर्मुख मन शांत होईल, स्तब्ध होईल; बाह्य जगाची विस्मृति पडेल आणि आपल्या खऱ्या दैदीप्यमान आत्मरूपाची खोलांत असलेल्या जाणीवेची प्रतीति येऊं लागेल. बाह्य मनाची चंचलता मोडली म्हणजे तें शांत, लहरीरहित सरोवरासारखें बनतें, आणि त्या शांत निश्चल आरशांत चिद्गगनांत झळकणाऱ्या आत्मसूर्याचें हुबेहूब प्रतिबिंब पडतें. आणि मग ऐकींव वा पुस्तकी ज्ञानानें नव्हे तर स्वानुभवानें विज्ञान उदय पावतें कीं, मी संकल्प, विकल्प, तर्कवितर्क करणाऱ्या

मनाहून अधिक आहे, त्या मनाच्या पलीकडला, अगाध ज्ञानमय, आत्मा आहे. या रीतीनें त्या आत्म्याशीं एकरूप होण्याचा आपणांस प्रारंभ करत येतो. एक क्षणभर जरी आत्मरूपाचा अनुभव एकदां आला तरी 'मी हें नव्हे, तें आहे' 'कनिष्ठ जाणीव नव्हे, श्रेष्ठ जाणीव आहे' अशी आठवण होणें सोपें होत जातें. धाकटा आत्मा तो आपण नव्हे, मोठा आत्मा म्हणजे आपण असें धर्मग्रंथ सांगतात ना ? छांदोग्य उपनिषदांत तत्त्वमसि तें तूं आहेस हें महावाक्य आहे त्याचा अर्थ काय ? 'तूं बुद्ध आहेस' या वाक्याचा बुद्धधर्मी लोकांस जप सांगितला आहे. सर्व सद्गुरूंनीं असाच बोध केलेला आहे कीं मनुष्या तूं स्वभावतःच देव आहेस. परंतु कितीहि तर्क, अनुमान, पांडित्य केलें तरी ध्यानानें स्वानुभव आल्याशिवाय व श्रेष्ठ जाणीवेचें प्रतिबिंब आपल्या मनांत पडण्याइतकी प्रगति झाल्याशिवाय अशा वाक्यांचें विज्ञान कदापि होणार नाहीं. मनांत प्रतिबिंबित होणारी ही श्रेष्ठ जाणीव म्हणजेच आपण हें पुढें आणखी ध्यानानें अनुभवास येतें व मग मनुष्यास देवत्व देणाऱ्या महावाक्यांचा अर्थ उमजतो.

अशा रीतीनें ध्यानाचा अभ्यास प्रतिदिनीं, प्रतिमासीं, वर्षानुवर्ष, केला म्हणजे मग हळूहळू सर्व दिनचर्या ध्यानमय होऊं लागते. प्रथम प्रथम ध्यानाच्या वेळीं मात्र मी आत्मा आहें, देह नव्हे ही भावना जागृत असते. पण पुढें, सर्व व्यवहार करीत असतांहि ती अखंड जागृत रहाते. तुम्ही म्हणाल "प्रपंचकार्यांत मन गुंतलें असतां ती उन्नत भावना कशी जागृत राहील ? कनिष्ठ जाणीवेनें व्यवहार एकसारखे चालू असतांना वरिष्ठ जाणिवेशीं अनुसंधान कसें राहूं शकेल ?" तर त्याला दृष्टांत पूजेचा आहे. तुम्ही रोज पूजा करतां तेव्हां हात फुलें वाहण्यांत, तोंड मंत्र म्हणण्यांत जरी गुंतलेलें असतें तरी मन देवाकडे लागलेलें असतेंना ? मन कांहीं देहाच्या क्रियेंत गुरफटत नाहीं. तें ईश्वरस्वरूपीं तल्लीन होतें. तद्वतच व्यावहारिककर्मरूपी फुलें यथायोग्य रीतीनें वहाण्यांत देह गुंतलेला असतो तेव्हांहि, आत्मा परमात्म चरणीं लीन होऊं शकतो. एकदां मन इंद्रियांपासून चिन्मय आत्मा वेगळा करावयास शिका, म्हणजे मग 'आपण' आपलें उच्च अधिष्ठान कायम राखून, केवळ मनानें, इंद्रियांनीं

तीं तीं व्यवहारकार्यें करूं शकतों, असा अनुभव हळूहळू तुम्हांला येईल. प्रापंचिक कार्यांच्या भोंवऱ्यांत देह मन कितीहि गिरक्या खात असलें तरी आत्म्याचें आसन ढळत नाहीं. अशा अभ्यासानें मनुष्य खऱ्या शिष्यपणाला पात्र होतो.

आतां आपण, मी ज्याला विचारवर्धक ध्यान म्हटलें, त्याकडे जरा नजर टाकूं. त्याच्या योगानें मनुष्याला बुद्धिपुरःसर प्रयत्नानें हळूहळू आपला स्वभाव, आपलें शील, हवें तसें उत्तम गुणवान् बनवितां येतें. येथें पुनः आपल्याला कर्मयोगशास्त्र जी भगवद्गीता तिच्याकडे गेलें पाहिजे. तिच्या १६ व्या अध्यायांत दैवी संपत्तीचें म्हणजे साधकानें कोणते सद्गुण संपादन करावे, म्हणजे पुढील जन्मीं ते त्याला जन्मतःच मिळतील, याचें वर्णन आहे. तेथें श्रीकृष्ण अर्जुनास म्हणतात, 'अर्जुना, ही दैवी संपत्ति जन्मतःच तुझे ठायीं आहे.' तशी ती तुम्हांस पुढील जन्मीं जन्मसिद्ध पाहिजे तर, ह्या जन्मीं तीं संपादिली पाहिजे. प्रपंच साधून परमार्थ ज्याला साधणें असेल त्यानें त्या यादींतील एकेक गुण घेऊन त्याचें ध्यानाचे वेळीं ध्यान व व्यवहाराचे वेळीं आचरण, असा दुहेरी अभ्यास केला पाहिजे. उदाहरणार्थ त्यांत सत्वसंशुद्धि हा एक गुण सांगितला आहे. तो कसा अंगीं आणावा ! तर सकाळीं कांहीं वेळ शांत एकाग्र अंतःकाणानें शुद्धतेचें ध्यान करावें व त्या गुणाचा सर्व अर्थ मनांत बिंबवावा. नंतर दिवसभर सर्व व्यवहारांत आपल्या मनाला, वाणीला किंवा शरीराला अशुद्धतेचा गंधहि न लागेल असें वागावें. द्विजांच्या तीन पदरी यज्ञोपवीताचा एक अर्थ ही त्रिविध शुद्धता आहे हें मागें एका प्रसंगीं मीं सांगितलेलें आहे. सकाळीं 'मला दिव्य शुद्धता प्राप्त होवो' अशी उत्कट एकाग्र भावना करून बसावें. नंतर दिवसभर स्मरण ठेवून आपल्या प्रत्येक कर्मावर लक्ष्य ठेवावें. अशुद्ध कर्माचा कलंक देहाला लागूं नये म्हणून दक्ष रहावें. तशीच वाणीवर नजर ठेवावी. घाणेरडा एकहि शब्द तोंडांतून निघणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी. सद्गुरूंची आपल्यावर सतत नजर आहे व यत्किंचित् कलंकही त्यांना दिसल्यावांचून रहाणार नाहीं हें जाणून, सद्गुरूंनीं ऐकण्यास योग्य

असा पवित्रच प्रत्येक शब्द बोलावा. कुशब्दांनीं आपली जीभ किंवा दुसऱ्याचे कान कधीं विटाळूं नयेत. तसेंच मन शुद्ध ठेवावें. मलीन विचार मनांत येऊं नये; आलाच तर तत्काळ बाहेर घालवावा. कुविचार आकर्षक असा मल आपल्या मनांत असल्यावांचून कुविचाराचा प्रवेश कधीं होणार नाहीं.हें जाणून मनांतले सर्व मळ समूळ धुवून काढावे.अशा रीतीनें सर्व दिसवभर शुद्धता ह्या गुणाची जोड करावी. तसेंच कधीं सकाळीं सत्याचें ध्यान करावें. सत्य जगाचा आधार आहे, सर्व लोकव्यवहारास सत्य अवश्य आहे, सत्यच शीलाचा पाया आहे अशा प्रकारें सत्याचें मनन करावें मग प्रपंचव्यवहारास लागल्यावर दुसऱ्याचा यत्किंचित् असत्य ग्रह होईल असा एक शब्दहि बोलूं नये, किंवा असें कर्म करूं नये. साधक असत्य तर बोलणार नाहींच पण कमी जास्तीही बोलणार नाहीं. कारण तितकें तें भाषण असत्यच होतें. न्यूनाधिक करून हकीकत सांगणें म्हणजे असत्य कथनच होय. शिष्य होणारानें तिखटमीठ लावून बातमी सांगणें, भाषणांत असत्याची लवमात्र छाया पाडणें, आपल्याला जें जसें माहित आहे त्यांत बालाग्र अंतर करणेंहि वर्जिलें पाहिजे. विचारांतही सत्य पालन केलें पाहिजे; प्रत्येक विचार यथातथ्य केला पाहिजे त्याला असत्याचा लेश लागतां कामा नये. त्याच प्रकारें दया गुण संपादावा. दिवसारंभीं त्याचें चिंतन व दिवसभर त्याचें आचरण. आपल्याभोंवतीं जीं माणसें असतील, आपलें कुटुंब, इष्टमित्र, शेजारीपाजारी यांची यथाशक्ति सेवा करावी. ह्यांच्या होईल तितकें उपयोगी पडावें. दीनास दान, दुःखिताचें समाधान करावें. दया व उपकार हा अंगस्वभावच बनवावा. तसेंच धैर्य अभ्यासावें. आरंभीं ज्याचें मन सुखदुःखांनीं हेलकावत नाहीं, जयापजय यांनीं ज्याला हर्षविषाद होत नाहींत, आज प्रिय होतांच आनंद शिखरावर, उद्यां अप्रिय होतांच खेददरींत असे झोके जे खात नाहींत अशा धीरपुरुषांचें भक्तीनें चिंतन करावें. नंतर स्वतः व्यवहारांत दृढ धीरवृत्तीचा अभ्यास करावा. दुःख आलें तर दुःखरहित अशा शाश्वत आत्मरूपाचें चिंतन करावें. धनहानि झाली तर आपल्या अक्षय ज्ञानधनावर नजर देऊन संतोष मानावा. मृत्यूनें प्रियजन हरण केला, तर असा विवेक करावा कीं, कोण-

ताहि आत्मा मरत नाहीं. आपल्या प्रिय आत्म्यानें एक जीर्ण देहवस्त्र टाकून दुसरें धारण केलें आहे व त्याची आपली पुनः अक्षय भेट होणार आहे. अशाच रीतीनें आत्मसंयमन, शांति, अभय इत्यादिक सर्व गुण अभ्यासानें संपादावे. सर्व एकदम घेऊं नयेत. एकदम सर्वांचें चिंतन व आचरण कोणासही साधणार नाहीं. एकेक गुण क्रमानें घ्यावा व संथ दृढ निश्चयानें ध्यानाचरणानें तो अंगीं ठसवावा. काळ जातो म्हणूं नये. श्रमाला भिऊं नये. अशी जी कमाई कराल ती अक्षय होईल. एकेक गुण अंगीं आला तो शाश्वत आपला झाला हें समजून संथ प्रयत्नाला कंटाळूं नये. केवळ ध्यान किंवा केवळ आचरण यानें शील बनणार नाहीं. दोन्ही जोडीनें चाललीं पाहिजेत, म्हणजे उत्तम शील बनतें.

अशा रीतीनें जो आत्मसुधारणा करील, तनु, मन झिजवून सद्गुरु कृपेची पात्रता अंगीं आणण्यास जो आपली पराकाष्ठा करील, त्याला खचित सद्गुरु भेटतील. त्याच्या अंतरात्म्याला त्यांचा साक्षात्कार होईल. कारण तुमची अशी का मूढ समजूत आहे कीं, त्यांना लपून रहाण्याची आवड आहे? मायामोहानें व्याप्त झालेल्या तुमची अशी का कल्पना आहे कीं मनुष्यजातीला सहाय न करतां भवाटवींत ठेंचाळत पडत, झडत मार्गक्रमण करायला लावून ते बुद्धिपुरःसर पडद्याआड गंमत पहात बसतात ! मी म्हणतें कीं तुम्हाला कधीं क्षणभर सद्गुरुलाभाची इच्छा होत असली तर त्यांना सतत सहस्रवार अधिक आतुरता सच्छिष्यप्राप्तीची व त्याला सहाय करण्याची असते. मानव सृष्टीवर दृष्टी टाकतां त्यांना असें दिसतें कीं कितीतरी परोपकारी सहायकर्ते जगाला हवे आहेत पण मिळतात किती थोडे ! जनता अज्ञानांत खिचपत आहे, तिला ज्ञान द्यायला शिक्षक नाहींत, ती मरत आहे, तिला वांचवायला कोणी नाहीं. सद्गुरूंना असे शिष्य हवे असतात कीं जे त्यांचा उपदेश घेऊन जगांत राहून दीनांस सहाय करतील, अज्ञानांस ज्ञान देतील. सर्व मनुष्यांवर सद्गुरूंची सतत टेहळणी असते. आपला उपदेश घेण्याला कोण पात्र आहे? आपल्या उपदेशाचा अव्हेर न करतां भक्तीनें स्वीकार करण्यासारखें शुद्ध एकाचें तरी अंतःकरण आपणांला सांपडावें अशी त्यास आस लागलेली असते. प्रतिबंध असतो

तो आपणांकडूनच असतो. आपण आपल्या हृदयाचीं कपाटें पक्कीं लावलेलीं असतात त्यामुळें त्यांचा प्रवेश होत नाहीं माणसाच्या मनांतलीं कपाटें फोडून जबरीनें शिरण्याची त्यांना परवानगी नाहीं. मनुष्यानें आपण स्वतः-च जर हृदयकपाटें लावून घेतलीं, आपल्याभोंवतीं कामाचे, क्रोधाचे लोभाचे कोट बांधले तर सद्‌गुरू बिचारे काय करणार ? ते बाहेर तिष्ठत असतात, कीं कधीं द्वार उघडेल ? व ज्ञान भक्तीचा दिव्यप्रकाश आम्ही कधीं आंत पाहूं.

तुह्मी म्हणाल, कोट्यवधि मनुष्यांत अमुक मनुष्य आपलें काम करीत आहे, आपणांस आंत येण्यास योग्य परिस्थिति उत्पन्न करीत आहे हें त्यांना कसें कळावें ? याचें उत्तर एका दृष्टांतांत मिळण्याजोगें आहे. समजा, एक मनुष्य पर्वताच्या शिखरावर उभा राहून चोहोंकडे पहात आहे. खालच्या खोऱ्यांत एकाद्या झोंपडींत दिवा लागला म्हणजे सभों-वार अंधार असल्यामुळें वरच्या मनुष्याला तो तत्काळ दिसतो. तद्वत् केवळ प्रपंचांत गढलेल्या माणसांच्या गाढ अंधारांत परमार्थी, गुरुदर्शना-तुर मनुष्याच्या अंतःकरणांतली भक्तीची ज्योत गिरिशिखरस्थ सद्‌गुरूंना तत्काळ दिसते व त्यांचें लक्ष वेधतें. ते तत्परतेनें उभे असतात. तुमच्या-कडून हांक जाण्याचाच अवकाश असतो. हांक गेली कीं, तुम्हांला हात धरून न्यायला ते आलेच. मुमुक्षूला ह्यापुढें किती बिकट काम करावयाचें असतें व सद्‌गुरुकृपेची केवढी गरज असते हें पुढील व्याख्यानाचे शेवटीं तुम्हांस कळेल. आजच्या व्याख्यानाच्या शेवटीं हाच विचार तुम्हापाशीं ठेवून मी परिसमाप्ति करितें कीं, सद्‌गुरु तुम्हाला भेटून उपदेश करण्यास हातीं धरून तुम्हांला माहेरीं घेऊन जाण्याला अत्युत्सुक आहेत, मार्ग-प्रतीक्षा करीत आहेत. मात्र तुम्ही त्यांना दार उघडून आंत घेतलें पाहिजे, भक्तीनें हांक मारली पाहिजे म्हणजे आतांपर्यंत मी सांगितलें त्याप्रमाणें क्रमाक्रमानें मन स्वाधीन करून घेतलें पाहिजे, शील संपादिलें पाहिजे, ध्यानाचा अभ्यास केला पाहिजे. कायावाचा मनाची इतकी शुद्धि व तयारी झाली म्हणजे तुमच्या आत्म्याची निःशब्द हांक सद्‌गुरूंना पोहोंचेल आणि

त्यांची अमृतमूर्ति तुमच्या अंतरंगापुढें प्रकट होऊन तुम्हांला कृतार्थ करील.

---

# शिष्यचरित्र.

## पूर्वमार्ग—चार दीक्षा.

बंधु हो—आज आपल्यापुढें मोठें भारी काम आहे. गेल्या दोन व्याख्यानात मी प्रपंचांत राहून परमार्थाची तयारी करणाऱ्या साधकाचा विचार केला. हळू हळू चित्तशुद्धि कशी करावी. सद्गुरुकृपेची पात्रता कशी संपादावी, पुढील उन्नतीचे टप्पे चढण्याची शक्ति अंगीं कशी आणावी, याचें निरूपण केलें. परंतु आज जो संसारमार्ग सोडून–बाह्य दृष्टीनें नव्हे तर अंतरंग दृष्टीनें––निश्चयानें परमार्थमार्गास लागला त्याच्या चरित्राचा विचार कर्तव्य आहे. ह्या मार्गाचे टप्पे उन्नत तसेच स्पष्ट व आंखलेले आहेत व जसजसे साधक ते ओलांडून जातो तसतसा तो नराचा नारायण बनूं लागतो. ह्या गोष्टी सामान्य जनांच्या अनुभवाबाहेरच्या आहेत म्हणून ह्यांचें यथास्थित वर्णन श्रोत्यांना व वक्त्याला कठिण जातें. ह्या विषयाचें यथार्थ आकलन होण्यास आत्म्याच्या दिव्यशक्तीचा विकास व्हावा लागतो आणि म्हणून ज्यांनीं पूर्वोक्त रीतीनें आत्मशुद्धि, शीलसंपादन व ध्यानाभ्यास थेडाबहुत केलेला असेल त्यांनाच ह्या उच्च विषयाची चर्चा समजेल.

काल मी तुम्हाला इतक्या पल्लयावर आणून सोडलें कीं, साधकानें आपला आचारविचार सुधारण्याची पराकाष्ठा करून भक्तिबळानें कोणा सद्गुरूंचें लक्ष्य आपणाकडे वेधून त्यांजपासून अनुग्रह घेऊन तो मुमुक्षुमार्ग

चालण्यास सिद्ध झाला आहे. त्या मार्गाच्या आरंभींच्या टप्प्यापासून आज मी सुरुवात करणार. शिष्यचरित्र हा विषय विशाल आहे तथापि ह्या व्याख्यानांत घाई करून तो सर्व संपविला पाहिजे.

या मार्गाच्या आरंभींच्या भागास पूर्वमार्ग म्हणतात. तेथें असेपर्यंत शिष्य अर्धानुगृहीत असतो. उत्तरमार्गांत तो पूर्णानुगृहीत म्हणजे पक्का शिष्य होऊन जातो. पूर्वमार्गांत कांहीं विशेष सद्‌गुण जोडावयाचे असतात यांत उत्तरमार्गासारखे स्पष्ट आंखलेले एकापुढें एक टप्पे नाहींत. पूर्व-मार्गांत गुरुशिष्याला ओळखतात; पण शिष्य गुरूंना ओळखतोच असें नाहीं. उत्तरमार्गांत दोघेही एकमेकांस पूर्णपणें ओळखतात. उत्तरमार्गां-तील प्रत्येक टप्प्यास वेगळी संज्ञा आहे व प्रत्येकांत प्रवेश होण्यास वेगळी दीक्षा घ्यावी लागते. पूर्वमार्गाचे टप्पे स्पष्ट सांगितलेले आहेत, तथापि एक-मेकांपासून विभक्त नाहींत. ते टप्पे एकापुढें एक नसून एकाशेजारीं एक आहेत. अर्थात त्यावरील गुण एक संपादल्यानंतर दुसरा असे घ्यावयाचे नसतात, असें म्हटलें तरी चालेल. अर्धानुगृहीत शिष्याची कामगिरी सर्वथा पूर्ण निर्दोष झालीच पाहिजे असा कडक निर्बंध नसतो. त्यानें आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करावी; पण पूर्ण यश आलेंच पाहिजे अशी अट नाहीं. शिष्यानें सतत मनोभावानें परमार्थावर दृष्टि स्थिर ठेवून प्रयत्न करीत रहावें. क्षुद्रार्थाला भुलूं नये. धरसोड करूं नये म्हणजे पुरे. मनुष्य अज्ञान आहे, दुर्बल आहे हें जाणून सद्‌गुरु त्याच्या कामगिरीकडे फार सदयदृष्टीनें पहातात, पुष्कळ चुक्या माफ करतात पूर्वमार्गांतहि शिष्या-वर नानाविध सांसारिक संकटांच्या रूपानें परीक्षेचे प्रसंग येतात, अनेक वेळां त्याचें सत्व कसाला लागतें परंतु उत्तरमार्गांतील कसोटीच्या मा-नानें तें कांहींच नव्हे. कांहीं वर्षांमागें मला बरोबर आठवत असेल तर कलकत्त्याचे बाबू मोहिनी मोहन चतर्जी यांनीं एकदां विलायतेस असतांना त्या पूर्वमार्गाचें वर्णन केलें होत. ते थिआसॉफिस्ट आहेत, त्यांनीं यथा-योग्य रीतीनें प्रसिद्ध हिंदु धर्मग्रंथांचा आधार घेऊन पूर्वमार्गाचें निरूपण केलें होतें हें साधन करीत असतां सद्‌गुरु सहाय करतात परंतु त्याची शिष्याला बहुशः जागृतींत जाणीव नसते शिष्याला वाटतें मी एकटाच, असहाय

मार्ग कर्मीत आहे हा त्याच्या अज्ञानांध दृष्टीचा भ्रम असतो हें सांगणें नको कारण त्याला जागृतींत न कळलें तरी अंतरंगीं सद्गुरु त्याला वरच्या भूमीकांवरून बल देत असतात व त्याचा त्याच्या आचरणांत प्रभावहि पडतो. मग त्याची त्याला स्पष्ट जाणींव असो व नसो या ठिकाणीं त्याला जे गुण संपादावयाचे असतात ते इतके दिवस त्यानें आपल्या पूर्वतयारी करतांना अभ्यासिलेलेच असतात, पण येथें पूर्वमार्गावर त्याचें स्वरूप परिणत व परिपक्क व्हावें लागतें.

पहिलें साधन विवेक हा येथवर आलेल्या संसाराच्या अनुभवापासून सहज उत्पन्न होतो. हा आतां परिपक्क केला पाहिजे. सत्य काय व मिथ्या काय शाश्वत कोणतें अशाश्वत कोणतें याचा नीट विवेक झाला पाहिजे. विवेक अंतःकरणांत ठसवल्यावांचून ऐहिक नाशवंत वस्तूंचा लोभ सुटणार नाहीं, विषयांचा मोह दूर होणार नाहीं. विवेकाचे डोळे उघडले म्हणजे मायिक संसाराची असारता दिसली पाहिजे. संसार सर्वथा तुच्छ न केला तरी त्याला जितक्यापुरती तितकी किंमत द्यायला लागलें पाहिजे. विवेक परिपक्क झाला म्हणजे त्यापासून वैराग्य जन्मतें.

हें दुसरें साधन होय. मी पूर्वींच दाखविलें आहे कीं साधकानें कर्मफलाची आशा सोडली पाहिजे. लोभाचा लोभ न धरतां कर्तव्य करणें हा त्याचा स्वभाव बनला पाहिजे. असा अभ्यास जन्मानुजन्म झाल्याशिवाय म्हणण्यासारखें वैराग्य साधणार नाहीं. व तें बरेंच साधल्याशिवाय, ऐहिक आशाममता कायमच्या सोडल्याशिवाय, दीक्षा मिळणें शक्य नाहीं. ऐहिक सुखाविषयीं अनासक्ति, धन-मान-सुख आलें गेलें बरोबर, अशी वृत्ति होणें, हें दुसरें साधन. विवेकाच्या प्रकाशानें शाश्वत व नश्वर यांतला भेद ढळढळीत दिसूं लागल्यानंतर नश्वराचा हव्यास सुटणें अपरिहार्य आहे; संसाराविषयीं उदासीनता सहजच येते. शाश्वतापुढें अशाश्वत सहजच फिकें पडतें. एकदां अक्षय सुख दृष्टीस पडलें म्हणजे क्षणभंगुर सुख आपोआप क्षुद्र वाटूं लागतें. त्याच्यासाठीं धडपड करावी असें वाटतच नाहीं. ह्या पूर्वमार्गस्थ साधकाला विषयांचा मोह फारसा पडतच नाहीं त्यामुळें अनायासें त्याग घडतो. कर्मफलाची आशा

सोडण्याला त्याला बुद्धिपुरःसर प्रयत्न करावा लागत नाहीं. विषयांचा मोहकपणा नाहींसा होतो. वासनेचें मूळ हळू हळू नष्ट होतें; आणि भगवद्गीतेंत म्हटल्याप्रमाणें विषय, निराहारी मनुष्यापासून निवृत्त होतात. विषयसुखांची क्षणभंगुरता पक्की उमजली म्हणजे कर्मफलाविषयीं-ची उदासीनता सहज ओघानेंच प्राप्त होते. कर्मफळ म्हणजे तरी विषयच. एकदां सत्य, शाश्वत, पाहिलें म्हणजे असत्य, अशाश्वत कर्में व त्यांचीं अशाश्वत फलें या दोन्ही विषयीं वैराग्य उत्पन्न होतें.

त्यापुढलें तिसरें साधन षट्संपत्ति म्हणजे सहा सद्गुण; हे चेल्यानें अंगीं आणले पाहिजेत. विचार व्यवस्थित करणें, शील बनविणें, ध्यान करणें, आत्मसंयमन इत्यादिकांचा अभ्यास पूर्वींच सुरू झालेला असतो व अंगवळणी पडलेला असतो. तेव्हां आतां शम म्हणजे मनाचें खरें संयमन हें साधण्याची वेळ येते. आपल्या सुविचारांचा व कुविचारांचा भोंवतालच्या जगावर परिणाम घडत असतो. त्याची जबाबदारी आपल्या शिरावर रहाते. नित्य सुव्यवस्थित सुविचार करण्यानें भोंवतालच्यांचें हित करतां येतें. कुविचारानें अहित होतें. हें पक्कें जाणून साधकानें नेहमीं सुव्यवस्थित सुविचार करण्याचा स्वभाव बनवून मानवांच्या व एकंदर जगाच्या उन्नतीचा सहायकर्ता झालें पाहिजे. शम साधला, बुद्धीनें निश्चित केलेल्या सुमार्गानेंच अनायासें जावयाचें असा मनाचा स्वभाव बनला, म्हणजे शिष्याचा प्रत्येक विचार सद्गुरुकार्याचें साधन होऊं लागतो.

शम सिद्ध झाला म्हणजे त्यापासून दम आपोआप साधतो. मन शांत असलें म्हणजे शरीरेंद्रियाची कसमस, वसवस सहजच थंड पडते. व्याव-हारिकांचा विचारक्रम पारमार्थिकांच्या उलट कसा असतो हें लक्ष्यांत घ्या. व्यावहारिक लोक शारीरिक कर्माला अग्रस्थान देतात. तेंच, पारमार्थिक, मनाला मुख्य स्थान देतात. मन चांगलें तर वर्तन चांगलें असणारच. मन सुव्यवस्थित, तेथें शरीराचे व्यापार सुव्यवस्थित सहजच होतात. शारी-रिक कर्म ज्याला म्हणतात तें अंतरंगांतील विचारानें बाह्य जगतांत धारण केलेलें रूप आहे, दुसरें कांहीं नाहीं. मनांत जसें बिंब, तसेंच प्रतिबिंब शरीरा-

च्या आचरणांत जसा सांच्याचा आकार तसें त्यांतून ओतलेलें रूप व्हावयाचें. मनांतील विचार, वासना हा आत्मा किंवा कारण; आणि शरीराचें कर्म हा देह, किंवा कार्य होय. जसा आत्मा तसा देह; जसें कारण तसें कार्य. अरूप मनोमय सृष्टि ही कारण सृष्टि, आणि शरीराची रूपसृष्टि हें कार्य. सारांश मन सुव्यवस्थित असेल तेथें शरीराचें कर्म सुव्यवस्थित असावयाचें.

तिसरा सद्‌गुण उपरति. उपरति म्हणजे उदार सार्वत्रिक सहिष्णुता. साहिष्णुतेचा जितका व्यापक अर्थ घेतां येईल तितका घ्या. ही परमेश्वराची सहिष्णुता; सर्वत्र, सर्वांशीं सर्वदा साहिष्णुता; कोणालाही कोणत्या वस्तूलाही 'तूं असा कां, तसा कां नाहींस,' असें न म्हणतां, सर्व असेल तसें प्रेमानें आंत सांठविण्याइतकें मोठें मन करणें म्हणजेच खरी उपरति. पूर्ण शिष्य होण्याला हें एक मोठें साधन आहे ह्याच्या योगानें मनुष्य जनांच्या व जगाच्या बहिरंगावर न जातां अंतरंगावर नजर देऊं लागतो. लोकांच्या आशा आकांक्षा, विचारवासना कशा आहेत हें पहातो; त्या आशांचें स्थूलांत जें विकृत प्रतिबिंब पडतें त्याला महत्व देत नाहीं. निरनिराळे सर्व धर्म व पंथ, निरनिराळ्या सर्व चालीरीति, निरानिराळ्या परंपरा यांशीं तो पूर्ण साहिष्णुता धरतो. त्यांतल्या कांहीं वेड्यावांकड्या, चुकीच्या असल्या तरी त्यांविषयीं अधीरेपणा न करतां, बालांच्या वर्तनांत प्रौढांच्या धीरगंभीर वृत्तीची आशा न धरतां, तो शांतपणें असें म्हणतो कीं कालक्रमानें शहाणपण आल्यावर हे वेडेचार आपोआप सुधारतील. ज्याला दीक्षा घेण्याची तयारी करावयाची आहे, त्यानें अशी साहिष्णुता नेहमी धरली पाहिजे. आणि ती, भ्रामक पटलाचा भेद करून, अतरंगांतील सत्य पहाणाऱ्या अंतर्ज्ञानापासून उत्पन्न झाली पाहिजे. पहा कीं शिष्याच्या आचारविचारांत येवढा मोठा बदल होत चालला आहे तो केवळ सद्वस्तुदर्शनाचा परिणाम. आतां बाह्यरूपानें त्याला भूल पडत नाहीं. आत्म्याचा विकास जसजसा होतो तसतशी मायेची मोहिनी निर्बल होते. बहिरंग कितीही भ्रामक असो. त्यास तो भुलत नाहीं. तो अंतरंगांतील सत्यच पहातो.

याच्या पुढला सद्‌गुण तितिक्षा. क्षोभरहित मनानें येईल तें सहन करणें, राग न धरणें. मीं मागें सांगितलेंच आहे कीं, साधकानें दया, क्षमा, शांति अंगीं आणली पाहिजे.अपराध्याचा राग धरण्याची वृत्ति सोडली पाहिजे. तें केलें म्हणजे तितिक्षा साधते. अंतरात्मा सभोंवतींचीं मनुष्यें, वस्तु, परिस्थिति यांचा कशाचाच राग करीत नाहीं. कां ? तर, शाश्वत ईश्वरी नियम तो जाणतो, व जें काय आलें आहे तें त्या हितकर नियमानुसारच आलें आहे असें तो समजतो. मनुष्यें कांहीं करोत तीं फक्त प्रारब्धांचीं नेणतीं निमित्तें आहेत, आपला भोग आपल्या पूर्वकर्माचें फल आहे, हें त्यास उमजलेलें असतें. म्हणून त्याची शांत अक्रोध वृत्ति कायम रहाते. आपल्याला अपराधावांचून दंड होणार नाहीं, जें आपण पूर्वीं निर्माण करून ठेवलें तेंच आपल्याला भेटणार हा कर्माचा न्याय त्याला पटतो. यामुळें सुखें येवोत, दुःखें येवोत, तो स्वमार्गापासून ढळत नाहीं. मार्गांतील संकटें त्याची दिशा बदलूं शकत नाहींत. वाट पहावयाची व पुढें पाऊल टाकायचें, मुक्कामावर नजर ठेवून पुढें रेटायचें, एवढें त्याचें काम. आतां ही वाट, मग ती वाट, घटकेनें आणखी तिसरी, अशी धरसोड तो करीत नाहीं; निवडलेल्या मार्गानें धिमेपणानें पुढें जातो. सुखाच्या मोहानें ढळत नाहीं, दुःखाच्या भयानें चळत नाहीं. कंटाळा आला, मन शून्य, उद्विग्न झालें, कोणी कांहीं लालूच दाखविली, कांहीं झालें तरी मार्गावरून त्याचा पाय, व गुरुपदकमलावरून त्याचें लक्ष्य कदापि ढळत नाहीं. अपार सहनशीलता, अढळ निष्ठा साधकानें अंगीं आणली पाहिजे. वाटेंत पुष्कळ परीक्षा, पुष्कळ दिव्यें येतात, हें सांगितलेंच आहे. आतां तीं कां येतात हें सांगतें. सामान्य माणसें जीं ऋणें शेंकडों जन्मांत फेडतात, तीं पूर्वमार्गावरील मुमुक्षूला थोड्या जन्मांत फेडायचीं असतात. समजा, एका मनुष्याला पर्वतशिखरावर जाणें आहे. पण डोंगराला वळसे घालीत जाणाऱ्या, लांब धोपटमार्गानें न जातां, एका बाजूनें नीट सरळ वर चढून जलद शिखर गांठण्याचा त्याचा विचार असावा तसें या मुमुक्षूचें असतें. तो म्हणतो—'लक्षावधि माणसांनीं चालून सोपा केलेल्या लांबच्या मार्गानें सावकाश चालून वेळ कोण दवडतो ? मी जवळचा, थोड्याच वेळाचा मार्ग घेणार. मी नीट वर चढ-

णार. केवढेहि अडथळे येवोत, कसेहि तुटलेले कडे असोत, कीं पाषाणाच्या भिंती असोत, मी उभा वर चढणार. अडथळे असतील ते मी उल्लंघीन किंवा फेरा घालीन. पण जलद शिखर गांठीन.' अशा निश्चयाचा परिणाम काय होतो ? मार्गांत संकटें सहस्रपट अधिक येतात. वेळ वांचवायचा तर क्लेश अधिक सोसले पाहिजेत. मुमुक्षु हा नीट पर्वतशिखरावर चढूं इच्छिणारा मनुष्य आहे. म्हणून त्याच्या वाटेंत पूर्वकर्मांचे भयंकर खडक अधिक येतात. ते मागें टाकल्याशिवाय दीक्षा मिळणार नाहीं. कर्माधिष्ठाते देव, सूक्ष्मलोकीं आकाशपटावर सर्व जगताच्या यच्चयावत् स्थितिगतींचे, विचारांचे, कर्मांचे जसेचे तसे चित्रलेख रक्षीत असतात; ते आपल्यापेक्षां इतके उच्च आहेत कीं, त्यांची योग्यता मानवाच्या पराकाष्ठेच्या बुद्धीला व तर्कालाही कळणार नाहीं. त्यांच्या सर्वसाक्षी नेत्रांपुढें प्रत्येक मनुष्याच्या कर्माची जणूं खतावणी ठेवलेली असते. त्यांचे हिशेबीं साधकाचे नांवें असलेलें बहुतेक ऋण फेडल्याशिवाय तो दीक्षा घेण्याला पात्र होत नाहीं. मनुष्य मुमुक्षु बनला, मोक्षाच्या पूर्वमार्गावर त्यानें पाय ठेवला कीं सत्य-लोकांत कर्मदेवांना हांक जाते कीं, अमुक मनुष्याचे नांवें जी बाकी असेल तिची हुंडी पाठवावी. हुंडी आली कीं पैसे पटवावे लागतात यांत काय आश्चर्य ? मुमुक्षूला अनेक जन्मांचे कर्मभोग एकदम भोगावे लागतात. त्याजवर, बाह्यदृष्टीनें, एकावर एक तुफानें उठतात. कौटुंबिक संकटें, उद्योगधंद्यांत ठोकरा, अधिव्याधि यांची एकच गर्दी लोटते. तेव्हां अशा प्रसंगीं धीर न सोडतां, मागें न फिरतां, सरळ मोक्षमार्गापासून न ढळतां, धिमेपणें पुढें जाण्यास अभंग सहनशीलतेची, तितिक्षेची किती गरज आहे पहा बरें. सगळें जग आपल्यावर उलटलेंसें दिसतें ! मी चांगल्यासाठीं धडपडत असतां माझ्या कपाळीं वाईट कां यावें ? मी पूर्वींपेक्षां सदाचरण करीत असतां माझ्या वांट्याला दुःख क्लेश कां येतात ? इत्यादि बिकट प्रश्नांचें काहूर माजतें. पूर्वीं कधीं केलें नाहीं असें पुण्य करीत असतां दैवानें मला असें पेचांत पाडावें हा अन्याय आहे, क्रौर्य आहे, असें वाटतें. ह्या परीक्षेंत उतरलें पाहिजे. देव क्रूर, अन्यायी आहे अशी शंका लेशभर मनांत राखतां कामा नये. मनाची अशी समजूत घातली पाहिजे कीं, ' मना, हें

तुझेंच पूर्वकर्म तुला भोगावें लागत आहे. यांत कांहीं नवल नाहीं. उगाच तूं दैवाला कां बोल लावतोस !' अशी समजूत पटली म्हणजे त्याला खात्री वाटूं लागते कीं, कांहीं हरकत नाहीं. हें ऋण एकदां दिलें म्हणजे झालें. हा कर्मभोग एकदां संपविला म्हणजे मी त्याच्या ताब्यांतून कायमचा सुटलों. पुनः त्याचा ससेमिरा माझ्या मागें लागणार नाहीं. तो रोगानें अंथरुणावर पडला म्हणजे म्हणतो–'बरें झालें एवढ्या ऋणांतून सुटेन.' कांहीं काळजी उत्पन्न झाली म्हणजे तो म्हणतो—'बाई ये आणि एकदां निघून जा. पुनः तुझें दर्शन नको!' अशा स्थिर तितिक्षेनें साधक दुःखांतही आनंदी, निराशाकारक परिस्थितींत उत्साही, धैर्य खचविणाऱ्या प्रसंगांतही शूर रहातो. 'मी देवापाशीं लौकर भोग-मुक्त होण्याची प्रार्थना केली ती देवानें मान्य केली.' अशा विचारानें ईश्वराच्या शाश्वत नियमावर हवाला ठेवून त्याचा अंतरात्मा स्वस्थ, संतुष्ट रहातो. साधकावर संकटें न आलीं तर समजावें कीं त्याची मागणी देवानें अजून मान्य केली नाहीं. ती देवाच्या दप्तरीं अजून तशीच पडून आहे. अशा रीतीनें कष्टत असतां, संकटांशीं टक्कर देतां देतां साधकाच्या अंतःकरणांत पांचवी संपत्ति श्रद्धा उत्पन्न होते.

श्रद्धा म्हणजे गुरूवर व स्वतःवर, अंतरात्म्यावर विश्वास. उपर्युक्त संग्रामापासून सहजच असा विश्वास, असा आत्मप्रत्यय व गुरुप्रत्यय उत्पन्न होतो हें सहज कळण्यासारखें आहे. यथाकाळीं पाऊस ऊन पडलीं म्हणजे फुलें जशीं निश्चयानें उमलायचीं, तशीच अशा झगड्यांतून जय घेऊन बाहेर पडलेल्याच्या मनांत श्रद्धा उदय पावते. मार्ग कंटकमय, विषम खरा, पण त्यांतून सद्‌गुरूनींच त्याला सुरक्षित आणून दीक्षामंदिराच्या द्वारापुढें उभें केलें; मग त्याची सद्‌गुरूवर श्रद्धा बसली तर काय आश्चर्य ? तसेंच आपण आपल्या कनिष्ठ आत्म्याचा दुबळेपणा घालवून श्रेष्ठ आत्म्याकडून त्याचा उद्धार केला. म्हणून त्या श्रेष्ठ आत्म्यावरही सहजच श्रद्धा बसते. प्रत्येक मनुष्य देवांश आहे, आज श्रीगुरु जसे सिद्ध आहेत तसा अनेकजन्मांनीं कां होईना, मीही होईन असा आत्मप्रत्यय त्याला येतो. आज मी कितीही हीनदीन दुर्बल असलों तरी 'थोरांचें लेकरूं' आहें; कितीहि विघ्नें येवोत तीं निवारण करण्याची धमक माझ्या अंगीं आहे; केवढेहि

प्रयास पडोत ते करण्याची मला उमेद आहे; सर्व संकटांत, सर्व परीक्षांत टिकण्याइतकें धैर्यबल व निष्ठाबल माझ्या हृदयांत आहे; मी देवाचा पुत्र आहें व स्वप्रयत्नानें हक्कानें देवपदावर जाऊन बसणार. ' अशी श्रद्धेची वाणी साधकाच्या अंतःकरणांतून उमटते.

यापुढें सहावी संपत्ति म्हटली म्हणजे समाधान. सम+आधान समवृत्ति. सुखदुःख, जयापजय, लाभहानि इत्यादि सांसारिक द्वंद्वांमध्यें अविचलित, समतोल, शांत, गंभीर नित्यवृत्ति. पूर्वोक्त पांच संपत्ति मिळविल्या म्हणजे सहावी आपोआप मिळते. समाधान हा त्या सर्वांचा परिपाक आहे. इतक्या सर्व साधनांनीं युक्त झाल्यावर पूर्वमार्ग संपून साधक दीक्षाद्वाराशीं येण्यास तयार होतो व त्या वेळीं, त्याचे ठायीं ' मुमुक्षा' हें चवथें साधन उदय पावतें.

मुमुक्षा म्हणजे मोक्षाची इच्छा. खरी जिवंत मुमुक्षा अंतरंगांत बाणली म्हणजे मनुष्य ब्रह्मोपदेशाला अधिकारी झाला. त्याच्या सर्व पूर्व परीक्षा पास झाल्या. विवेक तीक्ष्ण झाला; शील षट्संपत्तीनें शोभूं लागलें; आतां तो दीक्षेला पात्र झाला; आजपर्यंतचे दीर्घ सायास व मनोरथ सफल झाले. कोणतेंहि साधन साधायचें उरलें नाहीं; तर इतके दिवस ज्याची प्रतीक्षा केली त्या सद्गुरूच्या प्रत्यक्ष दर्शनाचा व अनुग्रहाचा तसेंच उत्तरमार्गावर पाऊल पडून तेथें प्रगति करण्याचा त्याचा अधिकार झाला.

प्रत्यक्ष दीक्षामंदिराचा दरवाजा उघडण्यापूर्वीं पुनः एकदा पूर्वमार्गाचें सिंहावलोकन करा व ध्यानांत घ्या कीं त्यांतली सर्व तयारी नैतिक, मानासिक आहे; सद्गुणसंपादन, सच्छीलघटना यासाठींच सर्व उद्योग आहे. ज्यांला योगसिद्धि म्हणतात त्या मिळविण्याची आतांपर्यंत मुळींच खटपट नाहीं. त्यांची अजून गरजच नाहीं. सिद्धि मिळवून सुद्धां साधनचतुष्टयसंपन्न नसेल तर मनुष्य ब्रह्मविद्येचा अधिकारी कदापि होणार नाहीं. ह्या बाबतींत सूट सवलत मुळींच नाहीं; साधनचतुष्टयाचें पुरें माप घेतलें पाहिजे असा कडक नियम आहे; व तो दीर्घ अनुभवांतीं ठरविलेला आहे. दुर्बळ मानवांना हातीं धरून मोक्षमार्गानें नेण्याचें कर्म सिद्धसंघ लक्षावधि वर्षें करीत आहे; व त्या अनुभवावरूनच त्यांनीं वरील नियम ठाम केला

आहे. त्यांनीं पक्कें जाणलेलें आहे कीं मनुष्य दीक्षेचा अधिकारी होण्याला मनःसंयम, सद्गुण, सदाचरण हें आवश्यक आहे. सिद्धींची कांहीं जरूर नाहीं. अगोदर साधनचतुष्टय सिद्ध असलें म्हणजे सिद्धि मागून आपोआप योग्य वेळीं मिळतील.प्रथम सद्गुरूंचें दर्शन व उपदेश होऊन पक्का शिष्य बनण्याला अनुगृहीत असा पूर्ण शिष्य बनण्याला मुख्य जें हवें तें साधन-चतुष्टय. तें साधलें म्हणजे सद्गुरूंचा अनुग्रह होईल. शिष्यांस दुसरा जन्म सद्गुरूवांचून कोणी देऊं शकत नाहीं. दीक्षेनें दुसरा जन्म झाला म्हणजे मनुष्य खरा द्विज होतो. त्यांत मुख्य ज्ञान व भक्ति पाहिजे हें लक्ष्यांत घ्या. ज्ञानानें दृष्टि येते, व भक्तीनें मोक्षाची बिकट वाट चालायला बळ येतें. म्हणून उपनिषदांत सांगितलें आहे कीं नुसतें ज्ञान पुरेसें नाहीं, तसेंच ज्ञानावांचून केवळ एकटी भक्ति उपयोगी नाहीं. भक्तीच्या जोडीला ज्ञान पाहिजे. मुमुक्षु-पक्ष्याचे ज्ञान व भक्ति हे दोन पंख आहेत. अर्थात् दोहींची गरज सारखी आहे.

येथून खऱ्या मुमुक्षु-मार्गाला सुरवात होते. सद्गुरूंचा अनुग्रह होऊन त्यांच्या उपदेशानुसार, त्यांच्या देखरेखीखालीं त्यांनीं शिष्याची जबाबदारी घेतल्यावर शिष्य मार्ग चालूं लागला म्हणजे त्याला जीं मुख्य दीक्षाद्वारें लागतात त्यांविषयीं सविस्तर माहिती प्रसिद्ध नाहीं. एकाद्या सिद्धपुरुषानें खुणेचे शब्दसंकेत सांगून जावें दुसऱ्या एकाद्यानें त्या संकेताचा थोडासा खुलासा करावा ( तो द्वारानें आंत गेलेल्या माणसास अनुभवानें खरा म्हणून पटतो. ) —एवढीच सिद्धसंप्रदायाची परवानगी आहे. त्यांना रिकामटेकडी जिज्ञासा तृप्त करायची नाहीं तर मोक्षाचा क्षुरधारामार्ग चाल-ण्याची जे खरी तयारी करीत असतील त्यांना सहाय कर्तव्य आहे. ह्या गुह्यगो-ष्टींची जगांत प्रकट माहिती सांगायची ती अंधुकच असते. असलीं गूढें लख्ख उजेडांत मांडणें शक्य असत नाहीं मी आतां असलीं त्रुटित संक्षिप्त संकेतवाक्यें घेऊन त्यावरून किंचितशी सुसंबद्ध माहिती सांगण्याचा यत्न करणार आहें ती ऐकून तुमच्या मनांत अनेक शंका उद्भवतील अनेक प्रश्न उपस्थित होतील पण त्यांचीं उत्तरें देणें शहाणपणाचें नाहीं. मी पुनःआपणास कळवितें कीं ही त्रोटक माहिती सांगण्याचा उद्देश रिकामें

शंकासमाधान करीत बसण्याचा नाहीं. जे मनोभावानें साधनाला लागतील, समजूत झाली कीं आचरण करूं लागतील त्यांच्या सहायासाठीं व त्यांच्यापुरत्याच ह्या सूचना आहेत. रिकामी ऐहिक जिज्ञासा तृप्त न झाली तरी निष्ठावंत साधकाला आचरण करण्याकरितां अशा मधून मधून प्रगट करण्यांत आलेल्या सूचना पुरेशा असतात. साधकाला तात्कालिक अनुष्ठानाला त्या पुरे आहेत.

ह्या विषयासंबंधानें त्यांतल्या त्यांत अधिक माहिती ऐतिहासिक काळांत दोन महान् विभूतींनीं दिलेली आहे. दोन्ही महाधर्मप्रवर्तक होते. महाधर्म म्हणजे मोठ्या प्रदेशांत चालणारा धर्म असा माझा अर्थ नाहीं. महाधर्म म्हणजे महान् अधिकारी धार्मिक मनुष्यांना सर्वत्र सर्वग्राही असा पटणारा धर्म. एक विभूति बुद्धधर्मप्रवर्तक भगवान् बुद्ध; दुसरी श्रीशंकराचार्य. श्रीबुद्धांनीं जे बाह्य कार्य बाहेरच्या देशांसाठीं करून ठेवलें तसेंच कार्य श्रीशंकरांनीं हिंदुस्थानासाठीं केलें असें म्हणतां येईल. सर्व महासिद्धांचे उपदेश सारखे असायचे त्याप्रप्राणें ह्या दोघांचेहि मुमुक्षुमार्गाविषयीं उपदेश सारखे आहेत दोघांनीं सारखे टप्पे ठरविले आहेत; दोघांनीं प्रत्येक टप्याला वेगळी दीक्षा ठेवली आहे; त्या दीक्षांमुळेंच पाठीमागचे व पुढचे असे निराळे टप्पे पडतात असें सांगितलें आहे; दोघांचाही उपदेश अंतरंगीं एक आहे; भेद आहे तो बहिरंगीं शब्दांत आहे. अशा बाह्य भेदांनींच धर्म व पंथभेद होतात. म्हणूनच विवेकी मनुष्यांनीं अनेक नामरूपांमध्यें गुरफटलेलें एक सत्य शोधण्याची नेहमीं सवय केली पाहिजे नाहींतर शुष्क शब्दांच्या आग्रहामुळें विनाकारण कलह उत्पन्न होतात.

मी पूर्वीं सांगितलें आहे कीं मोक्षमार्गाचे चार टप्पे आहेत, व प्रत्येकाचे आरंभीं वेगळी दीक्षा घ्यावी लागते. दीक्षा म्हणजे जाणिवेचा जींत विस्तार होतो असा खरोखरी गंभीर व महत्त्वाचा संस्कार असतो. सर्व जगांत दीक्षा देणारे मानवजातीचे परात्पर दीक्षा गुरु ( Great Initiator ) एकच आहेत. त्यांचा प्रतिनिधि म्हणून सद्गुरु शिष्याची जाणीव विस्तृत करून त्यास दीक्षा देतात. हाच त्या शिष्याचा दुसरा जन्म. प्रत्येक दीक्षेनें शिष्याच्या जाणीवेच्या क्षेत्राचा विशेष प्रकारचा

विकास होतो म्हणूनच दीक्षेच्या वेळीं गुरु शिष्याचे हातीं 'ज्ञानाची गुरु-किल्ली' देतात असें म्हटलें आहे. ह्या गुरुकिल्लीनें शिष्याला ज्ञानाचीं व शक्तीचीं अपूर्व भांडारें हस्तगत होतात. सृष्टीचे दरवाजे खुले होतात, पण कशासाठीं ? शिष्याला जगाची अधिक सेवा करतां यावी ह्यासाठीं, परोपकाराचें अधिक सामर्थ्य यावें ह्यासाठीं. जे स्वतः कृतार्थ झाले, ह्या जगांत मिळवायचें तें सर्व मिळवून बसले, मुक्त झाले. परंतु केवल त्या परमानंदांत मग्न, जगाविषयीं उदासीन, असे न राहतां जगाच्या उद्धारासाठीं 'उपकारापुरते ठरले;" मानवजातीची सेवा हीच सद्‌गुरुसेवा; परमगुरूच्या स्वानंदामृत-सागराचे पाट बनून संसारतप्त हृदयक्षेत्रांचें सिंचन व शांतवन हेंच ज्यांचें कर्तव्य व प्राप्तव्य, अशा महाभागांच्या अल्प संघांत शिष्यानें यावें, यासाठीं त्याला गुरुकिल्ली दिली जाते. एक दीक्षा मिळाल्यावर पुष्कळ महत्वाचें अंतरंग परिवर्तन, स्वभावसुधारणा करावी लागते, तेव्हांच पुढली दीक्षा मिळते. पूर्वमार्गांतील स्वभावसुधारणा जगाच्या दृष्टीनें कितीही पूर्ण असली तरी सिद्धांच्या दृष्टीनें पुष्कळ अपूर्णच असते. पण आतां खऱ्या मोक्षमार्गाला लागल्यावर मात्र चेल्याचा स्वभाव सर्वांगपूर्ण सुदृढ झालाच पाहिजे. त्यांत यत्किंचित् न्यून किंवा व्यंग रहातां कामा नये. संसाराचा प्रत्येक लहान मोठा पाश पूर्णपणें छेदला पाहिजे. प्रत्येक इयत्तेंत शेंकडा शंभर मार्क मिळाले पाहिजेत, तेव्हांच वरच्या ईयत्तेंत प्रवेश होतो हें या उत्तर मार्गांत विशेष आहे. एकेक सद्‌गुण पूर्णपणें संपादण्याला, एकेक पाश पुरा तोडण्याला, कितीहि दीर्घ काळ लागला तरी चालेल; पण काम पूर्णत्वानेंच झालें पाहिजे. संपूर्णमार्ग आक्रमून गेला म्हणजे मुमुक्षु जीवन्मुक्त होतो. त्याला त्रैलोक्यांत बंध उरत नाहीं.

पहिली दीक्षा घेणाऱ्या मुमुक्षूला श्रीशंकराचार्यांनीं परिव्राजक हें नांव दिलें आहे. श्री बुद्ध त्याला स्रोतापत्ति म्हणतात. हा पाली शब्द आहे. याचा अर्थ स्रोत म्हणजे प्रवाह नदीः तींत शिरलेला येथें नदी म्हणजे लक्षणेनें संसार व परमार्थ यांच्यामधली विभागरेषा. तेव्हां स्रोतापत्ति याचा भावार्थ हा कीं संसारांतलें स्थान–आसक्ती–सोडून जो निश्चितपणें परमार्थांचे मार्गें लागला, ज्याला इकडला कोणताहि पाश

उरला नाहीं, तो. परिव्राजक म्हणजे भटकणारा, एके ठिकाणीं घर न करणारा या शब्दांतहि अगदीं थेट तोच भावार्थ आहे बहिरंगदृष्टीचे लोक ह्या शब्दांचा अक्षरशःअर्थ घेतात,व परिव्राजक म्हणजे शरीरानें एके ठिकाणीं न राहतां भ्रमण करणारा यति, असें समजतात. पण तात्विक दृष्टीचा अर्थ असा कीं, परिव्राजकानें जगांतील कोणत्याही स्थानाची आसक्ति धरतां कामा नये. गुरुकार्यासाठीं कोठेंही जावें लागलें, किंवा कितीहि काळ कोणत्याही एके स्थळीं रहावें लागलें, तरी त्याची त्याला आवड नावड वाटतां कामा नये. सर्व स्थळें समान, अशी त्याची वृत्ति बनली पाहिजे. परिव्राजक म्हणजे स्थानपाश तोडलेला, हा सिद्धांचा अर्थ. दुर्दैवानें स्थूलदृष्टीचें जग त्याचा किती क्षुद्र संकुचित अर्थ करतें, तें वर सांगितलेंच. येथें मी प्रत्येक दीक्षेचीं श्रीशंकर व बुद्ध या दोघांचीं नांवें व लक्षणें सांगून तुलना करीत आहे, याचें कारण असें कीं कित्येकांचा असा भ्रम आहे कीं ह्या चार दीक्षा बुद्धानें नव्याच काढल्या. वस्तुस्थिति अशी आहे कीं, क्षुरधारेसारखा त्याच एका सिद्धसंघांतल्या सर्व सिद्धांनीं चोखाळलेला पुरातन मोक्षमार्ग व त्याच्या दीक्षा बुद्धानें पुनः फक्त दुसऱ्या नांवानीं, जगास उपदेशिल्या.

आतां आपण परिव्राजकाच्या आचरणाचा तात्विक विचार करूं या. तो संसारसीमेवरील नदी ओलांडून गेला. संसाराच्या देशांत, त्याला कर्तव्य किंवा प्राप्तव्य, गुरुसेवेशिवाय दुसरें कांहीं एक उरलें नाहीं. जो खरा द्विज झाला, ज्याला गुरुमाउलीनें दुसरा जन्म दिला त्याची ही खूण आहे. हा दुसरा जन्म देण्याचा म्हणजे सद्‌गुरूच्या दीक्षेचा विधि वरच्या-भूमिकेवर स्वप्नांत बहुधा होतो. शिष्याचें स्थूल शरीर गाढ निद्रेच्या अवस्थेंत ठेवून, त्याचा वासनादेहवेष्टित जीवात्मा जागृत स्थितींत सद्‌गुरू-पाशीं जातो व त्यास दीक्षा देण्यांत येते. क्वचित् असेंही होऊं शकतें कीं, या दीक्षेचें ज्ञान किंवा स्मरण स्थूल देहाच्या जागृत अवस्थेंत शिष्याला कांहीं दिवस आणूं देण्यांत येत नाहीं. पण जागृतींत ज्ञान होवो किंवा न होवो, हा दुसरा जन्म एकदा मिळाला म्हणजे तो अक्षय, अभंग होतो. जसें आईच्या पोटांतून बाहेर आलेल्या मुलाला, प्रथम कित्येक दिवस, या

जगांतील वस्तूंचें ज्ञान होत नाहीं, तथापि त्याला पुनः आईच्या पोटांत कदापि जातां येत नाहीं; तसेंच खरा दुसरा जन्म पावलेल्या चेल्याला, कांहीं दिवस आपल्या द्विजावस्थेचें जागृत ज्ञान नसलें तरी, पूर्वींप्रमाणें, अनुग्रहरहित सांसारिकाप्रमाणें, पुनः कदापि वर्ततां येणार नाहीं. दीक्षेच्या पुढच्या टप्यांत शिष्य कितीहि रेंगाळत चालला, उरलेले पाश तोडण्याला त्यानें कितीही विलंब केला, तरी जी दीक्षा एकदा शिष्यानें घेतली ती त्यास परत देतां येत नाहीं. हातीं आलेली किल्ली कधीं जात नाहीं. त्यानें संसाराचें गांव मागें टाकून, नदींत उडी घातली आहे. तेव्हां मध्यें कितीहि वेळ-जन्म घ्यावा लागला तरी परतीरच गाठलें पाहिजे.

ह्या ठिकाणीं असा एक प्रश्न विचारण्यांत येतो कीं ही पहिली महादीक्षा घेतल्यापासून जीवन्मुक्तपद मिळेपर्यंत किती जन्मांचा अवधि लागतो? या संबंधीं, येथेंच मागें स्वामी टी. सुब्बराव यांनीं कांहीं पृच्छकांना फार समाधानकारक उत्तर दिलेलें मला आठवतें. ते म्हणाले,—"वस्तुतः हा साधकाच्या अधिकाराचा प्रश्न आहे. सात जन्म लागतील, नाहीं तर सत्तर लागतील. किंवा सात दिवस किंबहुना सात तासांतही कार्य होईल." याचा मतलब असा कीं आत्म्याचें जीवित मर्त्यदेहाच्या वर्षांनीं मोजतां येत नाहीं. तीव्र मुमुक्षा, उत्साह, दृढनिश्चय इत्यादि आत्मगुणांवरच ते अवलंबून आहे. एकादा मनुष्य आपल्या काळाचा अपव्यय करील; दुसरा त्याचें उत्कृष्ट सार्थक करील, व त्याप्रमाणेंच त्यांची थोडी फार प्रगति होईल.*

पहिली महादीक्षा घेतल्यापासून दुसरीची पात्रता येईपर्यंत तीन भ्रमांचा किंवा दोषांचा पूर्ण त्याग करावा लागतो. पहिला पृथग्भाव, किंवा मी

---

*टीप. सी. डब्ल्यू-लेडबिटर यांनीं एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं, पहिल्या महादीक्षेपासून जीवन्मुक्ति नांवाची जी महादीक्षा आहे तेथपर्यंत प्रगति होण्यास सामान्यतः चवदा जन्म लागावे असें आहे. पण निश्चयी मुमुक्षु ही प्रगति कमी जन्मांत करूं शकेल व निश्चय कमी असल्यास जास्तही जन्म लागूं शकतात.

इतरांहून वेगळा आहें अशी बुद्धि. ही नुसती कमी करून, हिला नुसता कांटेरी लगाम घालून भागणार नाहीं. हिला ठारच केली पाहिजे. हिचा पक्का नायनाट केला पाहिजे. सर्वांभूतीं एक आत्मा आहे,हेंच खरोखर सत्य होय. मी वेगळा आहें हा मायिक भ्रम आहे तो पुरा घालविला पाहिजे. येथें व्यापक झालेल्या जाणीवेची फार मदत होते. सत्–असत्–विवेकानें सत् आत्मा एकदां समजला म्हणजे असत्, अनेक अनात्म वस्तूंचा आपोआपच निरास होतो. शिष्याची दृष्टि उघडलेली असते व म्हणून ती माया पटलाला भेदून जाते; अर्थात्–प्रथम–भ्रमाचा पाश ती तोडून टाकत्ये.

दुसरा दोष संशय. याचाही त्याग केला पाहिजे. त्यावांचून प्रगति होणार नाहीं. परंतु येथें संशय नाहींसा करायची विशिष्ट रीत अशी कीं ज्ञानानें संशय छेदायचा. आत्मा, परलोक इत्यादिक गोष्टी म्हणजे वेदांताचीं पोकळ प्रमेयें, किंवा तर्कशास्त्राचीं शुष्क गृहीत कृत्यें, असें इतःपर असतां कामा नये. हे सर्व प्रचीतीचे, स्वानुभवाचे सिद्धांत झाले पाहिजेत. 'हें असें असेल, तसें कशावरून नसेल,' असल्या शंका उठण्याला जागाच रहातां उपयोगी नाहीं. अनेक कोशांचें व लोकांचें अस्तित्व कर्म, पुनर्जन्म इत्यादिक पिंडब्रह्मांडासंबधीं सिद्धांना, जीवन्मुक्त सिद्धसंघ, गुर्वनुग्रह, व त्यायोगानें साधकाची सिद्ध होण्याची पात्रता, वगैरे सर्वांसंबंधानें परिव्राजकाची इतकी ठाम खात्री झाली पाहिजे कीं त्यांविषयीं स्वप्नांतहि शंका उठू नये. असें होण्याला अर्थात् अनुमानाचें काम संपून अनुभव आला पाहिजे. सत्यवस्तू हातीं लागली म्हणजे मग भ्रमाला जागा रहात नाहीं, व संशय कायमचा मिटतो

तिसरा दोष किंवा बंध म्हणजे भोळेपणा, कर्मासक्ती, कडकडित कर्मठपणा. ह्या दोषांचें स्वरूप नीट समजून घ्या म्हणजे, शंकराचार्य व बुद्ध ह्यांनीं परिव्राजक व स्रोतापत्ति हीं नांवें कां ठेविलीं तें तुम्हांला पूर्णपणें कळून येईल. कर्मासक्ति म्हणजे बहिरंगी पंथशाखाविशिष्ट नित्यनैमित्तिक कर्मांनींच अंतरंग शुद्धि, उन्नति होते; एरवीं होत नाहीं अशी भ्रांति. वस्तुतः विवेकदृष्टीला असें दिसतें कीं आत्मोन्नति करण्याचें सामर्थ्य अंतर्गत तत्वांत आहे, बाह्य कर्मांत नाहीं. मायामोहांत गुरफटलेल्या

अज्ञान्यांना अमूर्त तत्व दिसत नाहीं म्हणून त्यांना दिसेल, व विवेक उत्पन्न होण्यास मदत करील असें मूर्तरूप तत्वांला द्यावें लागतें. पण ज्ञान्याला, परिव्राजकाला बाह्य आकाराची म्हणजे कर्मांची गरज नसते. संन्यास घेतांना सर्व कर्मांचा त्याग करितात ही गोष्ट तुमच्या नित्य परिपाठांतलीच आहे. संन्यासी कर्मांच्या पलीकडे गेला, त्याला कर्मांची गरज उरली नाहीं. कां ? तर त्याला तत्व प्राप्त झालें म्हणून. तो शिडी चढून वर गेला म्हणून आतां त्याला शिडीचें काम नाहीं. पण ज्याला तत्व प्राप्त झालें नाहीं त्याला कर्मांची जरूरी आहे हें लक्ष्यांत ठेवा. हा कमी अधिक आत्मविकासाचा, अधिकाराचा प्रश्न आहे. एकजण एका उंच घराच्या अंगणांत उभा आहे, व त्याला घराच्या शिखरावर चढायचें आहे, तर त्याला दोनच उपाय. एकेक मजल्याचा जिना चढून शेवटीं शिखरावर जावें; किंवा योगसामर्थ्यानें गुरुत्वाकर्षण उलटवून व देहानें उड्डाण करून शिखर गाठावें. अशा योग्याला अर्थात् एकेक पायरी, एकेक जिना चढण्याचा लांब कंटाळवाणा मार्ग काय करायचा ? पण त्यामुळें जिने निरुपयोगी ठरले काय ? इतरांना त्यांची गरज नाहींशी झाली काय ? मात्र आज असा प्रकार झाला आहे कीं, पुष्कळजणांना योगानें उडतांहि येत नाहीं, आणि ते जिन्यांचाहि उपयोग करीत नाहींत. एकंदरींत धार्मिक उन्नतिच बंद पडली आहे.

येथें 'खरा संन्यासी' कोण ? याविषयीं दोन शब्द सांगणें अयोग्य होणार नाहीं. ५००० वर्षांमागेंहि ह्या शब्दाचा चुकीचा उपयोग केला जात असे. म्हणून कलियुगारंभीं गीतेंत श्रीकृष्णांनीं खरा संन्यासी व केवळ दिखाऊ किंवा बहिरंग संन्यासी यांमध्यें भेद केला आहे. ते पांचव्या अध्यायांत सांगतात–'अनाश्रितःकर्मफलं कार्यं कर्म करोति सः। य संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ॥ ( अर्थ–जो कर्मफलाची आसक्ति न धरतां कर्तव्य कर्म करतो तोच संन्यासी व तोच योगी. ज्यानें नुसतें होम व इतर कर्म सोडलें तो खरा संन्यासी नव्हे. ) 'निरग्निः' म्हणजे होमादिकांचा ज्यानें त्याग केला आहे तो. पण भगवान् म्हणतात, ज्यानें नुसतें कर्मकांडांतलें कर्तव्य सोडलें तो खरा संन्यासी नव्हे. हें वाक्य जर

५००० वर्षांमागें खरें होतें तर आज तें कितपिट अधिक खरें आहे हें तुम्हीच पहा ! मूर्तिमंत कृष्णावताराचीं पुण्यपदकमलें ह्या हिंदभूमीस पवित्र करीत होतीं तेव्हांची जर तशी स्थिती तर अज्ञानांधकाराचीं पांच हजार वर्षे लोटल्यानंतर आजचें काय विचारावें ? एकंदर पूर्वगोलार्धावर नजर टाका; हिंदुस्थानांतले असंख्य संन्यासी पहा. भगव्या वस्त्रापलीकडे संन्यासाचीं खरीं लक्षणें कितीजणांच्या ठायीं दिसतात ? बरें हिंदुस्थान सोडून सीलोन, ब्रह्मदेश, चीन, जपान या देशांतील भिक्षूंकडे दृष्टि वळवा. सर्वत्र तीच कथा ! जिकडे तिकडे पिंवळ्या कफन्यांचा सुळसुळाट, पण खऱ्या त्यागाचें नांव नाहीं. ज्ञान, वैराग्य, भूतदया हे गुण दुर्मिळ. आणि यद्यपि आज मितीसहि इतर देशापेक्षां ही आर्यभूमि धर्माचरणाला अधिक अनुकूल आहे; यद्यपि येथें पुण्यपावन पूर्वपरंपरेमुळें, अजून भूमि, हवा, पाणी इतर देशांपेक्षां अध्यात्मरतिपोषक आहे; यद्यपि भूमींत अजून सत्पुरुषनिवासानें पावन झालेलीं अशीं स्थानें आहेत कीं संसारमग्न जन तेथें नुसते गेल्यानें त्यांचें अंतःकरण शांत होतें व त्यांच्यामध्येंहि भक्तीचा अकुंर उगवतो, यद्यपि हें सर्व सत्य आहे व त्यामुळें ही हिंदमाता निरंतर प्रियतम व पूज्यतम झालेली आहे, तथापि तिच्या मुलांची आज सर्व बाजूंनीं अवनति झालेली आहे, अशा मातेच्या संततीला शोभण्यासारखें त्यांचें शील चारित्र्य नाहीं हेंहि खरें आहे. आज एकंदर पृथ्वीवर नजर टाकतां असा एकहि देश दिसत नाहीं कीं, ज्यांत आत्मज्ञानाला अग्रपूजेचा मान दिला जातो, ज्यांत आत्मप्राप्ति हाच परमपुरुषार्थ मानला जातो. अशा उत्तम वृक्षाला अशीं कुफलें आलेलीं, सोनें होण्यासारखें आहे तेथें खापरें बनलेलीं सत्याच्या वेषानें असत्य वावरत असलेलें पाहून हृदय शतधा विदीर्ण होतें तथापि शिष्यांनीं धीर सोडण्याचें कांहीं कारण नाहीं; अजरामर झालेले जीवन्मुक्त गुरू आजहि आहेत, आणि त्यांचे खरे शिष्य परिव्राजकादि खऱ्या दीक्षा आजहि घेत आहेत, व मोक्षमार्ग चालत आहेत. भेद इतकाच कीं ते आज सांसारिक जनांत वागत आहेत त्यांच्या दीक्षेची खूण भगवें वस्त्र नाहीं, तर अंतरंगीं विशुद्ध उन्नत जीवन ही त्यांची खूण आहे. ज्ञान शुचित्व, भक्ती यांना अजून दीक्षामंदीर उघडें आहे.

आतां आपण दुसऱ्या दीक्षेपाशीं येऊन पोंचलों. दुसरी दीक्षा घेतलेल्याला शंकराचार्य 'कुटीचक' अशी संज्ञा देतात. कुटी=झोंपडी. यावरून कुटीचक म्हणजे शब्दशः अर्थ झोंपडींत रहाणारा असा होतो. ह्याला बौद्ध नांव ' सकृदागमिन् ' असें आहे. सकृत्=एकदां; आगमिन् येणारा; एकदां ( पुनः जन्मास ) येणारा, असा अर्थ. ह्या टप्यांत विशिष्ट पाश छेदायचे नसतात, पण सिद्धि संपादायच्या असतात. दुसरी दीक्षा घेतलेल्या शिष्याला स्थूल लोकांतच नव्हे तर त्याच्या पलीकडे सूक्ष्म लोकांतहि गुरुकार्य करायचें असतें. त्यानें गुरुसंदेश वैखरी-वाणीनें सांगायचा नसतो; तर मनोमन म्हणजे अधिकाराप्रमाणें बुद्धिपरस्पर वरच्या भूमिकांवरहि पोंचवायचा असतो. सूक्ष्म लोकांतून त्याला गुरुसेवा, जगाचें कल्याण किती मोठें व किती प्रकारचें करण्यासारखें आहे तें मी उद्यां सांगेन. तें सूक्ष्म कार्य आज अत्यल्प व अपूर्ण रीतीनें होत आहे; तें मोठ्या प्रमाणांत पूर्ण रीतीनें होऊं लागलें म्हणजे स्थूल जगावरहि त्याचा मोठा हितकर परिणाम होईल. तो महाकार्यभाग यथायोग्य पार पाडण्यासाठीं चेल्याशिष्यास सिद्धींची जरूर असते. सिद्धि मिळाल्या म्हणजे सृष्टीच्या स्थूल सूक्ष्म कार्यांचें संपूर्ण अफाट क्षेत्र चेल्याच्या दृष्टीला उघडें होतें; कोठें पडदा रहात नाहीं. गुरुसेवेसाठीं अलौकिक ज्ञान व त्यापासून सामर्थ्य प्राप्त होतें. म्हणून सिद्धि पूर्वीच मिळालेल्या नसल्या तर त्या बुध्या अगोदर मिळविण्याची ही वेळ. येथें कुंडलिनी जागी करून तिचा व्यापार जड व वासनाद्वंद्वांत करण्याची विद्या शिकविली जाते. श्रीशंकराचार्यांनीं आनंदलहरींत, जागृत केलेल्या कुंडलिनीला एकेका चक्रांत कसें न्यावें याचें वर्णन दिलें आहे. कुंडलिनी ऊर्ध्वगामी झाली म्हणजे सूक्ष्म देह स्थूलदेहापासून अलग होऊं शकतो आणि मनुष्याला, स्थूल देह निद्रेंत ठेवून, सूक्ष्म देहानें ब्रह्मांडांत यथेच्छ संचार करतां येतो. अतःपर चेल्याला स्थूल सूक्ष्म देहांत उलटसुलट वाटेल तेव्हां जातां येतां येतें. व त्याच्या जाणिवेंत मध्यें कोठें खंड पडत नाहीं. सूक्ष्म देहानें संचार करून अनेक प्रकारचें सेवाकार्य करून, गूढ ज्ञान संपादून, जाणीवेची धारा अखंड राखून स्थूल देह जागा करतां येतो. अशा

रीतीनें सूक्ष्म शरीर पूर्णपणें कह्यांत आणून ब्रह्मांडांत अप्रतिहत संचार व कार्य करतां येईपर्यंत चेल्याला पुढल्या तिसऱ्या दीक्षेची पात्रता येत नाहीं. आत्मशुद्धि, आत्मविकास, आत्मसंयम साधल्यावांचून, अकाळीं सृष्टिक्रमाविरुद्ध सिद्धी मिळविण्याचा खटाटोप केल्यानें कसा अपाय होतो हें सहज समजेल. कांहीं प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत, विशेषतः तंत्रग्रंथांत, कांहीं तुटक माहिती दिलेली असते. कामलोभप्रेरित मनुष्यें हव्यासानें ती मिळवतात. ज्ञान वैराग्याची त्यांना पर्वा नसते. सिद्धींचा आपले हातून दुरुपयोग होऊन आपलें व दुसऱ्यांचें नुकसान होण्याचा संभव आहे याचाहि त्यांना विचार नसतो. तंत्रग्रंथांत जें ज्ञान प्रकट होऊं दिलेलें आहे तें अपुरें असतें व तेंहि गूढ सांकेतिक शब्दांनीं झांकलेलें असतें. त्या शब्दांच्या खऱ्या अर्थांची गुरुकिल्ली सिद्धगुरूपाशींच असते. अशांची भेट व कृपा झाल्यावांचून आपल्याच बुद्धीनें, किंवा ढोंगी अर्ध-कच्च्या गुरूचे उपदेशानें त्या ग्रंथांचा वरवरचा अर्थ पाहून जे लोभी अशुद्ध चित्त लोक सिद्धीच्या भानगडींत पडतात त्यांचे हातून अखेरीस बहुधा अनिष्ट होतें. त्यांचे शरीरास कांहीं रोग जडतो, किंवा वेड लागतें, भ्रम होतो. याचें कारण हेंच कीं, अंतर्बाह्य शुद्ध झाल्यावांचून ते 'पवित्रांत पवित्र' अशा मंदिरांत घुसूं पहातात. त्या मंदिराचे हवेंत यत्किंचित अशु-द्धता क्षणमात्र खपत नाहीं. तेथील वायूचे सूक्ष्म पण प्रचंड वेगसामर्थ्यवान् स्पंद विसंवादी अशुद्ध वस्तु तत्काळ छिन्नभिन्न करून टाकतात.

म्हणून सिद्धिसाधन सद्गुरूचे देखरेखीखालींच झालें पाहिजे, म्हणजे उत्तम फलदायक होतें. तसें तें संपूर्ण झालें म्हणजे चेला तिसऱ्या दीक्षेला पात्र होतो. ही घेतलेल्या मनुष्याला शंकराचार्य हंस हें नांव देतात. ह्यालाच बौद्ध 'अनागामिन्' म्हणतात. अनागामिन् म्हणजे स्वेच्छेवांचून पुनः जन्माला न येणारा. हंस याचा अर्थ ( अ ) हं=मी, सः=तो; म्हणजे तो परमात्माच मी आहे असें जाणणारा. वरच्या भूमिकांवर जाणीव नेण्यांत त्याची इतकी प्रगति झालेली असते कीं, सोहम् शब्दांतर्गत एकत्वाची भावना शिष्याच्या अनुभवास येऊं शकते म्हणून त्यास हंस म्हटलें आहे. आतां त्याला फक्त समाधींत हा ऐक्याचा अनुभव येतो इतकेंच नाहीं; तर

सिद्धी प्राप्त झाल्या असल्यामुळें त्या स्थितींत मिळविलेलें ज्ञान जसेंच्या तसें त्यास जागृतींत आणतां येतें. जर कांहीं सूक्ष्म ऐहिक पाश अद्यापि त्याला उरला असला तर तोहि येथें छेदून टाकला पाहिजे, हें सांगायला नको. ह्या अवशिष्ट सूक्ष्म वासनापटलाला 'कामराग' हें पारिभाषिक नांव आहे, खऱ्या अद्वैतानुभवाला भेदभावनेचा नुसता वाराहि सहन होत नाहीं म्हणून हें भेदाचें सूक्ष्म बीज येथें निर्दळिलें पाहिजे. ह्या उच्च पदावर आरूढ झालेल्या मनुष्याच्या क्षुद्र मर्त्यलोकच्या वासना तर मागेंच पार गेलेल्या असतात; पण येथें सत्यलोकासारख्या दिव्य लोकच्या वासना सुद्धां, त्या भेदकारक असल्यामुळें, निर्मूल केल्या पाहिजेत. इतःपर तो जें कांहीं संपादील तें सर्वांसाठीं संपादील; त्याचा लाभ तो जगाचा लाभ. तो आतां ज्या स्थानीं प्राप्त झालेला असतो तेथून सर्व ब्रह्मांडांत शक्तिवर्षाव होतो; व त्यानें त्या त्या लोकांतले सर्व व्यापार चालतात. येथें तो जो कांहीं शक्तिसंचय करील तो सर्व जगाला वृष्टिरूपानें मिळेल. ह्या पदाला पोंचलेल्या प्रत्येक मनुयाबरोबर जगाचा उद्धार होतो. तो जोडतो सर्व जनासाठीं, त्याचे हातीं आलेली सर्व अध्यात्मसंपात्ति तो अभेदभावानें सर्व मानवांना दान करतो. तो ब्रह्मरूप झाला म्हणून प्रत्येक व्यक्तीशीं त्याचें तादात्म्य झालें. हें नुसतें कल्पनेचें किंवा तर्काचें ऐक्य नव्हे तर स्फुरतअनुभवाचें ऐक्य. येथें दुसरा पाश तोडायचा असतो, त्याचें पाली नांव ' पतिघा ' म्हणजे द्वेष. हा शब्द स्थूलार्थानें अत्यंत अयोग्य खराच. पण त्याचा भावार्थ इतकाच कीं, त्याला भेदमूलक आपपर, शत्रुमित्र, रागद्वेष मुळींच नसतात. तुम्हांस आठवत असेल कीं, श्रीकृष्ण गीतेंत म्हणतात कीं— 'विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि । शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ॥' (अर्थ. विद्याविनयवान् ब्राह्मण, गाय, हत्ति, श्वान व चांडाल ह्या सर्वांचे ठायीं ब्रह्मज्ञांची सम दृष्टि असते. ) तसेंच दुसरीकडे दर्शविलें आहे कीं ज्ञानी सर्व भूतीं, सर्व रूपीं कृष्ण पहातात. अर्थात् त्यांना कोणत्याहि मनुष्याचा किंवा वस्तूचा द्वेष, उद्वेग, किंबहुना दुजाभाव वाटत नाहीं. त्यांचें प्रेम सर्वव्यापी असतें. त्यांच्या ममतेच्या परिघांत सर्व विश्व येतें. अशा योग्यतेचेच पूर्वीं ब्राह्मण असत आणि म्हणून शास्त्रांत असें वचन

आहे कीं, "मैत्रो ब्राह्मण उच्यते" ब्राह्मण सर्व प्राण्यांचा मित्र, अहेतुक हितकर्ता आहे. देवाशीं ऐक्य पावलेल्या हृदयांत देवानें निर्मिलेल्या सर्व वस्तूंचा सप्रेम समावेश सहज होतो.

अशा रीतीनें भेदभाव समूळ घालविल्यावर चेल्याला चवथी दीक्षा दिली जाते. तेव्हां त्याला शंकराचार्यांचे भाषेंत 'परमहंस' आणि बुद्धाच्या भाषेंत 'अर्हत, ही पदवी मिळते. ह्या पदव्यांचाहि अर्वाचीन काळीं होणारा दुरुपयोग पाहून हृदयाला चरका बसतो. जिकडे तिकडे भगव्या परमहंसांचा व अर्हतांचा बाजार भरलेला. पण खऱ्या ज्ञानवैराग्यादिकांचा मात्र पत्ता नाहीं. वस्तुतः जो जीवन्मुक्तपदाच्या उंबरठ्यानजीक येऊन पोचला; जो अखंड तुरीयावस्थेंत राहूं लागला; तिचा आनंद भोगण्यासाठीं स्थूल देहास निद्रावश करण्याची ज्यास गरज नाहीं, जो देहांत असतांनाही त्या अवस्थेंत राहूं शकतो त्यालाच परमहंस ही पदवी दिलेली आहे. परम-हंसाची ही एक मोठी खूण आहे. स्थूल देहांतून जाणीवेचा प्रवाह वाहात असतांनाही हा अनुभव घेण्याइतका तिचा परिघ मोठा झालेला असतो. त्याकरितां समाधि लावण्याची जरूरी न पडतां, बोलतां, चालतां सर्व व्यवहार करीत असतां तुर्यावस्थेंतील प्रचंड ज्ञानभांडार त्यास सदा खुलें असतें. आतां यापुढच्या ह्या टप्यांत शेवटचे पांच बंध तोडून टाकले कीं तो जीवन्मुक्त झाला. ते पांच हेः—१ला रूपराग २ रा अरूपराग म्हणजे साकार किंवा निराकार संसारांत रहाण्याची आवड नाहींशी केली पाहिजे. ३रा मान टाकावयाचा [ इतक्या श्रेष्ठ स्थितींतल्या सूक्ष्मात्सूक्ष्म दोषांस राग, मान असे बोजड शब्द मुळींच अन्वर्थक नाहींत. पण समर्पक शब्दांच्या अभावीं ते योजणें भाग आहे. ] उच्चनीच भाव घालविल्यामुळें, अत्युच्च असूनहि त्याला गर्वाचा वाराहि लागत नाहीं. तो अखंड अद्वैत पहातो. ४था बंध म्हणजे अधीरता टाकायची. कांहींहि इष्ट अनिष्ट घडो त्याचें चित्त चंचल होतां कामा नये. त्याच्या अंतःकरणांत क्षोभाची ऊर्मी उठतां उपयोगी नाहीं. ब्रह्मांड कोसळून नष्ट होवो; असंख्य आकार मोडून लय होवो; विश्वाचा संहार होवो; त्याची गंभीर-वृत्ति अचल राहिली पाहिजे. अणु काय, ब्रह्मांडमाला काय, सर्व परमात्म्याचे

विवर्त आहेत; ते घडले काय व मोडले काय शोकाचें कारण कोठेंच नाहीं. त्याची नितांत परमशांति सदैव अकंपित, अचालित असते. यानंतर अगदीं शेवटचा बंध जो अविद्या, म्हणजे एकंदर प्रपंच मृगजळाचें मूळ असें अतिसूक्ष्म अज्ञानावरण, त्याचा नाश होतो. अतःपर त्याला जन्म-मरणाच्या फेऱ्यांत ओढून टाकण्याची शक्ति ब्रह्मांडांत उरत नाहीं. तो स्वेच्छेनें वाटल्यास मर्त्यलोकांत अवतरेल. पण त्यावर कोणाची सत्ति चालणार नाहीं. आपल्या ग्रहमालेंतील सर्व गोष्टी त्याच्या जाणिवेंत कवटाळल्या जातात त्यांतील एकादा प्राणी, एकादी वस्तु, एकादा कोनाकोपरा, एकादा रजःकणहि असा रहात नाहीं कीं ज्याचें त्याला संपूर्ण, अंतर्बाह्य, प्रत्यक्ष ज्ञान मिळूं शकणार नाहीं. ह्या टप्प्याच्या अखेरीस साधक सिद्ध होतो. मनुष्ययोनींत जो परमार्थ साधायचा तो त्यानें संपूर्ण साधला. ह्या मन्वंतराचे अंतीं सर्व मानवजातीचा जितका विकास होणार आहे तितका त्यानें थोड्या जन्मांत स्वतःचा केला. आमच्या ग्रहमालेंत त्याच्या दृष्टीला कोठेंही पडदा राहिला नाहीं. किंबहुना त्यांतील प्रत्येक लहानथोर वस्तु त्याच्या फुललेल्या आत्मरूपांत येते. संपूर्ण ज्ञान, संपूर्ण चैतन्य त्यास मिळतें. तो येतांच प्रत्यक्ष निर्वाणाचा दरवाजा उघडतो. हें शेवटचें द्वार ओलांडतांच तो, हिंदूशास्त्राच्या भाषेनें जीवन्मुक्त, बौद्ध भाषेनें अशेख म्हणजे ज्याला कांहीं शिकायचें शेष उरलें नाहीं असा होतो. आतां ही नरजन्मांतली परिपूर्ण कृतकृत्यता, कृतार्थता त्याची झालेली आहे. याच्याही पुढें त्याला प्रगतीचे अनेक मार्ग मोकळे असतात त्यांतून तो आवडेल तो पसंत करील. ह्या ब्रह्मांडाचे परिघापलीकडे, असे अनेक महान् उन्नति मार्ग आहेत कीं त्यांची आपणांला अंधुक कल्पनाही करवत नाहीं. एक मार्ग अगदीं जवळचा, पण अत्यंत कठिण आहे त्याचें नांव महासंन्यास. म्हणजे जीवन्मुक्त झाल्यावर विदेहकैवल्याचें कल्पनातीत आनंदवैभव सोडून, मानवांच्या उद्धारासाठीं वारंवार जन्म घ्यावयाचे. असे जे कांहीं जीवन्मुक्त ब्रह्मांडकार्य समाप्त होईपर्यंत, त्यांतच देहधारण करून जीवांचा उद्धार करीत राहतात त्यांचा शंकराचार्यांनीं उल्लेख केला आहे. स्वतः कृतार्थ झालेले असूनही सर्व मानवजातीची ममता धरून,

त्यांना हातीं धरून मोक्षमार्गानें नेण्यासाठीं ते श्रम करीत असतात; मुक्त असून स्वेच्छेनें बंध पत्करतात; स्वतःची सुटका झाली तरी सर्वांची सुटका होईपर्यंत ते स्वतःला मोकळे मानीत नाहींत. भवारण्यांत मानवांची पोरक्या, अनाथ, बापुडवाण्या मुलांसारखी स्थिति न व्हावी; 'मला सद्गुरु भेटतील काय ! अशा आतुरतेनें वाट पाहाणाऱ्या सच्छिष्याची निराशा न व्हावी, म्हणून ते रहातात. ते सद्गुरु योग्य मनुष्यांना अनुग्रह देण्यासाठीं भूतलावर वास करीत आहेत ह्याबद्दल किती उपकार मानावे हें समजत नाहीं. ते निर्वाणपदस्थ असूनहि देहगेहाच्या कारागृहांत खिचपणाऱ्या आम्हां पामरांच्या करुणेनें, उत्तमलोक व आम्ही यामधील अंतर सांधतात त्या मुक्तिपदावर विराजमान झालेल्या सर्वच विभूति श्रेष्ठ व पूज्य आहेत. तथापि इतरांचा अवमान न करतां असें म्हणण्यास मला धीर वाटतो कीं आम्हां मानवांना उत्कट कृतज्ञता व जिव्हाळ्याचें प्रेम त्यांच्याच विषयीं वाटतें कीं ज्यांनीं मनुष्यांना सोडून जाण्याचा हक्क असूनहि करुणेनें महासंन्यास केला व जे मानवसहाय्यार्थ भूतलावर थांबून राहिले आहेत. अशा दर्जाच्या सद्गुरूंच्या पायांचे आम्ही सेवक आहों. त्या दर्जाचे ऋषि थिऑसॉफिकल सोसायटीचे अंतर अधिष्ठाते आहेत. लुप्त झालेल्या ब्रह्मविद्येचा संदेश आजच्या जगाला सांगण्यासाठीं त्यांनींच मॅडम ब्लॅव्हट्स्कीं यांनां पाठविलें आणि मोक्षाचा बिकट मार्ग प्रकट केला. तो मार्ग चोखाळायचें बुद्धिबल कांहींस आज मिळालें आहे व पाहिजे असल्यास तुम्हांसही तें मिळूं शकेल.

---

# मानवजातीची भावी प्रगति.

## भावी शास्त्राभ्यासपद्धति व मनुष्यांचा पुढील गुणविकास.

प्रिय बंधूहो, आजचें विषय-निरूपणही सोपेंआहे असें नाहीं. आतांपर्यंत मी व्यक्तीच्या विकासाची रूपरेषा दाखविली, मोक्षप्राप्तीविषयीं कृतनिश्चय केलेला मनुष्य कोणत्या सोपानपरंपरेनें उन्नतिगिरिशिखरावर, जेथें सामान्य मनुष्यांना पोंचण्याला असंख्य युगें लागणार—तेथें जाऊन बसतो तें सांगितलें. आजच्या व्याख्यानाचें कार्य निराळें आहे. आज मानवजातीचा समुच्चयानें विचार कर्तव्य आहे. ह्यापुढें युगीं युगीं मनुष्यजातीचा गुणविकास कसा, कोणत्या पायऱ्यांनीं होत जाणार हें अर्थात् अतिसंक्षिप्त रीतीनें मीं आतां निरूपण करणार आहें. सारांश, आतां विहंगमदृष्टीनें मनुष्यजातीच्या भूत, वर्तमान, भविष्यत् अवस्थांचें अवलोकन करायचें आहे. निरनिराळ्या राष्ट्रांची प्रगति कसकशी होत आहे, एकंदर मनुष्यजातीचें पाऊल कोणत्या दिशेनें पुढें पडत आहे तें दाखवायचें आहे, आज जणुं काय श्रीविष्णूच्या गरुडावर आरूढ होऊन, महान् युगांच्या वातावरणांतून पृथ्वीच्या क्रमविकासाचे चित्रपट पहात पहात उड्डाण करायचें आहे. ह्या प्रचंड उड्डाणानें श्रोता व वक्ता पुरे थकून जाण्याचा संभव आहे. माझें काम कांहीं अंशीं सोपें आहे, कारण ह्या विषयाचें वारंवार ध्यान केल्यानें तो माझ्या चांगला परिचयाचा झाला आहे. परंतु तुम्हांपैकीं पुष्कळांना मनुष्याच्या युगायुग होत जाणाऱ्या गुणविकासाची आत्मविद्येंतील सांगोपांग माहिती नवी; व त्याकारणानें दुर्बोध होईल असें वाटतें. भराभर भावी प्रगतीच्या मोठमोठ्या टप्प्यांवरून भराऱ्या मारीत जात असतां, मध्यंतरीच्या लहान लहान टप्प्यांचें तपशीलवार वर्णन मला सांगतां येणार नाहीं, यामुळें तुमच्या

मनाचा गोंधळ होईल. येथें आपणास एक सूचना देऊन ठेवतें कीं, ह्या विशाल चित्रपटांत कांहीं किरकोळ गोष्टींच्या रंगरूपासंबंधानें मजकडून चुक्या होण्याचा संभव आहे. तथापि एकंदर मुख्य गोष्टींची रूपरेषा बरोबर आहे असें समजा. कारण ती मजकडून झालेली नाहीं. तिचा उगम दुसरीकडून आहे.

मानवजातीचे अतिप्राचीन काळचे नेते जे राजर्षि व ब्रह्मर्षि त्यांच्या योजनेप्रमाणें मनुष्याची प्रगति आजमितीस विशेष झालेली नाहीं. तो जसा व्हावयाचा आहे, जसा व्हावा असा संकेत आहे, तसा तो अद्याप मुळींच झालेला नाहीं. आजपर्यंतचें काम केवळ असमाधानकारक झालें असा भाग नाहीं. पृथ्वीवर मनुष्यजातीच्या चरित्राला आरंभ झाल्याला मर्त्यदृष्टीनें जरी फार वर्षें लोटलीं आहेत, तरी अमर गुरूंच्या दृष्टीनें मनुष्यजाति अजून बाल्यावस्थेंतच आहे; आणि त्या मानानें झालेली प्रगति एकंदरींत समाधानकारक म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या युगांत संशय, अज्ञान, क्लेश इत्यादिक यद्यपि मनुष्यासमोर सर्वत्र पसरलेलीं असलीं तरी एकंदरीनें आजवरची कामगिरी बरी म्हणण्याजोगी आहे हें खरें पण ज्यांनीं मनुष्याला या यात्रेवर पाठविलें, ज्यांनीं त्याच्या यात्रेचा नकाशा आंखला त्यांच्या संकल्पाप्रमाणें मनुष्याची अद्यापि मुळींच घटना झालेली नाहीं. त्याची अधोगति झालेली आहे व उत्क्रमण मार्गावरील सर्वांत खालच्या स्थानास त्यानें नुकतेंच मागें टाकलें असल्यामुळें त्यास आतां मोठा प्रचंड चढाव चढावयाचा आहे तो चढून गेल्यावर मनुष्यास मोठें श्रेष्ठत्व उच्चपणा प्राप्त होऊन त्याच्या विषयींचा ईश्वरी संकल्प परिपूर्ण होईल.

एकंदर ब्रह्माण्डाचें स्वरूप ध्यानांत आणा. सप्त भिन्नभिन्न प्रांत किंवा लोक मिळून ब्रह्माण्ड होतें. हे सात लोक ईश्वराच्या अंतरंगांतून त्याच्या संकल्पशक्तीनें आंतून बाहेर म्हणा, किंवा वरून खालीं म्हणा असे एका मागून एक व्यक्त स्थितीला येतात व त्या सर्वां मिळून आपलें प्रचंड ब्रह्माण्ड बनतें. प्रत्येक लोकांतलें द्रव्य सर्व चराचर उत्पन्न करणाऱ्या त्या एका परब्रह्मापासून येत असल्यामुळें जरी तें सर्व मूळांत एकच असलें

तरी बाह्यतः त्या द्रव्यांत भेद निर्माण होतात. ईश्वराचें अंतरंग बाहेर येऊन त्याच्या संकल्पानुसार त्यापासून जसजसें ब्रह्माण्ड व्यक्त होऊं लागतें, तसतसा प्रत्येक लोकींच्या द्रव्यांतल्या गुरुत्वांत फरक पडत जाऊन त्यामुळें चैतन्यावर कांहीं लोकीं कमी तर कांहीं लोकीं अधिक अशीं आवरणें पडल्यामुळें दर लोकींचे द्रव्य भिन्न भिन्न होऊं लागतें. या दृष्टीनें जर आपणांस ईश्वर व त्याचें ब्रह्माण्ड याचा मनासमोर नकाशा उभा करावयाचा असला तर ईश्वराचे जागीं सूर्यनारायणाची कल्पना करून त्याचेपासून एका बाहेर एक असे सात लोक बाहेर पडत आहेत असें कल्पिलें पाहिजे. या सातांपैकीं जे लोक आंत आंत असतात. त्यांतील द्रव्य अधिक सूक्ष्म व त्यांत शक्ति अधिक स्वतंत्र असते व जसजसें बाहेरच्या लोकांत यावें तस तसें यांतील द्रव्य घन होत जाऊन त्या घन द्रव्याच्या आवरणामुळें आंतील शक्तीची स्वतंत्रता अधिकाधिक संपुष्टांत येऊं लागते.

प्रत्येक लोकांत असंख्य रहिवाशी आहेत. आंतल्या लोकांतून बाह्य लोकांत यावें, चैतन्यापासून अत्यंत जड अवस्थेप्रत यावें हा प्रवृत्तिमार्ग; तेथून पुनः चैतन्याप्रत परत आंत जावें हा निवृत्तिमार्ग; असे दोन फेरे मिळून जीवचरित्राचा उत्क्रान्तिपथ होतो. ईश्वरी चैतन्याचा प्रवाह बाहेर येऊन द्रव्य उत्पन्न झालें व तें क्रमानें अधिकाधिक जड होत गेलें म्हणजे शेवटीं असा एक बिंदु येतो कीं तेथें चैतन्यशक्ति अत्यल्प आणि जड आवरण अत्यंत घन होतें. प्रवृत्तिमार्गाचें लक्षणच हें कीं, त्यांत जसजशी प्रगति होईल तसतसें चैतन्य अधिक लुप्त व्हावयाचें आणि जड आकार अधिक दृढ व कठीण होत जायचे. पण चैतन्याचा प्रवाह त्या बिंदूशीं पोहोंचून निवृत्तीच्या फेऱ्यावरून माघारी म्हणजे पूर्व स्थानाकडे वळला, निवृत्तिमार्गानें जाऊं लागला म्हणजे प्रत्येक टप्प्याला आकार अधिकाधिक सूक्ष्म किंवा विरल व आंतलें चैतन्य अधिकाधिक व्यक्त होत जातें. सरशेवटीं शक्तीची लाट ब्रह्मांडांतील सर्व जीवसमुदाय, व कल्पभरच्या अनुभवांचे संस्कार यांसह परमात्म्यांत पुनः लीन होते. जेव्हां आपण या स्थितीस जाऊन पोहोंचूं त्यावेळीं इतक्या सर्व प्रक्रियेंतून निघालेली मानवजाति—ईश्वरत्व पावून त्याहूनही वरच्या उन्नतीला अधिकारी झालेली असेल. जग

प्रवृत्तिमार्गानें जात असतां जीवांमध्यें अहंकार व भेदभाव दृढतर होत असतो. खनिजकोटीच्या अगोदरच्या ( अर्थात् भुवर्लोक स्वर्लोक यांतल्या ) भूतद्रव्याकडे * पहातां असें आढळतें कीं, तीं प्रवृत्तीच्या मार्गांत असल्या-मुळें अधिकाधिक घन व विभक्त होत आहेत. परंतु मनुष्यजातीची जडतम अवस्था होऊन गेली; प्रवृत्तिमार्गानें उतरतां उतरतां नीचतम, जडतम, बिंदूही तिनें मागें टाकला; यामुळें मनुष्यांना आतां मागें फिरणें म्हणजे निवृत्तिमार्ग चालण्यासाठीं अभेदबुद्धि वाढविणें ओघानेंच आलें आहे. ह्या निवृत्तीच्या फेऱ्यावर मनुष्यांचीं रूपें अधिकाधिक सूक्ष्म द्रव्याचीं होतील व त्यांतून चैतन्यकळा अधिक फांकूं लागेल.

अशा रीतीनें एकंदर ब्रह्मांडाची स्थूल कल्पना समजली म्हणजे तुमच्या लक्ष्यांत येईल कीं, भुवर्लोक स्वर्लोक इत्यादि सूक्ष्म लोकांत वर चढणारीं (किंवा आंत जाणारीं पाहिजे तर म्हणा) मनुष्यें व खालीं उतरणारीं भूत-द्रव्यें या दोघांची वसति आहे. पृथ्वीवरील खनिजकोटि ही सर्वांत खालची कोटि आहे. तेथें जडतम बिंदु असून तेथून पुढें वरचें वळण लागतें. या वरच्या वळणावर वनस्पति व खनिज जीव यांची जाणीव भूलोकांतच कुंठित होते. त्यास वरच्या लोकांतली जाणीव प्राप्त होत नाहीं. प्राणिकोटीं-तील जीव एक पायरी वर चढतात. त्यांची जाणीव भूलोकांत व भुवर्लो-कांतही चालते. मनुष्यांनीं ह्या उत्क्रान्तींत भू, भुवर्, स्वर् इत्यादि पांच लोक आक्रमण करावे, म्हणजे तितक्या लोकांत जाणीव नेऊन संचार ज्ञानक्रिया करूं लागावें, तेथील द्रव्यावर स्वामित्व गाजवावें असा संकेत आहे. भुवर्लोकांतल्या जाणिवेस स्वप्न म्हणतात. स्वर्लोकांतल्या जाणिवेस सुषुप्ति हें नांव आहे. "सुषुप्ति" स्थितीपर्यंत विशेष विकास झालेल्या असा-मान्य माणसांशिवाय आज कोणत्याही जीवमान माणसास पोहोंचतां येत नाहीं. तेथें हळूहळू उत्क्रान्तिवशात् बहुतेकांस जातां येईल. त्यापुढचा

* इंग्रजींत यास Elemental Essence असें आत्मविद्येच्या भाषेंत म्हणतात.

लोक किंवा भूमिका बुद्धीची आहे. येथें जाणीव गेल्यास ती तुर्यावस्थेंत आहे असें म्हणतात. त्याही पुढची स्थिती निर्वाणस्थिति किंवा तुर्यातीत स्थिति होय. याचा अर्थ असा कीं अंतीं भू, भुवर्, स्वर्, वगैरे पांच लोकांत राहून जागृति, स्वप्न, सुषुप्ति, तुर्या व तुर्यातीता अशा पांच जाणिवेच्या अवस्था मनुष्यांस अनुभवावयास सांपडतील. मनुष्याच्या जाणिवेचा इतका मोठा विकास होईल तेव्हां त्याचें ह्या मन्वंतरांतलें जीवित सफल होईल. कांहीं व्यक्ति योगसाधनानें ही सिद्धि सत्वर मिळवितील. परंतु एकंदर मानवजातीला म्हणजे त्यांतल्या बहुतांशाला ह्या कार्याला फार अवधि लागेल. या सर्व लोकीं व्यवहार करण्यासाठीं मनुष्याला त्या त्या भूमिकांचे देह मिळतील. मनुष्याच्या प्रकृतीचें म्हणजे स्थूल सूक्ष्म देहांचें आजही निरीक्षण करतां, त्याचे ठायीं ह्या सर्व लोकांचा विजय करण्याची शक्ति बीजरूपानें आहे असें दिसतें.

ह्या पांचांपलीकडे तपोलोक व सत्यलोक आहेत. त्यांतील स्थितीला परनिर्वाण अवस्था, व महापरनिर्वाण अवस्था अशीं नांवें आहेत. पण तीं आपणां बहुतेकांना नुसतीं नांवेंच आहेत; त्यांचा अर्थ आपल्याला कांहीं-एक कळत नाहीं. किंवा त्यांची अंधुक कल्पनाही करतां येत नाहीं. बहु-तेक मनुष्यांना त्या लोकांचा ह्या मन्वंतरांत स्पर्शही होणार नाहीं. कांहीं थोड्या असामान्य अधिकारी व्यक्तींची तेथवर प्रगति कदाचित् होईल; तथापि एकंदर मनुष्यांची प्रगति ह्या पांच लोकांपर्यंतच ह्या मन्वंतरांत होणार.

मागें एकदां असा वाद उद्भवला होता कीं, मनुष्याचे कोश किंवा तत्वें पांच कीं सात ? तेव्हां कांहीं ब्राह्मण लोक आपल्या शास्त्राच्या आधारानें कोश पांचच असें जोरानें म्हणू लागले. दुसरे आत्मविद्येच्या पुस्तकांवरून कोश सात असा हट्ट धरून बसले. ह्यांत वस्तुतः खरें असें आहेः— आपल्या ब्रह्मांडांत सर्वत्र सप्तविध विभागच मूळ आहे; व तशा अर्थाचीं सूचक वाक्यें उपनिषदादिक ग्रंथांत सांपडतात. तथापि प्रस्तुतचा ब्रह्मांड-कार्यक्रम पांच लोकांपुरताच ठरविण्यांत आला असल्यामुळें पंचकोश, पंच-प्राण वगैरे गोष्टींत पांचांचे संख्येवर जोर दिलेला आढळतो, हें तुम्हांस

माहीत आहे. वादांत दोन्ही बाजूंनीं एकमेकांच्या म्हणण्यांतला सारांश समजून घ्यावा, म्हणजे पुष्कळ निष्कारण वाद आपोआप मिटतील, हें दर्शविण्यासाठीं ही सूचना देत आहें. ह्या विषयाचें सविस्तर निरूपण करण्याला वेळ नाहीं. सारांश पांच कीं सात या वादाचें उत्तर हें कीं ह्या मन्वंतरांत बहुतेक मनुष्यांचा पंचकोशविकास होऊन पंचलोकांत व्यवहार सुरू होणार आणि कांहीं थोडया मानवरत्नांचा त्याहून अधिक दोन लोकांत प्रवेश होणार आहे.

आतां मनुष्यजातीच्या उत्पत्तीपासून पहातां, पहिल्या व दुसऱ्या मूलवंशाचे चरित्रांत अन्नमय. प्राणमय व कनिष्ठ मनोमय ( वासनादेह ) इतक्या कोशांना संस्कार मिळून ते कार्यक्षम झाले. म्हणजे शरीर ( स्थूल ) सुसंघटित बनवून आहारनिद्रा, कामक्रोध इत्यादि मानवांस व पशूंस सामान्य असलेल्या वृत्तीचा त्यांनीं विकास केला. तिसऱ्या मूलवंशाच्या आयुष्याच्या मध्यभागीं त्याला विशेष सहाय्य मिळालें. त्यावांचून त्याची उन्नति झाली नसती असें नाहीं, पण तें मोठें सहाय्य मिळाल्यानें प्रगतीला प्रचंड वेग मिळाला; एरवीं तो न मिळता. त्या वेळेला पुराणांत ज्यांना मानसपुत्र, कुमार, अशीं नांवें दिलेलीं आहेत, ते पूर्वकल्पांत अधिकार पावलेले सहाय्यकर्ते आले; त्यांनीं आमच्या विकासाला जोरानें गति दिली, आपले अंगचा अग्निस्फुलिंग दिला व त्यामुळें मनस् हें तत्व मनुष्यांत जन्मलें. या प्रसंगीं मनुष्यास कारणशरीर मिळालें. कारण-शरीर हें मनस्-तत्त्वाचें शरीर होय. तें शरीर जन्मजन्मांतरीं कायम रहातें-तेंच असतें-आणि पूर्वजन्माचे संस्कार उत्तरजन्मांत घेऊन जातें. इहलोकच्या अनुभवरूप कार्यांचीं कारणें त्यांत रहातात म्हणून त्याला कारणशरीर हें योग्य नांव आहे.

ज्यांत अनुभवरूपी खजिना सांठवितां येईल अशीं हीं कारण-शरीरें मिळाल्यापासून पुढें मनुष्यजातीचा सामान्य चरित्रक्रम असा कीं कारण-शरीराचा अंश पुढें करून मनुष्यानें नवीन जन्म घेण्यासाठीं त्यावर नवा मनोदेह बनवावयाचा, त्यावर नवे वासनादेह व स्थूलदेह तयार करून बसवावयाचे व भूलोकांत जन्म व्हावयाचा. नंतर बाल्य, तारुण्य, वार्धक्य

इत्यादिक्रमानें नव्या अनुभवांचे नवे संस्कार घेऊन, मरणाचे द्वारांतून, परत जाऊन पुढें वासनादेह व मनोदेह भुवर्लोकांत आणि स्वर्गांत पतन पावल्यावर, तें संस्कारांचें गाठोडें कारण देहांत येऊन सुटायचें. अशा-रीतीनें भू , भुवर् , स्वर् ह्या तीन लोकांतून एक फेरा म्हणजे संपूर्ण एक जन्म होतो. स्थूलदेह नाश पांवल्यावर, म्हणजे मनुष्य मेल्यावर, मानव-जीव प्रथम भुवर्लोकांत व नंतर स्वर्गांत जातो व रहातो; तेथें तो कित्येक गोष्टींचीं फळें भोगतो. या सूक्ष्म लोकांत रहात असतांना तो गत-जन्मां-तील प्रयत्नांचा परिपाक करून नवी शक्ति संपादन करतो. उदाहरणार्थ, इहलोकीं जो विद्यार्जन, तत्त्वचिंतन यांसाठीं परिश्रम विशेष करतो, त्याच्या त्या शक्ति स्वर्गलोकांत कमाविल्या व सुसंस्कृत केल्या जातात. या सर्व प्रय-त्नांचें शक्तींत रूपांतर होतें. त्याचें मन स्वर्गांत असें परिपक्व होतें कीं, त्या योगानें पुढील जन्मीं त्याची एतद्विषयक बुद्धि अतिशय तीव्र होते. तसेंच भक्ति, सत्संगति, सदाचार, परोपकारप्रीति इत्यादिक श्रेष्ठ आकांक्षा इह-लोकीं ज्याचे अंतःकरणांत निरंतर व प्रबळ वसतात त्या जणूं परिणत होऊन जीवाचे अंगीं लागतात. नंतर तो जेव्हां पुनः जन्म घेऊन भूलोकीं येतो तेव्हां त्याच प्रकारची अधिक उत्क्रांति करण्यास जरूर तें सामर्थ्य घेऊन अनुकूल परिस्थितींत तो येतो.

कारणदेहाचा विकास जन्मानुजन्म कसा सुनियमित क्रमानें होतो तें पहा. कारणदेह स्वस्थान न सोडतां, आपलें एक अंग ( मुख ) खालच्या लोकांत घालतो व नाना अनुभव घेऊन तें स्वर्गलोकांत परत येतें व तेथें त्याचा परिपाक करतें नंतर ते परिपक्व संस्कार पुनः कारणदेहांत येऊन पडतात. अर्थात् हा संस्काराचा, अनुभवाचा सांठा वाढत जातो तशी जन्मानुजन्म कारणदेहाची अभिवृद्धि होत जाते. 'जीवाची संसारयात्रा' ह्या शब्दांचा अर्थ आतां तुम्हांला समजेल. जीव नवेनवे देह घेऊन, त्रैलोक्यांत फेरे करतो हीच त्याची यात्रा. प्रत्येक जन्मीं पूर्वींपेक्षां त्याची बुद्धि, नीतिमत्ता व अध्यात्मिक निष्ठा वाढलेली असते. हाच ह्या यात्रेचा हेतु आहे. अशाच रीतीनें जीवाचा विकास व्हावयाचा. पण जीवांची सुधारणा फार मंदगतीनें होते म्हणून एकंदर यात्रेला फार काळ लागतो.

वारंवार जीव चुकतो, आडवाटेला जातो विनाकारण. वळसे घालतो, पडतो, झडतो; यामुळें फार विलंब होतो. हजारों लाखों वर्षे ही यात्रा चालते. परंतु जीव कितीहि आळस करून रेंगाळले किंवा आडवाटेनें भटकले तरी, अखेरीस ते मुक्काम गांठणार. कारण तसा ईश्वरी संकेत आहे, तो कोणालाहि अन्यथा करतां येणार नाहीं.

पुढें तिसऱ्या वंशाचा उत्तरार्धांतलि विकास संपून चवथा वंश भूपृष्ठावर अवतरला. त्याचें वसतिस्थान ॲटलांटिस खंड होतें. त्याच्या टोल्टेक उपवंशाचे हयातींत त्या सुधारणेचा कळस झाला होता. ह्या टोल्टेक लोकांचा सुगावा अर्वाचीन पाश्चिमात्य शास्त्रालाही लागला आहे. त्या उपवंशाची कर्तबगारी खरोखर आश्चर्यकारक होती. परंतु त्यांना मोठी अडचण ही होती कीं, मानवजाति जडतम अवस्थेंतून नुकतीच वर चढूं लागली होती. प्रकृतिजडता अजून फार होती. परोक्षज्ञानशक्ति किंवा गौण योगसिद्धि आपण म्हणतों त्या त्यांचे ठायीं स्वभावतः होत्या. परंतु त्या हलक्या होत्या. त्यापुढें म्हणजे पांचव्या सहाव्या वंशांत उच्च प्रकारच्या उदय पावतील. पण मध्यंतरीं त्या क्षुद्र सिद्धि झांकून टाकून मनाची, विचारशक्तीची; वाढ करणें अवश्यक होतें. म्हणून अमोघ ईश्वरेच्छेनें त्यांना अति जडासक्त सुधारणेंत लोटलें. या सिद्धि झांकून विचारशक्ति वाढविण्याच्या ह्या कामांत टोल्टेक वंशांचे राजे व सरदार लोकांनीं बुद्धिपुरःसर चांगली मदत केली. त्यांनीं, सामाजिक दर्जानें व उत्क्रान्तीनें कनिष्ठ अशा लोकांच्या सिद्धिशक्ति, ते लोक निमूटपणें आपले बंदे गुलाम करण्यासाठीं, आपल्या योगसामर्थ्यानें खच्ची करून टाकली. ह्या कामांत या अधिकाऱ्यांनीं सृष्टि–संकल्पाच्याही पलीकडे जाऊन अतिरेक केला. येथें ओघानेंच एक विचार करण्यासारखा मुद्दा येतो. तो असा कीं सृष्टि–संकल्पाचा आपस्वार्थीपणानें माणसानें उपयोग केल्यास परिणाम काय होईल ? तर ह्याचें उत्तर असें कीं, एकंदरींत ईश्वरी संकेत कधीं टळत नाहीं. तथापि प्रत्येक विचारवान् जीवाला मर्यादित कर्मस्वातंत्र्य दिलेलें आहे. तेवढ्यापुरतें सुकर्म किंवा कुकर्म करून जीव ईश्वरेच्छेला अनुकूल किंवा प्रतिकूल वर्तूं शकतो. ईश्वरेच्छा परमोदात्त असून तिला अनुसरण्यांत सर्वांचें कल्याण आहे हें

जाणून तसें करावें, किंवा आप्पलपोटेपणानें सर्व हित बाजूला सारून स्वतःच्या क्षणिक सुखासाठीं ईश्वराशीं विरोध करावा. अशा अप्पलपोटेपणानें एकंदर जातीच्या कर्मांत बदल तर होणें शक्य नाहीं, पण आपलें डोकें ईशेच्छेच्या वज्रावर आपटून फोडून घेतां येतें, स्वतःच्या आत्मोन्नतीला विघ्न, विलंब करतां येतो. सृष्टिसंकल्पास प्रमाण करून स्वकर्तव्य करूं म्हणून माणसास तदनुसार वर्तन करतां येईल. तसेंच त्या सृष्टिसंकल्पापासून मला अमुक अमुक फायदा मिळेल या बुद्धीनें त्याचा स्वतःच्या स्वार्थाकडेही उपयोग करतां येईल. दोन्ही मार्गांनें जाण्यास माणसास वाव आहे. पण या दुसऱ्या मार्गानें तो जाईल तर सर्व मनुष्यजातीच्या कर्मप्रवाहांत कमी अधिक न होतांही त्या माणसाचें, एकट्याचें कर्म वाईट होऊन त्याचें अंतीं नुकसान होईल. नेहमीं अप्पलपोट्याला तसेंच फल मिळतें. सारांश ईश्वराचा संकेत कोणास बदलतां येत नाहीं पण आपल्या अल्प कार्यक्षेत्रांत आपलें हित किंवा अहित करतां येतें. हें सूत्र मीं सांगतें याचा तुम्ही यथावकाश नीट विचार करा, म्हणजे पुष्कळ संशय फिटतील. 'मला कांहींतरी कर्मस्वातंत्र्य आहे म्हणून मी ही किंवा ती कार्यांची दिशा पसंत करूं शकेन ' ही सर्व मनुष्यांच्या अंतःकरणाची प्रतीति, आणि दुसरीकडे चराचराला आपल्या चक्रावर फिरविणारी विश्वव्यापी अप्रतिहत ईश्वरेच्छा, ह्या दोन्हींचा मेळ कसा घालावा त्याचें तुम्ही या दिशेनें फुरसतीच्या वेळीं मनन करावें.

असो; तर याप्रमाणें त्या प्राचीन सुधारणाकाळीं सत्ताधाऱ्यांनीं विश्वशक्तीचा क्षुद्र स्वार्थासाठीं दुरुपयोग केला. अखेर त्याचा असा परिणाम झाला कीं जलप्रलय करून तें खंडच रसातळाला नेण्यांत आलें. मात्र त्या ॲटलंटिसच्या वैभवशाली भव्य सुधारणेचे क्षुद्र छोटे अवशेष दक्षिण अमेरिकेंत, पेरू देशांत अस्पष्ट साक्ष देण्याला उरले. इतक्या अवनतींतही त्या अवशिष्ट लोकांची स्थिति इतकी स्पृहणीय होती, त्या लोकांचा स्वभाव इतका निर्मल, सौम्य, गोड होता, राज्य व्यवस्था इतक्या शहाणपणाची, व राष्ट्रांत एकंदरींत इतकी सुखशांति नांदत होती, कीं त्यांना जाऊन आसुरी रीतीनें जिंकणारे अर्वाचीन स्पॅनिश लोकही आश्चर्यानें थक्क होऊन

गेले होते. ती भव्य सुधारणा आपल्या ऐन भरांत इतकी उत्तम असूनही स्वार्थापायीं तिचा एवढा अधःपात झाला. तें विशाल रम्य खंड नष्ट होऊन त्यावर अटलांटिक महासागराच्या लाटा खेळूं लागल्या. त्याच्या अवशिष्ट लोकांवर स्पेनच्या एकामागून एक टोळधाडी पडल्या व त्यांनीं त्या अवशेषाचाही क्रूरपणें विध्वंस करून टाकला.

त्या वंशाची गोष्ट तितकीच सोडून आपण आतां आपल्या म्हणजे आर्यवंशाच्या इतिहासाकडे वळूं. वंशविकासाचें मर्म नीट समजण्याला ही गोष्ट लक्ष्यांत घ्या कीं, ईश्वर एक असूनही ब्रह्मांडांत उत्पत्ति, स्थिति, लय ह्या तीन मुख्य कार्यासाठीं एकेक गुण प्रधान धरून त्रिमूर्तिरूपानें प्रकटतो. तुम्हांला, निदान तुमच्यापैकीं तत्वविचाराची आवड असणाऱ्यांना हें चांगलें माहीत आहे कीं, एकच अव्यक्त ईश्वर जगाच्या उत्पत्तीसाठीं क्रियाशक्ति प्रधान ब्रह्मा होतो; रक्षणासाठीं ज्ञान प्रधान विष्णु होतो; आणि संहारासाठीं इच्छाशक्तिप्रधान निर्धार-शक्तिप्रधान शिव होतो. सत्-क्रिया, चित्-ज्ञान, आनंद-इच्छा ही मूळ त्रिपुटी.

आतां मानवांच्याही सर्व व्यवहारांवर ईश्वराच्या त्रिगुणात्मक शक्तीचाच ठसा साहाजिकपणें उमटतो. मनुष्यांच्या सर्व क्रिया व मनुष्यांचे सर्व मुख्य व उपवंश ह्या तिहींपैकीं कोणत्या तरी एका सदरांत मुख्यतः पडतात. हे तीन विभाग सांगण्याचें कारण असें आहे कीं हा विषय फार मोठा व गुंतागुंतीचा आहे, तेव्हां ह्याचे असे कांहीं स्पष्ट खण किंवा विभाग पाडले म्हणजे, आतां मी संक्षिप्त माहिती सांगेन, तिच्यावर यथावकाश सविस्तर विचार करण्यास तुम्हास सोयीचें जाईल. ह्यास्तव लक्ष्यांत घ्या कीं बाह्यांगीं व्यक्त रूपें व त्यांचीं कार्यें वेगवेगळीं तीन असूनही अंतरंगीं वस्तु स्वरूपतः एकच असते; तसेंच लक्ष्यांत ठेवा कीं, तीन व्यक्तरूप कार्येंही एकमेकांत व्यापक असतात; आणखी लक्ष्यांत ठेवा कीं, नामरूपात्मक प्रपंचाचा बहिरंग भेददृष्टीनें विचार जरी आपणाला कर्तव्य आहे तरी, मूलतत्वाचें ऐक्य आपण विसरतां कामा नये.

इतकी खबरदारी घेऊन आतां आपण ह्या त्रिविध भागांचे विवेचनाचे सोयीसाठीं आणखी विभाग पाडूं या. आतां अद्वैतांतला आनंद, तेंच द्वैतसृष्टींतलें प्रेम. ह्या प्रेमापासूनच देवभक्ति परोपकार इत्यादिकांचा उदय होतो. भक्ति व उपकार हे शब्द व्यापक अर्थानें घ्यावयाचे. देवादिक आपणाहून वरिष्ठांविषयीं पूजा, जप, ध्यान वगैरे रूपांनीं व्यक्त होणारें प्रेम म्हणजेच देवभक्ति किंवा एका विस्तृत अर्थानें धर्म होय. तसेंच आपल्या बरोबरीच्यांशीं मैत्री दया ह्या रूपांनीं दिसणारें प्रेम तोच परोपकार होय. तेव्हां 'प्रेम' ह्या सदरांत, वरिष्ठांची पूजाअर्चा, बरोबरीच्यांशीं प्रीतिमैत्री कनिष्ठांवर दया, हे गुण व त्यांपासून उत्पन्न होणारीं सर्व विविध कर्में, यांचा समावेश होतो. देव आणि हे दोन वर्ग घेतले तर धर्मोपासनेचा देवांशीं निकट संबंध जुळतो; परोपकाराचा, प्रथमारंभीं भूलोकांतल्या प्रत्यक्ष दिसणाऱ्या मनुष्यांशीं संबंध असतो. देवांशीं संबंध किती निकट व व्यापक असतो तें पुढें सांगेन. आतां 'ज्ञान' या सदरांत श्रेष्ठ व कनिष्ठ मनाच्या सर्व कार्यांचा अंतर्भाव होतो. ज्ञानाचे पुनः भौतिकशास्त्रें, तत्वज्ञान, व कलाकौशल्य असे विभाग होतात. पुनः ज्ञान वेगळें आणि विज्ञान वेगळें. ज्ञान म्हणजे कच्ची माहिती आणि तिचा परिपाक होऊन जो सुजाणपणा येतो तें विज्ञान.* तेव्हां शिकणें, शिकविणें वगैरे सर्व क्रिया आपण ज्ञानाच्या सदरीं घालूं. आतां पुढें क्रियाशक्तीचे सदरांत जाति, समाज, राष्ट्र इत्यादिक मनुष्यसमुदायांची घटना, त्यांचें नियमन व शासन ह्यासंबंधीं सर्व लहानमोठ्या गोष्टी येतात. तसेंच मानवीं उन्नतीस मोठी मदत करणाऱ्या नानाविध यंत्रादिकांची रचना व उपयोग ह्या क्रियाशक्तीच्याच सदरांत मोडतात ह्या गोष्टींचें ज्ञान किती थोडक्यांना असतें ! आणि क्रियाशक्तीचा उपयोग करणारांपैकींही समजून उपयोग करणारे किती थोडे ! प्राचीनकाळीं तसेंच अर्वाचीनकाळीं सिद्धांच्या प्रेरणेचा रोख असा असतो कीं सर्व विविध क्षेत्रांत मनुष्यांनीं

---

*येथें विज्ञान हा शब्द विशिष्ट अर्थानें उपयोजिला आहे हें सूज्ञ वाचक समजतीलच.

नीट समजुतीनें कार्य करावें व होईल तीं पायाशुद्ध व पक्की करावी. प्रेम ज्ञान, क्रिया ह्या तिन्ही खात्यांत कार्य करणाऱ्या मनुष्यांना ते योग्य अशी लावतात व मनुष्य जातीची उत्क्रांति साधतात. धर्मस्थापन केलें ते ह्या साठीं, नीतिशास्त्रें रचलीं तीं ह्यासाठीं, बौद्धिक शिक्षणाच्या चळवळी उत्पादित केल्या त्यांचा हेतु हाच. आणि आजकाल थिऑसफी ह्या ग्रीक नांवानें सर्व जुने सिद्धांत अधिक पूर्ण रीतीनें पुनः जनतेसमोर मांडण्यांत येतात त्याचाहि उद्देश तोच आहे. आरंभापासून मानवांना मार्ग दर्शविण्याचें महत्कार्य ज्यांनीं शिरावर घेतलेलें आहे त्याच महाभाग ऋषींनीं तीच पुरातन आत्मविद्या 'थिऑसफी' ह्या नव्या नांवानें पुनः उपदेशिण्याचा क्रम आरंभिला आहे.

प्रस्तुतकाळीं आत्मविद्येच्या पुनरुपदेशाची विशेष गरज आहे. कां कीं, प्रत्येक कार्यक्षेत्रांत मनुष्याची गति कुंठित झालेली आज जगभर दिसत आहे. मनुष्यानें भूलोकाचीं सर्व अंगें जिंकून, निरनिराळ्या वस्तु व शक्ती आपल्या लगामीं लावून, त्यांच्याकडून सेवा घेण्यांतच तो गढल्यामुळें वरच्या लोकांची शुद्धही त्याला राहिलेली नाहीं. धर्माकडे पहा. एका बाजूनें भोळेपणा व हट्ट आणि दुसऱ्या बाजूनें जडशास्त्राचा नास्तिकवाद यांच्या हल्ल्यांमध्यें त्यांचा पायच उखडून जाण्याचें भय वाटत आहे. धर्माच्या काळजावर आज दोन सुऱ्या रोंखलेल्या दिसत आहेत; एक श्रद्धाहीन नास्तिकाची व दुसरी अंध आस्तिकाची. खऱ्या धर्मोन्नतीला दोन्ही सारख्याच घातुक आहेत. पुढें परोपकाराच्या क्षेत्रांत पहा. मानवी दुःखांचा पर्वत एवढा प्रचंड आहे कीं तो पाहून परोपकाराची कंबरच मोडते. जेथें अर्वाचीन सुधारणेचा कळस झालेला आहे, जेथें सुधारणेचे सर्वांत उंच विजयध्वज फडकत आहेत, तेथेंच मनुष्याच्या विपत्तीची परमावधि झालेली, क्लेशाच्या रुळाखालीं माणुसकी चिरडलेली दिसते. ह्या देखाव्यापुढें परोपकार नुसता हताश, निरुपाय होऊन तटस्थ रहातो ! इतकेंच नाहीं तर अशा दुर्बळ परोपकाराला पाहून विपत्ति राक्षसीला क्रोध चढतो, तिच्या हृदयांत उच्चवर्गाविषयीं द्वेषाग्नि भडकतो व ती रुधिरप्रिय अराजक क्रांतीचें भय घालते. सर्वत्र प्रेमाचा दुष्काळ

होऊन कोणास उपाय सुचेनासा झाला आहे; द्वेषाच्या सुरुंगांनीं समाजाचा पाया उखडला जाईल कीं काय अशी धास्ती उत्पन्न झालेली आहे.

बरें, ज्ञानाकडे दृष्टि फिरवा. त्याच्याही तिन्ही मुख्य क्षेत्रांत संकटांचे डोंगर उभेच आहेत. शास्त्राच्या जडयंत्रसामग्रीची सीमा झालेली आहे. यंत्रें इतकीं नाजुक केलीं आहेत, ताजवे केसाच्याहि शतांशाचें वजन दाखवितील असे बनविले आहेत ! तथापि त्या यंत्रांनीं दिसत नाहींत, त्या ताजव्यांत तोलतां येत नाहींत, अशा सूक्ष्म गूढ, पदार्थशक्ति प्रत्ययाला तर येऊं लागल्या आहेत. रसायनशाळेंत जा, शास्त्रशोधाच्या मंदिरांत पहा अशा कांहीं अद्भुत चिजा जाणवूं लागल्या आहेत कीं शास्त्राची अक्कल गुंग होऊन गेली आहे ! नाहीं तर अनुभवाला येतें, आहे म्हणावें तर काय ? कसें ? कांहीं सांगतां येत नाहीं; मोजतां येत नाहीं, तोलतां येत नाहीं ! ! कोणत्याही यंत्रानें किंवा इंद्रियानें आकळतां येत नाहीं. अशारीतीनें भौतिक शास्त्रानें हात टेकले आहेत. तत्वज्ञानाची अवस्थाही तीच. जडवादानें समाधान होत नाहीं, परिणाम लागत नाहीं. अध्यात्मवादाला भक्कम पाया सांपडत नाहीं. असा त्यांत गोंधळ झाला आहे. कलाकौशल्याच्या भागांत पहा, थेट तशीच अनवस्था. सर्वत्र नीरस निर्जीव अनुकरण. नवस्फूर्ति, नवसौंदर्य, नवचैतन्य यांची कोठें छटाहि दुर्मिळ झालेली आहे.

आतां तिसरें महाक्षेत्र क्रियाशक्तीचें मीं म्हटलें आहे, त्यांत आधुनिककाळीं काय प्रकार दृष्टीस पडतो ? सर्व राष्ट्रांत राज्यव्यवस्थेचे प्रयोगामागून प्रयोग, चांचपडूं लागले आहेत. अवतारी राजर्षि पडद्याआड गेल्यापासून त्यांच्यासारखी राष्ट्राच्या सुखसमृद्धीची व्यवस्था कोणालाही करतां येत नाहीं. एकमुखी राजा नको, सहस्रमुखी जन हाच राजा, अशा कल्पना निघून त्याप्रमाणें प्रयोग चालले आहेत. ज्ञानैश्वर्यसंपन्न देवतुल्य राजे गेले त्यांचे जागीं पुष्कळांचें लोक—राज्य स्थापण्यांत येत आहे. अज्ञानाच्या शून्यांस बऱ्याच मोठ्या गुणकानें गुणून ज्ञान उत्पन्न करण्याचा जणूं हा प्रयास आहे ! मनुष्याच्या अंगीं जन्मतःच बीजरूपानें वसणाऱ्या दिव्य

क्रियाशक्तीविषयीं इतकें गाढ अज्ञान माजलें आहे कीं तिचें नांव काढतांच लोक तुम्हाला हंसून वेड्यांत काढतील.

ह्या सर्वांचा अर्थ काय ? अर्थ हा कीं एकंदर मानवजाति आतां प्रगतिमार्गावर आणखी एक पुढें पाऊल टाकण्याच्या बेतांत आहे. आयुष्यांत गंडांतरें येतात, तसा प्रस्तुत-काळ आहे. पूर्वीचें जीर्ण जग जाऊन त्याचे जागीं नवें जग येण्याच्या तयारींत आहे. वरवर आज क्लेशकलह दिसत आहेत तथापि अंतर्यामीं उद्यांच्या उत्कृष्ट समाजव्यवस्थेचीं, राज्यव्यवस्थेचीं, धर्माचीं रूपें घडत आहेत. तत्वें जुनींच पण त्यांचीं बाह्यरूपें मात्र कालानुरूप नवीं होतील. कारण उत्क्रांति कधीं मागें परतून पूर्वपदावर येत नाहीं. झाडाचें रोप, फळाचें फूल पुनः होत नाहीं. उत्क्रांतीची गति मळसूत्राच्या चढत्या कमानीसारखी असते. पुनः त्याच टप्प्यांची आवृत्ति होते पण ती वरच्या भूमिकेवर होते, व प्रत्येक नव्या आवर्तनांत पूर्वीच्यांतले सर्व उत्तम भाग, आणखी सुधारून प्रविष्ट केले जातात. तसें मनुष्यजाती उन्नतिपथाच्या वरच्या टप्प्यावर चढण्याच्या बेतांत ह्या वेळीं आहे. ह्या वरच्या टप्प्यांत मनुष्यांना नवीं ज्ञानसाधनें व कार्यक्षेत्रें,पूर्वीच्यापेक्षां विशाल व उत्तम अशीं त्यांना मिळतील. त्यांचें किंचित् दिग्दर्शन करतें.

प्रेमक्षेत्रांत काय फरक होतील पहा. मनुष्यें वरच्या भूमिकेवर चढलीं— कांहीं थोडया व्यक्ति आतांच वर चढून बसल्या आहेत. म्हणजे, आतां स्थूलदेह जसा सर्वकार्यक्षम झालेला आहे तसा त्यांचा सूक्ष्म देहही, अर्थात् भुवर्लोकांत, यथेष्ट संचार व कार्य बुद्धिपुरःसर करण्याजोगा होईल. अर्थात् इतका विकास होण्याला कित्येक सहस्रवर्षें लागतील. आणि त्या अवधीनंतरही सर्वांची प्रगति सारखी दिसणार नाहीं. कारण सर्व मनुष्यांचें गुणकर्म मुळींच समान नसतें. सर्व मनुष्यांची समता हें एक अर्वाचीन काळांतलें खूळ आहे. कांहींच्या कल्पनेंत व शब्दांत मात्र समता आहे, बाकी कोठेंही समता दिसत नाहीं. तेव्हां, आजपासून सहस्रावधि वर्षांनीं मानवजातीला म्हणजे बहुत मनुष्यांना भुवर्लोकांत सूक्ष्म देहानें खुशाल संचार व उद्योग करतां येईल. ह्या उन्नतीनें जीवितांत फरक काय काय होतील ?

प्रथम धर्माचें क्षेत्र घेऊं. भुवर्लोकांत पुष्कळ देवादि श्रेष्ठ योनींतील जीव वास्तव्य करतात. ते मनुष्यांना उपदेश व सहाय्य करण्याला तत्पर असतात. मनुष्यें भुवर्लोकांत हिंडूं फिरूं लागलीं म्हणजे पुष्कळांना अशा थोर विभूतींच्या—आणि सर्व धर्मांच्या ग्रंथांत अशा श्रेष्ठ कोटींचीं वर्णनें आहेतच—प्रत्यक्ष दर्शनाचा व उपदेशाचा लाभ मिळेल. परलोक व मरणोत्तर स्थिति ह्यांसंबंधीं प्रत्यक्ष अनुभवाची व निश्चित माहिती आज फार थोडयांना आहे. पुढें ती बहुतेकांना होईल; व ती आज भूमीवरील घरें, गांवें, नद्या, डोंगर इत्यादिकांची आहे, तशी प्रत्यक्ष अनुभवाची व संशयरहित होईल. अदृश्य लोक दृश्य झाल्यावर संशयाला जागाच उरणार नाहीं. जिवंत माणसें जशीं आज सभोंवतीं हिंडता फिरतांना दिसतात, त्यांशीं संभाषणादि व्यवहार यथेष्ट घडतात, तसें सर्व मृत, परलोकगत मनुष्यांशीं होऊं लागेल! मग त्यांच्या सत्यतेचा प्रश्न कसा उरेल ? [ येथें अर्थात् व्यावहारिक सत्यतेविषयीं बोलणें आहे. वेदांतांतलें ' ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ' या भूमिकेवरून मी आतां बोलत नाहीं.] त्या वेळीं आज साक्षात्कारी मनुष्यें जें सांगतात तें सर्व सामान्य मनुष्याच्या नित्य अनुभवास येईल. आजचें भौतिक शास्त्र जसें अनुभवसिद्ध असल्यामुळें त्याविषयीं संशय उरत नाहीं; तसेंच देवसिद्धादिकांचें दर्शन, अनुभवसिद्ध व त्यामुळें संशयरहित होईल. तसेंच भोळेपणा व दुराग्रह हीं नष्ट होतील. कारण अज्ञानांधकारांत मात्र त्यांना घर मिळतें. जेथें परंपरागत जिवंत ज्ञान जाऊन नुसतें निर्जीव कर्म उरतें, तेथेंच दुराग्रहाचा समंध लोकांच्या छलाकरतां, नाशाकरतां उत्पन्न होतो. अज्ञानी, दुराग्रही धर्मोपदेशक भोळ्या लोकांना भय घालतात कीं, 'पहा तुम्ही आमच्या पायां पडून आम्हाला पुष्कळ दक्षिणा न द्याल तर आम्ही स्वर्गद्वाराचें कुलुप तुम्हाला उघडून देणार नाहीं व तुम्ही नरकांत पडाल.'

पण त्यांच्या हातांतल्या किल्ल्या गंजलेल्या आहेत व त्या कुलपांत घालून पाहिल्यास फिरतात कीं नाहीं हे त्यांच्या गांवींही नसतें. अशा धर्मोपदेशकांनीं अक्षय नरकाची नसती भीति घातल्यामुळें व अनेक भोळ्या लोकांनीं त्यांच्या मानीव ज्ञानावर विश्वास ठेवल्यामुळें, त्या बिचाऱ्यांना

परलोकीं गेल्यावर विनाकारण खरोखरी फार यातना भोगाव्या लागतात. विशेषतः पाश्चिमात्य भिक्षुक असें फार सांगतात कीं 'आम्ही सांगतों त्यावर निमूट विश्वास ठेवा. तुमच्या पापांबद्दल, क्षुल्लक पापांबद्दल सुद्धां, अक्षय नरकाग्निकुंडांत तुम्ही पचत रहाल. तुम्हाला पश्चात्ताप व सुधारणा करण्याला मुळींच सवड नाहीं. अर्थात् यावच्चंद्रदिवाकरौ सुटकेचीही आशा नाहीं.' अशा भयंकर कल्पना ज्यांच्या मनांत भरविलेल्या असतात, त्यांना परलोकीं गेल्यावर, त्यांच्याच मनानें निर्माण केलेल्या किती विलक्षण यातना दीर्घकाळ विनाकारण भोगाव्या लागतात, त्याची तुम्हाला कल्पना होणार नाहीं. सिद्धांचे शिष्य मृत-मानवांना परलोकांतील स्थितिरीतींविषयीं उपदेश व सहाय्य करीत असतात. ते त्या वृथा तळमळणाऱ्या जीवांना बोध करतात कीं, 'बाबांनो विनाकारण दुःख करून घेऊं नका. ईश्वरी नियम भूलोकांत होता तसाच येथेंहि आहे. कोठेंहि तो द्वेषानें, खुनशीपणानें कोणाला दुःख देत नाहीं. जसें जेवढें कर्म तसें तेवढें फल, अशी सर्वत्र व्यवस्था आहे. तुमच्याच अंतःकरणांत जेवढा दोष असेल तेवढा झडण्यापुरता तुमचा तुम्हाला त्रास होईल. वृथा सूड उगविणारे यमदूत व नरक येथें नाहींत.' असा बोध करतां करतांही त्यांच्या यातना शांत होण्याला पुष्कळ कठिण जातें. असल्या भोळ्या समजुती व त्यांपासून होणाऱ्या यातना, परलोकस्थिति प्रत्यक्ष दिसूं लागल्यावर, अर्थात् समूळ नष्ट होतील.

तसेंच परोपकाराचेंहि सामर्थ्य अनेक पटीनें वाढेल. सूक्ष्म लोकांतून परदुःखनिवारण अधिक व सुलभ रीतीनें करतां येतें. येथें, गडबड फार कार्य थोडें, असा प्रकार होतो. मारे धांव पळ, घडामोड करा, ही चळवळ करा, तो कायदा बनवा, असा भयंकर खटाटोप करून पहावें तों फल किती क्षुद्र व अल्प. पण तेंच सूक्ष्म लोकांतील कार्य पहा. गाजावाजा नाहीं, धांदल नाहीं, जीभ किंवा हातपाय हालविण्याची गरज नाहीं; स्वस्थपणें मनाच्या संकल्पशक्तीनें दुःखित मनांवर समाधानामृताची वृष्टि करावयाची. आणि तिचें सुफल, शारीरिक उपचारांच्यापेक्षां अधिक, प्रत्यक्ष होतें. अशा रीतीनें पापी, दुःखी जीवांचे मनोमल शुद्ध विचाराच्या गंगाजलानें निर्मल धुवून

त्यांना पापदुःखपंकांतून वर काढण्याची शक्ति, सूक्ष्मदेहविकासानें पुष्कळच वाढणार आहे.

श्रवण करणारे सज्जन हो, तुम्ही ही गोष्ट पक्की लक्ष्यांत ठेवा कीं प्रत्येक वेळीं जेव्हां तुम्ही कामाचा, क्रोधाचा किंवा लोभाचा विचार मनांत आणतां तेव्हां एकेक सजीव शक्ति तुमच्यापासून निर्माण होऊन समाजाच्या मनोमय वातावरणांत संचरूं लागते, व सर्वांत दुर्बळ, अप्रगल्भ, असावध चित्ताच्या मनुष्यांना झपाटते. अशा रीतीनें पुष्कळ वेळां नीच, बेअब्रूच्या माणसांना पापाची व गुन्ह्याची मूळ प्रेरणा उंच अब्रूदार म्हणविणाऱ्यांच्या कुविचारांनीं होते. ही गोष्ट, हा सृष्टिनियम सर्वांना ठाऊक नाहीं पण तो सर्वांना समजून दिला पाहिजे. ज्यांनीं हा ऐकला आहे त्यांचाही ह्यावर असावा तसा दृढ विश्वास नाहीं. जो मनुष्य सुडाचे विचार मनांत घोळतो तो मनोमय सृष्टींत एक घातुक शक्ति सभोवार फेकतो. ह्या दुष्ट शक्तीला मार्गांत एखादा, कुसंचिताचा, दुबळ्या मनाचा, विपत्ती व शत्रु यांनीं वेढलेला, कामक्रोध अनावर असलेला, असा मनुष्य भेटला कीं, तत्काळ त्याच्या मानगुटी बसते; आणि मग जरा कांहीं रागाचें निमित्त मिळतांच तो खून करतो. अशा ठिकाणीं, प्रत्यक्ष सुरी भोसकणारा हात जरी त्या दुर्दैवी प्राण्याचा असला तरी, त्या हाताला चोदना देणारे कुविचार सुप्रतिष्ठित लोकांच्या डोक्यांतून निघालेले असतात. ते चर्मचक्षूला दिसत नाहींत एवढेंच; म्हणून कनिष्ठ वर्गांचे हातून घडणारीं पापें व घातपात बंद किंवा कमी करायचे असतील तर अगोदर वरिष्ठ वर्गांचे विचार व वासना हीं सुधारलीं पाहिजेत. ते सुशिक्षित असल्यामुळें त्यांना हा सृष्टिनियम समजण्यासारखा आहे; व त्यांवर जबाबदारीही अधिक आहे. विचारवासनांचें स्वरूप व कार्य हीं सूक्ष्मदृष्टीला स्पष्ट दिसूं लागतील, तेव्हां मनुष्यांना त्यासंबंधीं आपली जबाबदारी स्पष्ट समजेल, आणि मग मनुष्यें हल्लींप्रमाणें पापकारक शक्ति बाहेर न सोडतां, उन्नतिकारक, दुःखहारक प्रेमाची विचारशक्ति सोडूं लागतील. परोपकाराला हें केवढें बलवान् साधन होईल. मग वाणी, लेखणी इत्यादि साधनांवर अवलंबून राहण्याचें कारण नाहीं. एकदम मनोमन मदत किंवा इतर विचारविनिमय

करतां येईल. आजमितीसही थोड्या प्रमाणांत त्या गोष्टी होत आहेत. शास्त्रशोधकांना ज्या नव्यानव्या कल्पना 'सुचतात' त्या पुष्कळदां वरच्या लोकांतून येत असतात. सर वुइल्यम क्रूक्स सारख्याला परमाणूंची उपपत्ति यासारखा महान् गहन नियमांचा शोध लागतो, तो काय आरोही अनुमानाच्या पद्धतीनें समजतो असें तुम्हाला वाटतें ?

मुळींच नाहीं. मी तुम्हास सांगतें कीं, असल्या कल्पना वरून प्रेरिल्या जातात, खालून सुचत नाहींत. ज्याची ज्या बाजूला विशेष आवड व विशेष गति दिसते, त्याला त्या बाजूच्या उच्च, उच्चतर कल्पना सिद्ध मनोमनप्रेरणेनें नेहमीं देत असतात. मनोमय लोकांतून जगाच्या सुधारणेला मदत करण्यासाठीं विशिष्ट मनुष्यांनाही ते कधीं कधीं चालना देतात. ही मदत हल्लींपेक्षां पुष्कळ व पुष्कळ वेळां ते करण्यास तत्पर आहेत, परंतु मनुष्यांचीं अंतःकरणें शुद्ध होईपर्यंत गुप्त अदृश्य शक्तीचीं हत्यारें त्यांचे हातीं देणें बरें नव्हे. त्या हत्यारांचा परोपकाराकडे सदुपयोग न करतां स्वार्थ साधण्याला, दुसऱ्यावर जुलूम करण्याला त्यांचा ते दुरुपयोग करतील. एवढ्यासाठीं आज ते शास्त्राला जास्त मदत करीत नाहींत, गुप्तज्ञान प्रकट करीत नाहींत एका सिद्ध पुरुषानें एकदा असें म्हटलें आहे कीं मनुष्यजातीचे आम्ही जे महासेवक त्या आम्हांपासून जर भौतिक शास्त्राला सहाय्य पाहिजे असेल तर शास्त्रानेंही सेवक बनावयास पाहिजे, विध्वंसक राहून चालणार नाहीं.

भविष्यकाळीं शिक्षणाच्याही बाबतींत मोठ्या झपाट्यानें प्रगति होईल. मला वाटतें तुम्ही त्याविषयीं फारसा विचार केलेला नाहीं, त्यामुळें ही गोष्ट तुमच्या लक्षांत आलेली नाहीं. पण, योग्य शिक्षकानें योग्य रीतीनें दुर्गुणबीजें नाहींशीं करण्याचा व सद्गुणबीजांचा परिपोष करण्याचा उद्योग केला तर लहान मुलांच्या मनोभूमींत एकंदरींत किती शुद्ध सोनें सांपडण्यासारखें आहे त्याची तुम्हास कल्पना नाहीं. प्रत्येक मनुष्याच्या भोव-

तीं त्याचें प्रभावलय* असतें. अनेक जन्मांच्या संस्कारांनीं झालेला त्याच्या गुणावगुणांचा विकास त्या प्रभावलयांत स्पष्ट चित्रित केलेला असतो. योग्याच्या दृष्टीला तो स्वच्छ दिसतो. त्यांत मनुष्याची बुद्धिमत्ता, नीतिमत्ता, शील, एकंदरीत मनुष्यसमाजांत त्यांची खरी अंतरंगयोग्यता दर्शविणारा वर्णलेख असतो. चर्मचक्षूला मनुष्याचे नाकडोळे दिसतात तसा तो योग्याला दिसतो. आतां मूल भूलोकीं जन्मल्यानंतर बाल्यावस्थेंत तें असेपर्यंत त्याच्या प्रभावलयांत हें विशेष असतें कीं जरी पूर्वसंस्कारानें प्राप्त झालेले सर्व सुगुण तसेच दुर्गुणही त्यांत चितारलेले असतात तरी ते सर्व बीजास्थितींत असतात, वाढून दृढ झालेले नसतात. लहान मुलांचें प्रभावलय तारतम्यानें स्वच्छ असतें त्यांतले रंग स्वच्छ, पातळ, पारदर्शक असतात, मोठ्या माणसांच्या प्रमाणें मळकट दाट नसतात. कोणतीं चांगलीं बिजें वाढण्यासारखीं आहेत तें त्या प्रभावलयांत स्वच्छ दिसतें. योगदृष्टीनें हीं चांगलीं वाईट गुणबीजें न्याहाळून, योग्य संस्कार करून वाइटांचा नाश व चांगल्यांचा परिपोष करतां येईल. एखाद्या बीजापासून जोरकस झाड बनवायचें असलें म्हणजे आधीं तें बीं चांगल्या सकस जमिनींत पेरतात, मग वेळोवेळीं योग्य पाणी व ऊन देतात. झाडाचीं सर्व अंगें त्या बीजांत असतात, पण गुप्त असतात. ज्याप्रमाणें हवा, पाणी ऊन त्याला मिळेल, त्याप्रमाणें कमीअधिक पुष्ट होऊन तीं अंगें बाहेर पडतील. एकंदरींत कमी जास्ती काळजी घ्यावी त्याप्रमाणें त्या बीजाचा मोठा व डौलदार वृक्ष होईल, किंवा खुरटें झुडूप होईल. मुलाच्या वाढीची-

---

*मनुष्यांचा जो सर्वांस दिसणारा देह त्यास स्थूल देह म्हणतात. या देहाखेरीज मनुष्यास कित्येक विरळ द्रव्याचे बनलेले देह असतात त्यांस सूक्ष्म देह किंवा सूक्ष्म कोष म्हणतात त्यांचें द्रव्य विरळ असल्यामुळें ते जडदहाच्या आंत असून ही त्याच्या सभोवारपर्यंत पसरलेलें असतें. सर्व सूक्ष्म कोषांचा जितका भाग जडदेहाबाहेर येऊन भोंवतीं पसरलेला असतो त्यास येथें प्रभावलय असें म्हटलें आहे. इंग्रजींत त्यास [ Aura ] असें नांव आहे.

ही बऱ्याच अंशीं तशी स्थिति आहे. समजा, एक मूल जन्मलें तेव्हांच त्याचे प्रभावलयांत शीघ्रकोपी आततायीपणाचें बीज आहे. त्याच्या भोवतालचीं कुटुंबीय माणसें जर सुज्ञ, अंतर्दृष्टीचीं असतील तर तीं त्यावर योग्य उपाय करतील. तीं प्रथमपासून असा बंदोबस्त करतील कीं रागाचा शब्द कधीं त्याचे कानीं पडूं नये, रागाचें कृत्य कधीं त्याचे दृष्टीस पडूं नये; त्याच्याभोवतीं असणारें प्रत्येक माणूस संयमी, सौम्य, व प्रेमळ असावें. सारांश त्या मुलाच्या स्वभावांतील क्रोधबीजाला पोषण व दीपन मिळूं द्यायचें नाहीं. अशा रीतीनें मुलांच्या सभोंवतीं सर्व वस्तु, प्राणी, मनुष्यें सर्वांची अशी सुयोजना करावी कीं मुलांच्या शुद्ध, उत्तम, उदार प्रवृत्तींना मात्र पोषण मिळेल. अशा परिस्थितींत वाढलेल्या प्रत्येक मुलाकडून मनुष्यजातीची प्रगति, आज पांगळ्याच्या गतीनें होत आहे तिच्या ऐवजीं, शर्यतीच्या घोड्याच्या वेगानें होईल. मोठीं माणसेंच आंधळीं; त्यांनीं मुलांना चांगल्या वाटेनें न्यावें कसें ? तीच मोठ्या माणसांना अंतर्दृष्टि आली म्हणजे, आज शिक्षणाचे पुष्कळ श्रम व्यर्थ जातात ते सफळ होतील. खऱ्या शिक्षणाचें महत्त्व एवढें आहे म्हणून पूर्वीं प्रत्येक मुलाला गुरुगृहीं पाठवीत असत. त्या प्राचीन रीतीचा हेतु असा होता कीं सामान्य गृहस्थापेक्षां अधिक ज्ञानयोगसंपन्न गुरूच्या सहवासाचा सुसंस्कार मुलास मिळावा. त्या काळीं गुरूंच्यापाशीं ज्ञानविज्ञान होतें, योगसामर्थ्य होतें, दुर्गुणनाश व सद्गुणवृद्धि करण्याची शक्ति होती. त्या गोष्टींचा लोप झाला. तसा शिक्षणाचाही ऱ्हास झाला. परंतु भविष्य काळीं अंतर्ज्ञान वाढेल तसें पूर्ववत् सुशिक्षणही फैलावेल.

ज्ञानाच्या एकंदर सर्व क्षेत्रांत पद्धति बदलतील. वैद्य लक्षणांवरून रोगाच्या स्वरूपाविषयीं अनुमान करीत बसणार नाहींत. अंतर्दृष्टीनें रोग समक्ष पाहूं लागतील. शरीराच्या कोणत्या भागांत काय विकार झाला आहे, आपण दिलेल्या औषधाचा कसा परिणाम होत आहे, ह्या गोष्टी वैद्याला प्रत्यक्ष दिसूं लागल्यानें केवढा फायदा होईल ! विचार करा. रसायनशास्त्रालाही तसाच मोठा फायदा होईल. हल्लींप्रमाणें अमुक मिश्रण केलें तर अमुक परिणाम होईल असें अनुमानानें चांचपडत न जातां उघ-

ड्या दृष्टीनें इष्ट परिणामापाशीं नीट जलद जातां येईल, पुष्कळ अपघात टळतील, शास्त्राची प्रगति फार झपाट्यानें होईल. त्याचें दिग्दर्शन 'ल्युसिफर' पत्राच्या १८९५ नवंबरच्या अंकांतील एका लेखांत केलेलें आहे. भुवर्लोकांत उपयोगी पडणारा सूक्ष्मदेह मनुष्यांना वापरतां येऊं लागेल तसतसा त्यांच्या ज्ञानक्षेत्राचा विस्तार होत जाईल. मानसशास्त्राचीही तशीच अभिवृद्धि होईल. हल्लीं विचारविनिमय करण्यास जड, दीर्घसूत्री, पुष्कळदा भ्रमोत्पादक, अशा साधनांचा उपयोग करावा लागतो. पुढें, मनोमन तत्काळ व बिनचुक विचारविनिमय होऊं लागेल. त्याचा ऐहिक व्यवहारांतही केवढा फायदा होईल पहा. इष्ट, मित्र, प्रियजन साता-समुद्रांनीं विभक्त, दूर झाले तरी वियोग म्हणून होणार नाहीं. देशीं विदेशीं कोठेंही मनुष्यें रहात किंवा प्रवास करीत असलीं तरी एकमेकांना एकमेकांचें संपूर्ण वर्तमान, यत्किंचित् सुखदुःख तत्काळ पूर्णपणें कळवितां येईल. कारण वरच्या लोकांत कालस्थलांचे निर्बंध नाहींत. त्यामुळें प्रेमी जीव एकमेकांपासून स्थलानें दूर झाले, किंवा मृत्यु पावले तरी त्यांचा हृदयबंध अखंड असल्यामुळें, मनोमय प्रेमविनिमय अबाधित चालू राहिल्यामुळें, त्यांना कधीं वियोगदुःख होणार नाहीं. आज व्यक्तींच्या काय, राष्ट्रांच्या काय जीवितामध्यें वियोग व मृत्यु हे दोन महाशत्रु आहेत. पण त्यांच्या शस्त्राची धार, मनुष्यानें भुवर्लोक आपला केल्यावर, बोथट होईल. आज हा लाभ सद्गुरूंच्या शिष्यांना मिळत आहे; पुढें तो बहुतेक मनुष्यांना मिळेल. हीं दोन मुख्य शल्यें हृदयांतून निघालीं म्हणजे मनुष्य-जीवित कितीतरी अधिक रमणीय होईल !

तत्वज्ञानाचीही तशीच मोठी सुधारणा होईल. प्रकृतीच्या सूक्ष्म रूप-रूपांतरांचें, व जीवनांचें मनुष्यांना यथार्थ ज्ञान होईल. इतिहासलेखक अक्षय आकाशलेख * पाहून त्यावरून निःपक्षपातानें सर्वांगीण असा सत्य

[ पूर्ण टीप पुढील पृष्ठावर पहा. ]

* मनुष्यानें कोणतीही गोष्ट पाहिली म्हणजे तीबद्दलच्या आठवणीचे संस्कार त्याच्या मनांत राहतात. त्याचप्रमाणें सृष्टींत झालेल्या यच्चयावत्

इतिहास लिहितील. हल्लींप्रमाणें पक्षपाती, एककल्ली, एखाद्या माणसाच्या डोक्यांतली कल्पना किंवा पक्षाचें मत पुष्ट करणारे नामधारी इतिहास लिहिले जाणार नाहींत. त्या भावी इतिहासांचा मूळ आधार म्हटला म्हणजे अक्षय आकाशलेख, कीं ज्यांत जगाचा साद्यंत इतिहास, मनुष्यांच्याच काय पण जगांतील प्रत्येक अणुरेणूच्या प्रत्येक स्थितिगतीचें अंतर्बाह्य स्वरूप, स्वच्छ आरशांतल्याप्रमाणें दाखविणारें जिवंत हुबेहूब अजरामर चित्रांचें प्रदर्शनच आहे. तसेंच भावी इतिहासलेखकही निःपक्षपाती, सत्यदर्शी, व पूर्वानुभवाचा मनुष्याच्या भावी उन्नतीला उपयोग करून देण्याच्याच सद्धेतूनें प्रेरित झालेले असतील.

पुढें, कलेच्या क्षेत्रांत लाभ किती मोठा होईल, हें तेच सांगू शकतील कीं ज्यांना आज भुवर्लोकांतील कलास्वारस्याचा अल्पानुभव तरी घेतां येतो. भावी कलेच्या उपासकांपुढें अवर्णनीय रूपसौंदर्य, कल्पनातीत उज्वल रंगच्छटा यांचा अपार निधि उघडेल, कीं ज्याचें वर्णन भूलोकच्या शब्दांनीं कितीही केलें तरी फिक्कें च पडतें. बरें. क्रियाशक्तीच्या क्षेत्रांत काय सुधारणा होतील ? पुनः दिव्य राजर्षि अवतरतील. मनुष्यें आपआपल्या खऱ्या आत्मोन्नतीच्या मानानें समाजांत उच्चनीच पद पावतील. आजच्यासारखा अनमानधबक्याचा गोंधळ उरणार नाहीं. कारण प्रत्येकाला स्वतःची व

---

[ मागील पृष्ठावरून पूर्ण टीप. ]

सर्व गोष्टीचे संस्कार सृष्टीच्या मनोभूमिकेवर ( किंवा ईश्वराच्या मनांत पाहिजे तर म्हणावें ) अर्थात् मनोमय लोकांत किंवा स्वर्लोकांत व त्याच्याहीवर कायम राहिलेले असतात. योग्यानें त्या लोकांत जाणीव नेली म्हणजे तेथें त्यास ते चित्ररूपानें व्यक्त झालेले दृष्टीस पडतात. या चित्रलेखांस आकाशलेख असें नांव येथें दिलें आहे. इंग्रजींत आत्मविद्येच्या परिभाषेंत त्यास [ Akashic Records ] अशी संज्ञा आहे. हे लेख ज्यांस पाहातां येतात त्यास पूर्वी झालेल्या गोष्टीचा सविस्तर इतिहास त्यावरून समजूं शकतो. या लेखांविषयीं अधिक माहिती लेडबीटर-कृत [ Clairoynace ] या पुस्तकांत जिज्ञासूंस पहावयास सांपडेल.

इतरांची नीतिमत्ता, बुद्धिमत्ता, गुणकर्मयोग्यता प्रभावलयांत चित्रित झालेली प्रत्यक्ष दिसेल. मुलांमुलींना, तरुणांना, जें काम प्रौढपणीं यथायोग्य पार पाडण्याची पात्रता येण्यासारखी असेल, त्याचेंच शिक्षण मिळेल, व मग तेंच काम त्यांना मिळेल. ह्यानें असंतोषाला जागा रहाणार नाहीं. कार्य करण्याची पात्रता व हौस असून संधि न मिळाली, म्हणजे अन्यायानें गुण वायां घालविला, ह्या जाणिवेनें असंतोष उद्भवतो. आतां, आपल्या पूर्व-कर्मामुळें आपल्याला संधि मिळाली नाहीं हें विवेकी मनुष्य जाणतो. पण येथें आपण अविवेकी सामान्य जनतेचा विचार करीत आहों. तेव्हां सामान्य जनांना त्यांच्या स्पष्ट गुणकर्माप्रमाणें स्थान मिळेल, त्यांत ते संतुष्ट रहातील, व समाज सुव्यवस्थित सुरळीत चालेल. वर्णाश्रमव्यवस्थेचें हेंच ध्येय आहे. तसेंच आत्मविकासानें कनिष्ठ प्रतीच्या लोकांस, म्हणजे गुन्हेगार वर्गासही आपल्याला अधिक शहाणपणानें वागवितां येईल. हल्लीं गुन्हेगारांवर एक-प्रकारें सूड घेतला जातो, त्यांचा जीवही घेतला जातो. पुढें, त्यांना शिक्षण देऊन त्यांची सुधारणा करतां येईल. त्यांचा कोणता अवगुण कसा सुधा-रावा हें नक्की दिसूं लागेल. हल्लीं क्रोधाचे द्वारें त्यांना शिक्षा दिली जाते, ती पुढें ज्ञानाचे द्वारें त्यांची सुधारणा केली जाईल. अशा रीतीनें मनु-ष्यांच्या प्रत्यक्ष मनावर सुसंस्कार करतां आल्यानें समाज तर सुधारेलच, पण भोंवतालची पशुपक्षिसृष्टीही सुधारेल. पशुपक्षी मानवाच्या उन्नतिकारक छत्राखालीं रहातील. हल्लीं मनुष्य हा त्यांचा जुलमी राजा आहे, पुढें तो त्यांचा शिक्षक, मार्गदर्शक, सहाय्यकर्ता होईल. तसा तो व्हावा हा ईश्वरी संकेत आहे; पण आज मनुष्य बहुतांशीं त्यांना छळणारा, गांजणारा आहे. पुढें हळुहळू क्रूरपणाच्या सर्वच चालीरीती बंद होतील, हें सांगायला नको. हल्लीं प्राण्यांच्या रक्ताचे पाट भूमि कलंकित करतात, ते बंद होतील. हल्लीं प्राणी मनुष्याला काळ समजून भयानें, उद्वेगानें त्याजपासून दूर पळ-तात. पुढें तो त्यांचा मित्र होईल. कारण त्या भावी सोन्याचे सत्ययुगांत सर्व प्राणिमात्रांत द्वेषाचे ऐवजीं प्रेमाचें साम्राज्य नांदेल.

तुम्हाला वाटेल मी ही काल्पित कादंबरी सांगत आहें. परंतु ही तर वरच्या एक लोकाच्या, भुवर्लोकाच्या विजयानें होणारी सुधारणा आहे.

मग, स्वर्गविजय झाल्यावर किती अद्भुत स्थिति होईल ? त्याविषयीं एक-दोन मुद्यांचें दिग्दर्शन करतें. त्या दूरच्या भविष्यकाळांत जर व्याख्यानें होतील, तर काय त्या वक्त्याचें वक्तृत्व, आणि काय त्याचा श्रोतृसमाजावर अद्भुत परिणाम वर्णावा ! हल्लींप्रमाणें, पुष्कळदां वक्त्याच्या अर्थाचा विपर्यास करणारी, निदान असमाधानकारक रीतीनें अर्थ व्यक्त करणारी वाणी, म्हणजे हवेचे तरंग, श्रोत्यांच्या कानांला भेटणार नाहींत. तर, दैदीप्यमान रंगांच्या, अनुपमसुंदर, मनोहर ध्वनियुक्त विचारमूर्ति वक्त्यापासून निर्माण होऊन श्रोतृमनांला भेटतील. रमणीय चित्र–संगीतयुक्त भावी विचारविनिमय होणार. मी स्वप्न वर्णन करीत आहे असें समजूं नका. मी सत्य सांगतें कीं आज ह्या घटकेला, अशीं कित्येक भाग्यवान् मनुष्यें आहेत कीं जीं मायापटलाचा भेद करून त्या उच्च स्थितीचा प्रत्यक्ष अनुभव घेत आहेत, त्या दिव्यानंदाचा स्वतः आस्वाद घेत आहेत. मनुष्य एखाद्या उंच गोपुराच्या माथ्यावर गेला म्हणजे त्याची दृष्टि दूर सभोंवार पोंचते, चोहोंकडचे रम्य देखावे त्यास दिसतात, ध्वनि ऐकूं येतात. पण तो जिना उतरतांना बाजूच्या खिडकींतून बाहेर पाहील तर त्याला एका बाजूचा लहान देखावा दिसेल. तोच प्रकार स्वर्गानुभव व भूलोकानुभव यांचे तुलनेचा आहे. स्वर्गलोकीं सर्व द्वारांनीं ज्ञानप्रवाह अंतःकरणांत येतात. परंतु येथल्याप्रमाणें पांच वेगळ्या इंद्रियद्वारां ज्ञान तेथें होत नाहीं. पांचही ‘ इंद्रियांचा एकमेळा ’ केल्याप्रमाणें एका बिंदूत एकीकरण होतें. जीवात्मा खालच्या लोकांत उतरतो तेव्हां, मधांच्या गोपुराच्या शिखरावरून खालीं उतरण्यासारखी स्थिति होते. नुकतेंच एका मोठ्या सलग क्षेत्राचें एकदम ज्ञान होत होतें, तें आतां एकेका खिडकींतून तुटक लहान लहान भाग दिसूं लागतात. देहाच्या तटांत इंद्रियांच्या खिडक्या आहेत. त्यांतून एका वेळीं एक लहान भागच दिसणार. देहाच्या बुरजावर चढून गेल्याशिवाय जगाचें खरें अद्भुत वैभव व सौंदर्य दिसत नाहीं. आणखी, स्वर्गजय झाल्यावर मनुष्य विलक्षण सामर्थ्यवान् होईल. सर्व श्रेष्ठ, सामर्थ्यवान् विचार मूळ स्वर्गलोकांत उत्पन्न होतात, व तेथून भुवर्लोकांतून भूलोकांत उतरतात. सर्व परोपकारबल त्या लोकीं संचरणाऱ्या विभूतींच्या प्रेरणेनें

येथें मिळतें. काल सांगितल्याप्रमाणें ज्यांना दीक्षा मिळालेली आहे असे शिष्य तेथें पूर्ण जागृत अवस्थेंत मनुष्यांना सहाय्य करीत असतात, मनुष्यांच्या उन्नतीचें महत्कार्य करीत असतात. शिष्यांचें कार्य भूलोकांत होतच असतें पण भुवर्लोकीं व स्वर्लोकीं त्याहून बहुत थोर चालतें. अत्युत्कृष्ट व चिरस्थायी परोपकार त्यांचेकडून तेथें होतात. स्वर्गजय झाल्यावरही उपकारकर्त्यांची संख्या केवढी मोठी होईल ? आज कोट्यवधि दुःखित, अज्ञानी सहाय्याची गरज असलेले आणि सहाय्यकर्ते फक्त मूठभर अशी स्थिति असल्यामुळें मदतीचें काम फार असमाधानकारक होतें; पण बहुतांश मनुष्यें त्या पदवीला चढलीं म्हणजे कनिष्ठ पायरीच्या माणसांची व एकंदर मानवांची उन्नति कल्पनातीत वेगानें होईल.

ह्या मन्वंतराचे समाप्तीचे अगोदर स्वर्गाच्याही पलीकडच्या दोन लोकांचा जय मनुष्य करील. आज तुरीयावस्थेंत, घेतलेल्या शिष्यांना शेवटीं शेवटीं मात्र जातां येतें; व तेथें सर्वां भूतीं मी भरलेला आहें असा अनुभव घेतां येतो. पण सातव्या वंशाच्या अंतीं मानवजाति त्या अवस्थेंत, त्या लोकांत प्रविष्ट होईल. तेथें मनुष्यामनुष्यांत भेदभावाची भिंत नाहीं; सर्वांची एकात्मकता, खरी, पूर्ण. बंधुता तेथें नित्यानुभव सिद्ध होईल. नामरूपपटलाचा भेद करून एक सद्वस्तु पाहिली, सर्वांत एक आत्मा प्रत्ययास आला म्हणजे द्वेषाचा कदापि संभव रहात नाहीं.

ह्या लोकाच्याहि वरच्या जनलोकाचें * वर्णन करण्यास माझ्यापाशीं शब्द नाहींत, जेथें मर्त्यांची मति व वाणी कुंठित होते, ज्यास ऋषींनीं निर्वाणपद असें नांव दिलें, पण ज्याचें वर्णन स्वानुभवाच्या अधिकारानें करतांना वैखरी वाणी अपुरी पडल्यामुळें त्याच्या यत्नास यश न येतां उलट लोकांत गैरसमज मात्र पसरले, त्याविषयीं म्यां काय बोलावें ! तेथील जाणीव इतकी प्रचंड आहे कीं, तिची कल्पनाही होत नाहीं. अखिल विश्वाला आपल्या पोटांत घेण्याइतकी ती सर्वगामी असल्यानें मनुष्याच्या

---

* इंग्रजींत यास Atmic किंवा Nirvanic world असें म्हणतात. मराठींत 'आत्मलोक' असेंही कधीं कधीं म्हणतात.

दुर्बल दृष्टीला ती जाणीवही ओळखावयास येत नाहीं, परंतु मीं सत्य सांगतें कीं निर्वाणपदापर्यंत पोहोंचलेल्या सिद्धश्रेष्ठाच्या जीवनाशीं आपल्या जाणिवेची तुलना करून पाहिली, आपल्या जाणिवेस संकुचित करणाऱ्या किती मर्यादा आहेत, मलिन करणारीं कितीं अभ्रें आहेत याचा विचार केला, तर त्या सिद्धाच्या मानानें आपण दगडासारखे खास ठरूं. त्या भूमिकेवर जीवन आहे, पण कल्पनेच्या सर्वोच्च भरारीपलीकडचें तें आहे, तेथें व्यवहार आहे, पण आपल्या विचारांस ठाव न सांपडण्याजोगा तो आहे. तेथ चैतन्य एकरूप आहे, तत्रापि तें अनेक व्यवहारांत व्यक्त होऊं शकतें. ईश्वर प्रकाश-रूपानें तेथें राहून ब्रह्मांडाच्या सर्व लोकांत आपले किरण फांकतो, ही त्या स्थानाची स्थिति आहे. प्रस्तुत मन्वन्तरांत ही भूमिका मनुष्याच्या आटोक्यांत यावयाची आहे. सातवा वंश कालवश होण्याचे अगोदर तिचीही प्रतीति त्यास व्हावयाची आहे. मानववृक्षास पहिल्या बहाराचीं म्हणून जीं फळें येऊन आजच परिपक्व झालीं आहेत, त्या सिद्धांसच फक्त या पटांत आज अनुभव लाभत आहे. पण मन्वंतराच्या अखेरीस त्या चक्रवर्ति परम सिद्धांसभोंवतीं तोच अनुभव घेणाऱ्या असंख्य माणसांचें मंडळ जमेल व नव्या ब्रह्मांडाची जन्मघटिका होईपर्यंत परमेश्वराशीं समसमान झालेले हे सर्व पुरुष त्याची चैतन्यप्रभा आपल्या अंतरंगांत प्रतिबिंबित करण्यांत बहुतकाळ लीन होतील, आणि मग ते प्रति-ईश्वर होऊन नवीन ब्रह्मांडाची उभारणी व नवीन मानवजातीचा विकास करतील. आपली परम रमणीय भवितव्यता ही अशी आहे.

*समाप्त.*

# धर्मजागृतिमाला

मराठी भाषेंत आजच्या काळच्या सुशिक्षित लोकांस पटेल अशा दर्जाचें धर्मविषयक वाङ्मय फारसें नाहीं. आपण आज विसाव्या शतकांत आहों. सांप्रत सर्व जगभर युक्तिवादाचें व बुद्धीचें प्राबल्य कायम झालें आहे. अर्थात् अशा काळीं स्वतःची खात्री झाल्याशिवाय कोणीही सुशिक्षित मनुष्य धर्मावर श्रद्धा ठेवण्यास तयार असणार नाहीं. जगांत सांप्रत जी विद्या सर्वमान्य आहे तिच्या जोरावर बुद्धिमान माणसें धर्माविषयीं आज नवे नवे प्रश्न विचारूं लागलीं आहेत, अशा लोकांस जर धर्माचे सिद्धांत पटवून द्यावयाचे असतील तर त्यांचें समोर ते नवीन रीतीचें व भौतिक शास्त्रांचे भरभक्कम आधार देऊन मांडिले पाहिजेत. नुसत्या श्रद्धेनें धर्माचे सिद्धांत प्रसार पावण्याचा काळ आतां राहिलेला नाहीं. योग्य साधनांच्या अभावीं आजची जनता धर्माविषयीं साशंक बनत आहे आणि तरुण पिढी धर्माचे सिद्धांत भरभर विसरत चालली आहे. आजच्या शिक्षणांतूनही धर्माची हकालपट्टी झाली आहे हें लोकविश्रुतच आहे एवंच आजचे लोक तत्वज्ञानाच्या खोल प्रश्नांविषयीं बेफिकीर व धर्माच्या प्रमेयाविषयीं उदासीन होऊं लागले असून त्यांचेवर जडवादाची छाप अधिकाधिक पडत आहे. असेंच पुढें चाललें तर जनता धर्मशून्य व नास्तिक बनून तीस अनीतिकडे झुकण्यास वेळ लागणार नाहीं. यास उपाय म्हणून आम्ही "धर्मजागृतिमाला" नांवाची एक पुस्तकमाला मराठी भाषेंत प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे. या मालेंत कांहीं पुस्तकें इंग्रजींतून मराठींत भाषांतरित करण्यांत येतील व कांहीं योग्य माणसांकडून स्वतंत्र लिहविण्यांत येतील. धर्मांची तुलना, त्यांतील महत्वाचे सिद्धांत, भौतिकशास्त्रें, सायकिकल रिसर्च, तत्वाविचार, स्पिरिच्युअलिझम, मेस्मेरिझम, वेदान्त, योगशास्त्र आत्मविद्या, नीतिशास्त्र वगैरे अनेक विषयांवर अधिकारी विद्वानांचे ग्रंथ या मालेंत प्रसिद्ध होतील. "धर्मजागृति"

मासिक आज अनेक वर्षें महाराष्ट्रासमोर आहे व या मालेचें धोरण मासिकाच्या धोरणाप्रमाणें सर्व बाबतींत उदार रहाणार आहे. महाराष्ट्रांत व्यवस्थित रीतीनें धर्मजाग्रति करण्यासाठीं ही माला मुद्दाम चालू करण्यांत येत आहे.

मालेंत दरवर्षीं सुमारें चार रुपये किमतीचीं पुस्तकें प्रसिद्ध होतील. या मालेच्या कायमच्या ग्राहकांस सर्व पुस्तकें पाऊणपट किमतीस मिळतील. कायमच्या ग्राहकांस १ रुपया प्रवेश फी अगोदर द्यावी लागेल.

ही पुस्तकमाला फायदा मिळविण्याच्या हेतूनें काढलेली नाहीं. महाराष्ट्रांत धर्मजागृति करावी या एकाच हेतूनें ती काढलेली आहे. तरी सर्व सुशिक्षित लोकांनीं कायमचे ग्राहक होऊन स्वतःस व स्वतःच्या कुटुंबांच्या लहानथोर माणसांस मालेचा लाभ करून द्यावा अशी विनंती आहे ज्यांस मालेचे कायम वर्गणीदार होणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर एक रुपया पाठवून नांवें नोंदवावीं व आपला पत्ता सुवाच्य लिहून कळवावा एक पुस्तकाच्या बांधणीचे दोन प्रकार आहेत. एक अर्धी कापडी बांधणी व दुसरी सुवर्णाक्षरांकित सबंध कापडी बांधणी ( लायब्ररी एडिशन) यांपैकीं जी पाहिजे असेल तिचा निर्देश करणें आवश्यक आहे. लायब्ररी एडिशनची किंमत अर्ध्या कापडी बांधणीच्या सुमारें सवापट पडेल.

धर्मजाग्रतिमालेचें दुसरें पुस्तक हिंदू युनिव्हर्सिटीनें धर्माच्या अभ्यासाकरितां पसंत केलेलें " सनातनधर्म प्रवेश " असून तें लवकरच प्रसिद्ध होईल.

## धर्मजागृतिमालेचीं पुस्तकें.

पुस्तक १ लें—मुमुक्षुमार्ग [ डॉ. ॲनी बेझंटकृत ] किंमत
रा. रा. देवीदास भास्कर लेले बी. ए.,
यांनीं मराठींत उतरलेलें. अर्धकापडी बांधणी रु० ०-१३-०
लायब्ररी एडिशन रु० १-१-०

पुस्तक २ रें—सनातन-धर्मप्रवेश–[ लवकरच प्रसिद्ध होईल. ]

## मराठी थिऑसॉफिकल फेडरेशननें प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें.

| | |
|---|---|
| धर्मजागृति— [ मासिक ] वार्षिक वर्गणी टपालखर्चासह | २–८–० |
| १ थिऑसफी आणि थिऑसफिकल सोसायटी | ०–२–० |
| २ थिऑसफी आणि तिचे टीकाकार | ०–१–० |
| ३ थिऑसफीचें हिंदुस्थानास महत्व | ०–१–० |
| ४ जागृति, स्वप्न, तुर्या व सुषुप्ति | ०–१–० |
| ५ ध्यानयोग | ०–६–० |
| ६ जगद्गुरु येणार असें आम्ही कां म्हणत आहों ? | ०–१–० |
| ७ धर्माचे मूल सिद्धांत | ०–६–० |
| ८ श्रीसद्गुरूपदिष्ट साधनचतुष्टय [ पेपरकव्हर ] | ०–४–० |

मॅनेजर—**धर्मजागृतिमाला.** ३२१ शनिवार पेठ, पुणें.

E

86